
जून १९८८ किंमत २ रु.

# श्री साईलीला

श्रीसाईबाबा संस्थान, शिरडीचे अधिकृत मासिक



जून – १९८८

# श्री साईलीला

श्री साईबाबा संस्थान
शिरडीचे अधिकृत मासिक

संपादक

**श्री. रा. द. बन्ने**

कार्यकारी अधिकारी श्रीसाईबाबा संस्थान शिरडी

-: कार्यकारी संपादक :-

**श्री. सदानंद चंदवणकर**

वर्ष ६७ वे | किंमत २ रुपये | अंक ३ रा

दूरध्वनी ४१२२५६१

- कार्यालय

साईनिकेतन'', प्लॉट नं. ८०४ बी, डॉ. आबेडकर रोड, दादर, मुंबई- ४०० ०१४.
वार्षिक वर्गणी रु. १०/– (ट.ख. सह) किरकोळ अंक २ रु. फक्त.

**श्री साईबाबांच्या संदेशाचा जगभर प्रसार करणे हे श्री साईलीलाचे मुख्य उद्दिष्ट आहे.**



# रघुनाथ सावित्री साईनाथ भजनमाला

५१

नित्याचें अभय देती संतजन।
सद्गुरूदर्शन घेती जे जे ॥धृ.॥
पहाणी सर्वात असे श्री बाबांची।
आवड भक्तांची जीवापुढें॥
भाविकांची वाणी समर्थ ऐकती।
निजखूण देती अंतरांत॥
दास म्हणे जैसा अंगी भक्तिभाव॥
तैसी तया भाव दृष्टी पडे॥

५२

कडकड कांपो माझें हे शरीर।
वाईट विचार मनीं येतां॥
परधनदारा नको पाहूं डोळां।
सन्मार्गासी आळा पडे तेणें॥
विरतवासी हात कोणी तो लावावा।
अनुभव घ्यावा तेचा क्षणीं॥
दिसे मनोहर वृंदावनफळ।
जिव्हागीं ओंगाळ किती लागे॥
पाहीं बरेंबुरें नीट पारखूनी।
आणावें सेवनीं प्रचारांत॥
बरी ती आपुली कष्टाची भाकर।
देवा निरतर देईं दासा॥

५३


मायबाप तुम्ही दयेचे सागर।
आलां भूमीवर काजासाठीं॥
वर्तनांत आला अधर्म सारखा।
आमुच्या हो दुःखा नसे पार॥
पहावें तिकडे वणवा लागला॥
पाय ठेवायला नसे जागा॥
हताश होऊनी शब्द हो निघाले।
सामोरे आणिले देवा तुझ्या॥
सोडवा वांचवा भक्तापांतूनी।
जगाची जननी सद्गुरू माय॥
काय म्यां पामरें आणिक बोलावें।
हितगुज ठावें दासाचें या॥

**या मासिकात प्रकाशित झालेल्या लेखांतील मतांशी संपादक सहमत आहेतच असे नाही.**

# श्री साईलीला – जून १९८८
## अनुक्रमणिका


| अ. क्र. | लेखाचे नाव | लेखक/कवीचे नाव | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|---|
| १. | संपादकीय | — | ४ |
| २. | द्वारकामाईत जळती धुनी... | —श्री. जी. आर. उदावंत | ७ |
| ३. | एकात्मतेचा वृक्ष – साईबाबा | —श्री. राजेंद्र गवळी | ८ |
| ४. | आद्य शंकराचार्य | —श्री. भालचंद्र गन्द्रे | १० |
| ५. | मानवी जीवन साफल्यासाठी श्री साईंचे कार्य | —श्री. अ. रा. सुर्वे | ११ |
| ६. | काय वर्णू मी साईंचा महिमा | —श्री. वि. म. हटवार | १३ |
| ७. | सदा साईभक्तिने धुंद असावे | —श्री. रमाकांत पंडित | १५ |
| ८. | श्री. संत राम मारुती महाराज | —साईनंद | १६ |
| ९. | साईश्याम माझा | —सौ. भावना जेऊरकर | १८ |
| १०. | निर्गुणाचा सगुण आविष्कार शिरडीचे साईबाबा | —श्री. नरसिंह चन्ना | १९ |
| ११. | श्री साईनाम | —श्री. अ. ना. गोसावी | २५ |
| १२. | श्री साई अभंग | —सौ. लीला सोनवणे | २६ |
| १३. | मी पाहिलेले श्री साईबाबा | —श्री. सुरेंद्र जयकर | २७ |
| १४. | श्री बाबा, हा अखेरचा संसार ठरो | —श्री. चकोर आजगांवकर | ३१ |
| १५. | खापर्डे यांची शिरडी दैनंदिनी | —साईनंद | ३३ |
| १६. | इति श्री साई उवाच | —श्री. डी. जी. देशपांडे | ३५ |
| १७. | श्री साई सहस्र नामावली | —श्री. संजीव चंदने | ३९ |
| १८. | ग्रंथपरीक्षण | —साईनंद | ४५ |
| १९. | दर्शनाभिलाषि | —सौ. सुमती गुप्ते | ४६ |
| २०. | बंगालच्या निराहारी योगिनी गिरिबाला | —ज्योति उमडेकर | ४७ |
| २१. | तुमचे भगवान दत्तात्रेया संबंधीचे सामान्यज्ञान किती आहे? | —श्री. सदानंद चेंदवणकर | ४९ |
| २२. | भाव तोचि देव | —श्री. गुरुनाथ पन्हाळकर | ५० |
| २३. | आत्मशांती | —सौ. अलका खाडे | ५१ |
| २४. | तुम्ही त्याला द्या, तो तुम्हास देईल | —श्री. श्रीकांत सावंत | ५२ |
| २५. | साईनामाचे कंकण | —सौ. विद्या सुलाखे | ५३ |
| २६. | महामुनी गौतमबुद्ध | —श्री. सत्यवान गायकवाड | ५४ |
| २७. | संतांनी ओळखलेले अग्नीचे महान तत्व | —श्री. हरिश्चंद म्हात्रे | ५९ |
| २८. | माझा जो जाहला काया वाचा मनी... | —सौ. विभावरी राणे | ६१ |
| २९. | मी साईबाबांची इच्छा | —श्री. बाळू वाघमारे | ६२ |
| ३०. | आज मी ब्रह्म पाहिले | —श्री. भालचंद गन्द्रे | ६३ |

## संपादकीय



# "उपास करू नका भरपूर खा"

— साईबाबा

'आधी पोटोबा आणि मग विठोबा' ही रोजच्या व्यवहारातील अगदी साधीसुधी म्हण आहे. परंतु रोजच्या व्यवहारात तिचा आचार जसा कटाक्षपूर्वक व्हायला पाहिजे तसा मात्र होत असलेला आढळून येत नाही. देहाला उपासतापास करून कष्टविले म्हणजे देव प्रसन्न होईल अशी पुष्कळांची कल्पना असते. कष्टाशिवाय काही साध्य नाही हे खरेच. माणसाने जास्तीत जास्त उद्योग करावा, एक क्षणही वाया दवडू नये. जर धनदौलत किंवा ज्ञान संपादन करावयाचे असेल तर शरीराला जरूर कष्ट द्यावे. परंतु आपल्या जीवात्म्याला भुकेमुळे कधीही कष्ट देऊ नयेत. अन्नमय प्राण म्हटले आहे ते उगाच नाही. मन नेहमी संतुष्ट व आनंदी असले पाहिजे. तरच देव आठवतो. त्याचे स्मरण होऊन त्याची भक्तीही घडते.

बाबांनी अगदी स्पष्ट भाषेत सांगून टाकिले आहे की, 'जया मनीं देव गवसावा। भाकरतुकडा आधी खावा। असल्यावीण समाधान जीवा। कैसेनि देवा उमगावे। भुकेल्या पोटीं देव सापडे। हें तो कल्पांतीही न घडे। उपासतापास यांचे सांकडे। चालेना इकडे साईसी।।

बाबांचा देवभक्तीचा मार्ग हा असा आहे. बाबांनी सांगितलेला हा मार्ग किती सुस्पष्ट व सोपा आहे! परंतु तो मार्ग सोडून जीवाला ताप व कष्ट देण्याचा मार्ग अनेकांकडून स्वीकारला जातो. देहाला कष्ट दिले, देह तापविला म्हणजे देवाला साकडे पडेल व मग देव पावेल. अशी कित्येकांची भोळी व वेडी समजूत असते परंतु बाबांनी तिच्यावर प्रहार केलेला आहे. ती तापदायी शिकवणूक त्यांनी खोडून काढिली आहे.

आपली सर्व इंद्रिये शाबूत पाहिजेत. देहाचे जरूर ते पोषण झाले पाहिजे, व होत राहिले पाहिजे. बाबा स्वतः कधी उपाशी रहात नसत. देहाचे सर्व व्यवहार नीट, सुरळीत चालले पाहिजेत. मनात समाधान वास करीत असले पाहिजे. उपोषण करणाऱ्याचे चित्त स्वस्थ राहणे कठीण असते. मनाला स्वस्थता पाहिजे. जरूर तेवढा आराम पाहिजे. तरच राम आठवतो. 'देव न लाधे रित्या पोटीं। आधीं आत्म्याची करा संतुष्टी।' हे बाबांचे वचन त्रिवार सत्य आहे. त्याचें आचरण व अनुकरण करण्यासाठी प्रत्येकाने झटले पाहिजे.

दुपारच। १८ भागविलीच पाहिजे. स्वतःची तशीच इतरांचीही! दुपारच्या वेळी कोणी दारी आला किंवा उपाशी तडफडणारा माणूस कोठेहि भेटला तर त्याची भूक

जरूर शांत करावी. त्यात मोठे पुण्य आहे म्हणतात ते उगाच नाही. 'भुकेल्या भाकर आधी द्यावी. असे बाबांनी वेळोवेळी सांगितले आहे नाही का?

पोटी नसता अन्नाचा गोळा। देव कवण्या डोळां पहावा। कवण्या वाचे महिमा र्णावा। कर्णे परिसावा तो कवण्या? असा बाबांचा सरळ सवाल आहे.

हे अन्न प्राण्याचे तत्वज्ञान स्वत: आचरणात आणून इतरांकडूनहि त्यांचे आचरण घडावे यासाठी बाबा परोपरीने झटत असत. जरूरीपुरतेच खावे. खाण्यात अतिरेक कधीही करू नये. जरूरीपुरते बोलणे व जरूरीपुरते खाणे. अर्थात मितभाषी व मिताहारी रहाणे हे तत्त्व आपल्या अंगी पूर्णपणे बिंबले पाहिजे. अघळपघळ बोलणे व अघळपघळ किंवा अतिरेकी खाणे हे अत्यंत हानीकारक आहे. ही दोन तत्वे मनावर बिंबवून जो वागेल तोच आपले जीवन सुखाचे व समाधानाचे करील.

एकदा एका गावाहून एक बाई बाबांच्या दर्शनासाठी आली. तिच्या मनात बाबा प्रसन्न करून घ्यावयाचे होते. जग रहाटीप्रमाणे किंवा सर्वसाधारण समजुतीप्रमाणे तिच्या मनाने घेतले की, आपण बाबांच्या दर्शनार्थ गेलो असता तेथे तीन दिवस उपोषण करून देह कष्टवावा म्हणजे बाबा संतुष्ट होतील व आपणास पावतील!

ती बाई ठरल्याप्रमाणे शिरडीस केळकर नावाच्या गृहस्थाकडे एक ओळखपत्र घेऊन आली. बाबांच्या पायाशी बसून बाबांचे नामस्मरण, उपोषण ह्या दोन्ही क्रिया एकदम आचरणात आणावयाच्या हे होते तिचे मनोगत, परंतु बाबा मनोगत ओळखणारे! त्यामुळे शिरडीत येताच ते तिचे मनोगत तिच्या जवळ राहिले व प्रत्यक्षात जे घडले ते वेगळेच!

बाई आल्या तो दिवस होता शिमग्याच्या सणाचा. केळकरांच्या घरी मुले-बाळे होती आणि घर मालकीण तीन दिवसांची रजा घेऊन बसली होती! त्यांच्या घरी त्या बाई आल्या व आपले गाठोडे त्यांच्या घरी ठेऊन व बरोबर आणलेले ओळखपत्र त्यांना देऊन त्या साईबाबांच्या दर्शनासाठी द्वारकामाईत गेल्या.

वर सांगितल्याप्रमाणे बाबांनी बाईंचे मनोगत ओळखले होतेच. बाई नमस्कार करून बसताच बाबा त्यांना म्हणाले, उपासतापास काय करायचे आहेत आपल्याला! अन्न म्हणजे परमेश्वर व माणूसही परमेश्वर स्वरूप! दोघांची ताटातूट करून कसं बरं चालेल! अन्न पाणी जीव जगविण्यासाठी व तो आनंदात राहण्यासाठी अत्यावश्यक आहे. त्याचा अव्हेर करून कसं बरं चालेल! योग्य वेळी, योग्य प्रमाणात त्याचा आदर आपण केलाच पाहिजे. तेव्हा तुम्ही ज्या दादा केळकरांच्या घरी उतरलां आहात. त्यांच्या घरी जा. त्यांच्या घरी अडचण आहे. आज आहे शिमग्याचा सण. आज पुरणपोळ्या करा. त्यांच्या मुलाबाळांना त्या खाऊ घाला व घरातील मंडळींबरोबर तुम्हीही पोटभर पोळ्या खा. त्यामुळे लहान थोरास आनंदी आनंद होईल. जेथे आनंद आहे तेथे देव आहे. जेथे शांतता व समाधान आहे, तेथे देव आहे. जेथे पोट भरल्यामुळे प्रफुल्लता अवतरली आहे तेथे प्रत्यक्ष भगवंत अवतरला आहे म्हणून समजा! आनंदाच्या दिवसात उपासतापासांचा व कष्टाचा मार्ग स्वीकारून का देव पावणार आहे?

हे अन्नाचे तत्त्वज्ञान ऐकून बाईला धक्काच बसला! कारण काय? बाबांनी बाईंचे मनोगत दृष्टिभेट होताच कसे ओळखले? आणि ते ओळखून बाबांनी भेट होताच भ्रमनिरास केला!

बाईंच्या डोक्यात चक्क प्रकाश पडला. त्यांना आपली चूक समजून आली. ती दुरूस्त करायची म्हणजे बाबांची आज्ञा पालन करायची. येथे दुसरा मार्गच नव्हता बोलण्यासारखे किंवा शंका विचारण्यासारखे काही शिल्लकच राहिले नव्हते.

मग बाईंनी काय केले? त्या बाबांना नमस्कार करून तेथून उठल्या आणि केळकराच्या घरी गेल्या व स्वयंपाकास लागल्या. मोठ्या आनंदाने व उत्साहाने त्यांनी पुरणपोळीचे जेवण केले. बाबांना नैवेद्य दाखविला. तो त्यांना पोहोचता केला व घरातील मुलांबाळांसह बाईंनी व सर्वांनी तो सणाचा दिवस समाधानपूर्वक साजरा केला.

केवढे थोर त्या बाईंचे भाग्य! तसेच भाग्य तुमच्या आमच्या व सर्वांच्या वाट्यास येवो हीच श्री साईचरणी अनन्यभावे प्रार्थना!.

**श्रीसाईंनी आपल्या अखेरच्या क्षणी सुध्दा आपल्या सभोवती जमलेल्यांना आता तुम्ही घरोघर जा. भोजन जेवण करा असे सांगून घरोघरी जाण्यास सांगितले आणि ते गेल्यानंतरच मग देहनिर्वाण केले. आपल्या अंतिम क्षणीसुध्दा भक्तांनी आपले प्रथम पोट भरावे असेच त्यांनी सुचविले होते नव्हे का! तेव्हा भक्तांनो, बाबा सांगतात त्याप्रमाणे उपासतापास काही एक करू नका, भरपूर खा व आपल्या जीवात्म्याला संतुष्ट करा.**

— जय श्री साईराम

## श्री साईलीलाच्या सभासदांस निवेदन

'श्री साईलीला' मासिकाचे नवीन सभासद होऊ इच्छिणाऱ्या व वर्गणी संपलेल्या जुन्या सभासदांनी आपली वर्गणी श्री साईबाबा संस्थान शिरडी, मुंबई कार्यालय, साईनिकेतन, ८०४ बी, खोदादाद सर्कल जवळ, दादर, मुंबई—४०० ०१४. येथे प्रत्यक्ष/मनीऑर्डरद्वारे भरावी. चेक पाठवायचा झाल्यास, तो 'श्री साईबाबा संस्थान शिरडी' या नावावर असावा. मनिऑर्डर कोणत्या कारणासाठी करीत आहात, त्याचा उल्लेख मनिऑर्डरवर करणे आवश्यक आहे. मनिऑर्डरवर 'संदेश के लिए स्थान' आणि 'भेजनेवाले का नाम व पूरा पता' असे नमूद केलेले असते, त्या दोन्ही ठिकाणी सभासदानी आपले नाव व पूर्ण पत्ता लिहावा.

* श्री साईलीलाच्या संदर्भात पत्र-व्यवहार करताना, श्री साईलीलाच्या जुन्या सभासदांनी त्यांचा सभासद क्रमांक नमूद करणे आवश्यक आहे.
* श्री साईलीलाच्या सभासदांनी आपली वर्गणी संपण्यापूर्वी किमान एक महिना अगोदरच भरल्यास अधिक सोयीचे होईल.

# द्वारकामाईत जळती धुनी अन् समया।
# ऐका हो, माझ्या साईमाऊलीची ही अगाध किमया।

– श्री. जी. आर उदावंत
द्वारा त्रिमूर्ती इलेक्ट्रिकल्स्,
मु. पो. शिर्डी, ता. कोपरगाव,
जि. अहमदनगर.

सन १९८६ च्या सप्टेंबर महिन्यामध्ये मला चेहऱ्याचा लकवा (Bells Palsy) झाला होता. चेहऱ्याच्या डाव्या बाजूची थोडीदेखील हालचाल होत नव्हती. डाव्या डोळ्यातून सतत पाणी येत असे आणि तो पूर्णपणे बंदही होत नव्हता. सुरूवातीला त्याकडे दुर्लक्ष केले परंतु काही दिवसांनी हा त्रास वाढतच गेला. हा अनुभव मला अगदी नवखा होता. कशामुळे हा त्रास होत होता, याची काहीच माहिती नव्हती. तज्ज्ञ डॉक्टरांकडे मी गेलो. त्यांनी सांगितले की, हा आजारच असा आहे की त्यावर त्वरित इलाज केले, तरच तो बरा होतो, अन्यथा त्यात सुधारणा होणे असंभव! मला मात्र डॉक्टरांकडे पोहोचण्यास सुमारे एक महिना उशीर झाला होता. त्यानंतर दोन ते अडीच महिने डॉक्टरांचे औषधोपचार चालू होते. शॉकट्रिटमेंट घेतली. सर्व प्रकारचे योग्य ते इलाज केले. परंतु त्रास काही कमी होत नव्हता. सुरूवातीपासून श्रीसाईबाबांच्या द्वारकामाईतील समयांमधील तेल चेहऱ्यास लावत असे. तसेच रोज पाण्याबरोबर श्रीसाईची उदी प्राशन करीत असे. डॉक्टरांनी सांगितले की, आणखी काही दिवस औषधे घ्या. त्याने फरक पडला नाही तर कानाच्या मागे ऑपरेशन करावे लागेल. डावा डोळा पूर्ण बंद होत नव्हता, त्यामुळे त्यांनी डोळ्यांच्या डॉक्टरांकडे पाठविले. ते म्हणाले की, तुम्हाला माझ्याकडे येण्यास खूपच उशीर झाला आहे. त्यांनी देखील योग्य ती औषधे लिहून दिली आणि सांगितले की, एवढ्याने फरक पडला नाहीतर डोळा बंद होण्यासाठी डाव्या डोळ्याच्या डाव्या बाजूला काही दिवसांनी ऑपरेशन करावे लागेल. परंतु त्या औषधांनी काहीच फरक पडला नाही, कारण वेळ निघून गेली होती. आतापर्यंत दोन डॉक्टरांनी दोन वेगवेगळ्या शस्त्रक्रिया सांगितल्या होत्या. आवश्यक असे सर्व प्रकारचे औषधोपचार करूनदेखील त्रास कमी झाला नव्हता. चेहरा व्यवस्थित झाला नव्हता. त्यामुळे मी घरीच होतो. निराश अवस्थेत! त्या काळात मात्र एकच इलाज चालू होता आणि तो म्हणजे बाबांची उदी दिवसातून दोन-तीन वेळेस पाण्यातून घेणे.

नंतर एकाएकी नवीनच आजार उद्‌भवला. जणू काही आजारांचे दुष्टचक्रच चालू झाले होते. माझ्या सर्व अंगास सूज येऊन हातपाय जोरजोरात ठणकू लागले. काहीच करता येत नव्हते. ठणक्यांमुळे पाण्याने भरलेला तांब्यासुध्दा उचलत नव्हता. वेदना इतक्या होत होत्या की, चेहऱ्याच्या आजाराकडे अजिबात लक्ष राहिले नव्हते. त्याचे भानही राहिले नव्हते. डॉक्टरांकडे गेलो. त्यांनी आठ आठ दिवसांच्या अंतराने

औषधे-गोळ्या लिहून दिल्या. त्याचबरोबर श्रीसाईंची उदी पाण्यातून घेणे, अंगास लावणे व द्वारकामाईतील समयांमधील तेल लावणे नित्यदिनी चालूच होते. सुमारे एक महिन्यात सूज आणि ठणक थोडी-थोडी कमी होत गेली. मात्र अंग दुखण्याच्या काळामधे चेहरा केव्हा पूर्ववत् झाला, ते मलाच सांगता येणार नाही. डावा डोळादेखील पूर्णपणे बंद होऊ लागला. चेहऱ्याच्या आजाराशी संबंधित औषधोपचार यापूर्वीच करून सुध्दा चेहरा व्यवस्थित होऊ शकला नव्हता. तो अनाकलनीयरित्या पूर्ववत झाला. दुर्दैवाने तज्ञ डॉक्टरांकडे पोहोचण्यास उशीर होऊनसुध्दा चेहऱ्याचा त्रास विना ऑपरेशन पूर्णपणे कमी झाला. एकही ऑपरेशन करावे लागले नाही. ही आश्चर्याचीच बाब होय! ही श्रीसाई माऊलीची किमया नव्हे काय! होय नक्कीच. कारण तेच तर ह्या विश्वाचे रक्षणकर्ते. त्यांच्याशिवाय आपणास कोण तारू शकणार? बाबांची लीला बाबाच जाणोत. माझी मात्र पूर्ण खात्री झाली की, बाबांनीच आपल्याला त्यांच्या कृपा छत्राखाली घेतले आहे. श्री सर्व काही कर्तेकरविते आहेत, जगपालक आहेत.

श्रींच्या कृपेने असाध्य गोष्टी देखील साध्य होऊ शकतात. त्यासाठी श्रींच्याविषयी आपली श्रद्धा कायमस्वरूपी बळकट असावयास हवी. मनामध्ये कुठल्याही प्रकारचा संदेह असू नये. अहंभाव असू नये, त्यांच्यावर अढळ निष्ठा असावी. त्यांच्या शिकवणुकीचे आपण आपल्या परीने होईल तेवढे पालन करीत राहावे, ते वेळोवेळी आपल्या संकटसमयी धावून येतातच, ही बाब अगदी निःसंदिग्ध आहे, हे पक्के लक्षात ठेवावे. त्यांच्याकडे आपण एकच मागणे मागावे,

हेचि दान दे गा देवा, तुझा विसर न व्हावा.

# एकात्मतेचा वृक्ष – साईबाबा

– श्री. राजेंद पांडुरंग गवळी
श्री साईबाबा संस्थान, शिरडी,
लेखा शाखा विभाग, ता. कोपरगाव,
जिल्हा – अहमदनगर.

साईबाबा नमोस्तुते

संपूर्ण भारतातील शिर्डी एक असे धार्मिक क्षेत्र आहे की, तिथे अनेक जातीचे, समाजाचे एवं धर्माचे भक्त येतात. मग या क्षेत्राला धार्मिक क्षेत्र म्हणता येईल का? हो, तसे ते धार्मिक क्षेत्र आहे. पण आज देशाच्या पातळीवर खऱ्या स्वरूपाचे गूढ कोणते आहे? खरे, शिर्डीचे श्रीसाईबाबा हे एक एकतेचे प्रतीक आहे, असेच म्हणावे लागेल. श्रद्धा आणि सबुरीच्या सांकेतिक झेंड्याखाली त्यांनी सर्वांना एकत्र केले. श्रीसाईबाबांनी

कुणी श्रेष्ठ वा कनिष्ठ, उच्च-नीच, जात-पात याचा विचार केला नाही. बाबांनी जाताना म्हणजेच शेवटी १२ वचने सांगून जगाला/भक्तांना उपदेश केला आहे. त्यात साईबाबांचे सगळ्यात महत्वाचे वचन म्हणजे

जो जो मज भजे जैसा जैसा भावे। तैसा तैसा पावे मीही त्यासी

किंवा बाबांनी नित्य जिवंतपणाची ग्वाही दिलेली आहे. प्रत्येक अडचणीसाठी ते नेहमी पुढे सरसावतील आणि ते पुढे म्हणतात, नित्य मी जिवंत जाणा हेचि सत्य! खरोखरच भक्तांना तो अनुभव आलेला आहे आणि येतोय. गीताईत असे म्हटलेले आहे–

अनन्यभावे चिंतूनि भजती भक्त जे मज।

सदा मिसळले त्यांचा मी योगक्षेम चालवी॥ गीताई

जे भक्त एकनिष्ठ होऊन माझे चिंतन करतात व मला भजतात,अशा त्या सदैव माझ्या ठायी स्थिरचित्त असलेल्या योगक्षेमी चालवतो. साईबाबांमुळे आज शिर्डीत एकतेचा ध्वज फडफडत आहे, तो अप्रत्यक्षपणे. साईच्या दरबारात हिंदू असो, मुस्लीम असो, खिश्चन असो किंवा कुणी असो, ते सारे एकाच भावनेने, एकाच श्रध्देने साईंना पूजतात, भजतात. फक्त हवी श्रद्धा आणि सबुरी. साई सर्वभूतांशी समत्वाने वागणारा असा एक ईश्वर आहे. तो प्रिया-प्रेयातील आहे. भक्तीने भजायला हवे. परमात्मा सर्वव्यापक, अनंत आहे. खरे सांगायचे म्हणजे,साईबाबा हे एकात्मतेची - दैवी शक्ती आहे. कुणीही श्रेष्ठ/कनिष्ठ सगळे भान विसरून जातात आणि आधुनिक प्रबोधन ही काळाची खरी गरज आहे. अजून गतकालीन आठवायचे झाल्यास संत ज्ञानेश्वरांनी शेवटचे एक मागणे केले आहे. परमेश्वराला विनवित ते कल्याणाचे व सुखाचे पसायदान मागतात. ते सुद्धा जगाचे कल्याण व्हावे, दुरितांचे तिमिर दूर पळावे आणि स्वधर्माचा ज्ञानाचा सूर्य तळपावा.तसेच साईनी देशाला/जगाला आपल्या आध्यात्मिक धड्यातून राष्ट्रीय एकता अप्रत्यक्षपणे साधली आहे. मग साईबाबा हे राष्ट्राचे द्योतक आहे. एकतेचा मूळ पाया आहे. मूळ बीज आहे. आणि या बीजाला अंकूर फुटून सर्वत्र एकतेचा, समतेचा आणि माणुसकीचा (भूतदया) वृक्ष उभा केला. या विशाल (गुणकारी) गोड फळांचा वृक्ष मात्र आता सगळीकडे भक्तांना एकतेचा रस चाखावयास दिला. फळे खाण्यास प्रवृत्त केले. अशा फळांचा सगळ्यांना एकच आस्वाद देऊ केला. आज जातीयवाद - समाजवाद - वंश - वर्गवारी भेदभाव असणाऱ्या देशाला असा एकच वृक्ष लाभलेला आहे आणि एकात्मतेचा तो वृक्ष म्हणजेच साई. त्याचीच श्रद्धा आणि सबुरी ही दोन एकाच झाडावरच्या फांद्या आहेत. ज्ञानापेक्षा भक्तीला अधिक महत्व आहे. स्वार्थ बाळगू नका. स्वार्थाला रजा द्या. भक्तीला जवळ करा. भक्ती बरोबर ज्ञानाची वाढ होते आणि भक्तीमधूनच श्रद्धा निर्माण होते. त्याचे फळ म्हणजे यश होय. परिपक्व फळ हवे असेल तर सबुरीचा धडा त्यांनी सांगितला आहे. "सबर रख बंदे" असे ही साईंनी भक्तांना म्हटलेले आहे. असा हा एकत्र जमविणारा वृक्ष म्हणजे साई. ब्रम्ह बिजांचा झाला एकतेचा अंकूर.

# आद्य शंकराचार्य

– श्री. भालचंद केशव गन्दे
सुख निवास, चेंदणी, ठाणे (प.)

हिंदुधर्माची ध्वजा भारतभर फडकविणारे आद्य शंकराचार्य, यांना लहान वयातच वैराग्याची ओढ लागली. संन्यास घेण्यासाठी त्यांनी वयाच्या अवघ्या आठव्या वर्षीच आईची आज्ञा मागितली, पण आईला **सूनमुख** पहायची इच्छा होती. ती परवानगी देईना व तिच्या इच्छेविना संन्यास घेणे, **शंकराचार्यांनाही** योग्य वाटेना.

एकदा त्यांची आई 'आर्यांबा' त्यांना नदीवर स्नानास घेऊन गेली. शंकरचे मित्रही बरोबर होते. आईचे स्नान आटोपले. मात्र शंकर नदीच्या पात्रात आत पोहत पोहत मध्यभागी पोहचताच एका मगरीने त्याचा पाय पकडला. शंकर तेथूनच 'मेलो-मेलो' असे मोठ्याने ओरडू लागला. मगर पाय सोडीत नाही, हे पहाताच तो तेथूनच ओरडून आईला म्हणाला– "मी आता मरणार - मगर माझा पाय सोडीत नाही, तेव्हा निदान मरता-मरता तरी मला संन्यास घेण्यास परवानगी दे – ही माझी शेवटची इच्छा समज. जर मला संन्यास घेण्याची परवानगी दिलीस तर मी सुटण्याचा प्रयत्न करतो, न पेक्षा तुझ्या शंकराचा तुला येथूनच शेवटचा नमस्कार." शंकरचे ते बोल ऐकून आईचे हृदय हेलावले– मुलाचे प्रत्यक्ष मरण पहाण्यापेक्षा त्याला संन्यास घेण्यास परवानगी देऊन जगण्याचा मार्ग मोकळा करून देण्यासाठी तिने नाईलाजास्तव त्याला संन्यास घेण्याची पूर्ण संमती दिली. तिची संमती मिळताच शंकराचार्यांना अतिशय आनंद झाला. त्यांनी जबरदस्त जोर लावून पाय झटकला व मगरीच्या मिठीतून आपली सुटका करून घेतली.

त्यानंतर काही दिवसांनी शंकराचार्यांनी आईची आज्ञा घेऊन, संन्यास घेण्याची इच्छा प्रगट केली. आईला रडू कोसळले. ती म्हणाली, 'बाळ तू गेल्यावर माझी सेवा कोण करणार? माझे अंत्यकर्म कोण करणार? मला गती कशी मिळणार?

तिच्या ह्या प्रश्नांवर शंकराचार्य म्हणाले, "तुला काही कमी पडणार नाही, याची मी व्यवस्था करून जातोय व तुझा शेवट जवळ आला आहे, असे वाटले तर माझी नुसती आठवण काढ-की मी लगेच तुझ्यापाशी हजर होईन - काळजी करू नकोस."

संन्यास घेतल्यावर शंकराचार्य नंतर खूप फिरले. साऱ्या सृष्टिसौंदर्याचा आस्वाद घेत-घेतच गुरुकृपेने ते सर्व विद्येत अगदी तरबेज झाले. त्यांच्या बुध्दिचातुर्याने व ज्ञानाने सर्व लोक थक्क होऊ लागले. एकदा योगासन घालून समाधी लावली असता त्यांना आईचा आर्त स्वर ऐकू आला. त्यांना आईची तीव्रतेने आठवण झाली नि तिला दिलेला शब्द खरा करण्यासाठी ते तडक परत निघाले. त्यांच्या दृष्टीने आई म्हणजे मूर्तिमंत जिव्हाळा, दयेचा सागर, निरपेक्ष प्रेम, वात्सल्यमूर्ती, जीवाचा विसावा, प्रेमाची पाझर होती. आपल्या आजारी आईसमोर ते दत्त म्हणून उभे राहिले.

आपला बाळ दिल्या शब्दाप्रमाणे परत आला, हे पहाताच त्यांच्या आईला अत्यानंद

झाला. ती म्हणाली– "बाळ, माझी आता काही इच्छा उरली नाही - माझा मुलगा म्हणून माझा अंत्यसंस्कार मात्र तूच कर." शंकराचार्यांनी, "तू त्याची चिंता करू नकोस. मीच तुला अग्निसंस्कार करीन", असे तिला वचन दिले.

थोड्याच दिवसांत त्यांच्या आईस देवाज्ञा झाली. सर्व लोक जमले व अग्निसंस्कार कोण करणार, असा प्रश्न विचारू लागले. "तू संन्यास घेतला आहेस - संन्याशाला गणगोत्र शिल्लक रहात नाही. म्हणून तो अधिकार तुला घेता येणार नाही", असे शंकराला सारे म्हणू लागले.

परंतु शंकराचार्यांनी त्यांना विरोध केला. त्यांनी सांगितले– "संन्याशाची सर्व नाती तुटली तरी आईचे नाते तुटत नाही. शिवाय मी तिला वचन दिले असल्याने, मीच तिला अग्नि देणार."

त्यांचे हे भाष्य ऐकल्यावर सर्व गावकरी बहिष्कार टाकून परत गेले. मात्र आचार्यांनी कुणाची पर्वा केली नाही. त्यांनी आईला दिलेल्या शब्दाप्रमाणे स्वहस्ते चिता रचून तिला अग्नी दिला व मातृऋण आणि वचनपूर्ति ह्यांची पूर्तता केली.

# मानवी जीवन साफल्यासाठी श्रीसाईंचे कार्य

**– श्री. अ. रा. सुर्वे**
२/५, चित्तरंजन नगर,
राजावाडी, घाटकोपर,
मुंबई - ४०००७७.

साईबाबांच्या कार्याचा मानवी जीवन साफल्यासाठी सखोल मनाने तत्कालिन गोष्टीचा विचार लक्षात घेतल्यास आपणास असे आढळून येइल की, श्रीकृष्णाने भगवद्गीतेत सांगितल्याप्रमाणे "यदा यदा हि धर्मस्य ग्लानिर्भवति भारत।
अभ्युत्थानमधर्मस्य तदाऽऽत्मानं सृजाम्यहम्।।
परित्राणाय साधूनां विनाशाय च दुष्कृताम्।
धर्मसंस्थापनार्थाय संभवामि युगे युगे।।

ह्या स्वयंभू वाणीची प्रचिती साईच्या अवतार निर्मितीने आपणास प्रखरतेने आढळून येते. मानवी जीवनाचा अभ्यास करताना आपणास असे दिसून येईल की, प्रत्येक जन आपल्या पूर्व जन्मीच्या पापपुण्याईने ह्या जगात सुख अगर दुःख भोगीत असतो. आपले जीवना सुखी करण्यासाठी प्रत्येक मानवाची सारखी धडपड चाललेली असते. आपले जीवन सुखी करण्यासाठी तो कशाचा तरी आधार घेत असतो. कोणी शिक्षण, कला, मंत्रतंत्र व देवता यांचा आधार घेऊन आपले जीवन सुखी करण्याचा

प्रयत्न करीत असतो. इतके करूनही तो सुखी होईलच, हे सांगता येत नाही. आपल्या भारत भूमीत अनेक विद्वान तत्ववेत्यांनी धर्माचा आधार घेऊन मानवी जीवन सुखी करण्यासाठी वाङ्मयाद्वारे शिक्षण देण्याची फार मोलाची कामगिरी केलेली आहे. वाङ्मय निर्मिती करताना बहुजन समाजाचा विचार लक्षात घ्यावा लागतो. आपले मनोगत व खरेखुरे ज्ञान साध्या व सोप्या भाषेत सर्वसामान्य जनतेला समजले पाहिजे. तरच तो त्याची विचार सरणी प्रत्यक्ष कृतीत आणण्याचे अवलंबन करील. गाढे ग्रंथ लिहून जर सामान्य मनापर्यंत पोहचले नाहीत तर अशा वाङ्मयाचा काय उपयोग? बहुसंख्य समाज दुःखीच राहणार व म्हणूनच साईंनी अवतार धारण करून बहुजन समाजाला आपल्या प्रत्यक्ष आचरणाने भक्तीमार्गाच्या उपदेशाचे अमृतसिंचन केले. साईंनी इतर संतांसारखी वाङ्मयनिर्मिती केली नाही. पण आपल्या प्रत्यक्ष कृतीने जे इतर संतांना करता आले नाही, ते त्यांनी केले व सामान्य समाजाला/जनतेला सुस्थिर व सुखी करण्याची बहुमोल कामगिरी त्यांनी केली. म्हणूनच आज कोट्यावधी भक्त साईचे पाईक बनले आहेत. साध्या, सरळ मनाने अंतःकरणपूर्वक जनतेला खरेखुरे सुखी करण्याचा बाबांनी निर्वाज्य मनाने प्रयत्न केला. "जे का रंजले गांजले। त्यासी म्हणे जो आपुले॥ तोची साधू ओळखावा। देव तेथेचि जाणावा॥" स्वतःच्या आचरणाने संत तुकारामाच्या अभंगाची खरीखुरी प्रचिती साईंनी बहुजन समाजाच्या बाबतीत खरी करून दाखविली. संत वाङ्मयाने व प्रचाराने मानवी मनाचे त्वरित परिवर्तन होण्यास सुलभ होते.

साई हे अवतारी पुरुष होते. श्रीकृष्ण, राम इत्यादिकांनी पृथ्वीवर अवतार घेऊन दुष्टाचा संहार शस्त्रबलाने केला व जनतेला दुष्टप्रवृत्तीच्या अमानुष जाचातून मुक्त केले. साईंनी ईश्वरी अवतार घेऊन शस्त्रांशिवाय दुष्ट प्रवृत्तीच्या मनाचे परिवर्तन केले. केवळ आपल्या चांगल्या आचरणाने दुष्ट प्रवृत्तीला आळा घालून खऱ्या माणुसकीचे जीवन जगण्याचे त्यांनी जनतेला शिक्षण दिले. यातच त्यांच्या अलौकिक कार्याची किमया दिसून येते. साईंनी स्वतः कीर्तने केली नाहीत, व्याख्याने दिली नाहीत अथवा वाङ्मय लिहून ठेवले नाही. तरीही आज त्यांचे कोट्यावधी भक्तगण आहेत की साईंना प्रत्यक्ष राम-कृष्ण-हरी असे समजून बाबांच्या भक्तीत तल्लीन होतात. साईंच्या खऱ्या भक्तीमार्गाची पताका परमोच्च शिखरावर फडकत आहे. कारण "सत्यमेव् जयते" अशा ह्या अजानबाहूची एकनिष्ठ मनाने सेवा केल्यास भक्ताला सुखाचा मार्ग दाखविल्याशिवाय राहणार नाही. साईंनी म्हटलेले आहे— "जो जो मज **भजे जैसा जैसा। तैसा तैसा पावे मीही त्यासी॥**

# काय वर्णू मी साईचा महिमा!

**श्री. वि. म. हटवार**
१४९, रेशीमबाग, नागपूर-९.

श्रेष्ठ संतांचा महिमा वर्णन करणे कठीण आहे. श्रीसंत साईनाथ भक्तांचा योगक्षेम चालवितो. भक्तांची सर्व चिंता संताला असते. याकरिता साईनाम कंठात धारण केले पाहिजे. संतांचा महिमा वर्णन करणे वाणीला अवघड आहे. संतश्रेष्ठ तुकाराम महाराज भक्तांना सांगतात :—

काय वाणू आतां न पुरे हे वाणी
मस्तक चरणी ठेवीतसे॥१॥
जगाच्या कल्याणा संतांच्या विभूति
देह कष्टविती परउपकारे॥२॥
भूलांची दया हे भांडवल संता
आपुली ममता नाही देही॥३॥
काय सांगो आता संतांचे उपकार
मज निरंतर जागविती॥४॥
तुम्ही संत मायबाप कृपावंत
काय मी पतित कीर्ती वाणू॥५॥
अवतार तुम्हा धराया कारण
उद्धरावे जन जड जीव॥६॥

ईश्वराचे गुणगान व चरित्र वर्णन करणे शक्य होईल, परंतु संतांचा साक्षात्काराचा महिमा व संतलीला वर्णन करता येणे शक्य नाही. थोर संतांचा महिमा प्रत्यक्ष पाहून सुद्धा शाब्दिक वर्णन करण्यास योग्यता पाहिजे. आध्यात्मिक भाषेत असे म्हणता येईल की, पारमार्थिक स्वतः संत झाल्याशिवाय संतमहिमा कळत नाही. देवादिकांना सुद्धा तो महिमा कळणे कठीण। एवढे महात्म्य संतांचे आहे. दीनदुबळ्यांचे कल्याण करून त्यांचा उद्धार करण्यास संत अवतार घेतात. तुकोबाराय म्हणतात :—

त्यांचा महिमा काय वर्णू मी पामर।
न कळे तो साचार ब्रम्हादिका॥

श्री ज्ञानेश्वर महाराज सद्‌गुरुंचे महात्म्य शब्दांनी वर्णन करणे कठीण आहे, असे सांगतात. श्री एकनाथ महाराज म्हणतात, वाटेल त्या अशक्य गोष्टी शक्य होतील परंतु संत महात्म्य कळणार नाही. ते वर्णन करण्यापलिकडचे आहे.

भूत भविष्य कळो येईल वर्तमान।
परी त्या साधूचे न कळे महिमान॥

संतांचा अधिकार फार मोठा आहे. माणसाचा जन्म व संतांचा अवतार असतो. जन्म आणि अवतार यांत फार अन्तर आहे. जन्म हा पूर्वकर्मानुसार तर अवतार

स्वेच्छामय आहे. अवतार कर्मानुसार नाही. इतर जीवांप्रमाणे कर्माच्या फेऱ्यांत ते फिरत नसतात. काळाची सत्ता त्यांच्यावर चालत नाही. जनकल्याणाच्या कार्याच्या समाप्तीनंतर इच्छेनुरूप देहत्याग करून ते समाधिस्त होतात.

संतांच्या कृपेने स्थूल बदलत नाही. श्रेष्ठ संत आपल्या कृपाकटाक्षाने भक्ताचे अंतरंग बदलत असतात. भक्ताला कृतार्थ करतात. व्यावहारिक आप्त हे खरे आप्त नसतात. कारण ते सर्व आपलेच सुख पहाणारे असतात. ते साधले नाही तर आप्त दूर जातात. संसारिक व्यवहारात गुरफटलेल्या व मी आणि माझे म्हणणाऱ्या आंधळ्या जीवांना मार्गदर्शक संत हेच आहेत. संतांनी अवतार घेऊन हेच कार्य केलेले आहे. मनुष्याला जन्ममरणाची निवृत्ती झाल्याशिवाय दुःखातून सुटका नाही. या जन्ममरणात्मक संसारास कारण मनुष्यास स्वस्वरूपाचे पूर्ण अज्ञान हे आहे. जे पाहिजे ते आत्मज्ञान नसल्यामुळे संसार प्रिय वाटतो आणि पारमार्थिक कार्याची आस्था नसते.

श्रीसाईबाबांचे वैराग्य लहानपणापासून म्हणजे वयाच्या १६ व्या वर्षी शिर्डीला प्रकट झाले तेव्हापासून होते. ज्यासी सर्वत्र ईश्वरमय जगताचा साक्षात्कार असतो, ते निर्भयपणे कुठेही वावरतात. पायांत नसे जोडा ना वहाण, एक आसन गोणाचे आणि तंबाखू चिलीम हा काय तो संग्रह!असे तारुण्यपण होते. रात्री शिर्डीच्या पडक्या जुन्या मशिदीत निजावे. घरोघरी जाऊन ओली कोरडी भाकरी ही नित्याची माधुकरी, नसे कशाची चाड, धुनी चेतवून अहंकार वासनेची आहुती द्यावी आणि मुखाने सदैव अल्ला- मालिक हा मंत्र जप,अशी बाबांची स्थिती होती. बाबा स्वतःचे काम स्वतःच हौसेने करीत असत. स्वये मशीद सारवती, कफनी लंगोट शिवती आणि भेटीस आलेल्या भक्तास दक्षिणा मागती,असा साईचा तरुणपणीचा आध्यात्मिक प्रपंच होता. दक्षिणेच्या पैशातून तंबाखू आणि दिव्यासाठी तेल आणीत, पडक्या मशिदीची डागडुजी खर्च आणि गोरगरीबांना मदत करीत. बाबांच्या उतार वयात नैवेद्याचे ताट येऊन देणग्या तसेच दक्षिणाही जास्त येताच उत्सव साजरे होऊ लागले. दिव्यांची रोषणाई होऊ लागली. अशी बाबांची महती वाढून निष्ठावान भक्तांनी श्रीसाईनाथास गंध लावून, आरती करण्यास सुरुवात झाली. भक्तांनी बाबांच्या मिरवणुकीस चांदीने मढवलेली पालखी, छत्र, चामर, वाजंत्री, घोडा, चोपदार, भरजरी शिरपेच, मखमली अंगरखा इ. तयार केलीत. श्रीसाईबाबांचा प्रसाद उदीचा होता. उदीने भक्तांच्या सर्व दुःखाचा परिहार होऊन श्रद्धेने लोक बाबांच्या दर्शनास दररोज येऊ लागले. त्यांच्यासमोर मोठा–लहान, गरीब–श्रीमंत, ज्ञानी–अज्ञानी असा भेद नव्हता. श्रीसाईबाबांनी कोणालाही शिष्यत्व प्रदान केले नाही. सर्व ईश्वराची लेकरे आहेत व सामुदायिक जीवनात सर्वांनी एकमेकांस सहाय्य करून समाधानाने जगावे,असे त्यांचे भक्तांना सांगणे होते. साईने भक्तांना सद्‌गती देऊन कृतार्थ केल्यामुळे शिर्डीस संस्थानचे स्वरूप प्राप्त झाले. पारमार्थिक उन्नती साधणे हा एकच भक्तांचा उद्देश असावा. असे त्यांचे उपदेशपर सांगणे असल्यामुळे सर्व धर्म व पंथांच्या लोकांनी

श्रीसाईबाबांची पूजा श्रद्धेने केली. कोणताही उत्सव सर्वांनी एकत्र येऊन कसा उत्तम तऱ्हेने साजरा करावा, याची शिकवण त्यांनी साईभक्तांना दिली. ईश्वराची प्राप्ती करून घेण्यास अनन्य भक्तीची आवश्यकता आहे. त्यामुळे साईनाम संकीर्तनास जास्त महत्व प्राप्त झाले. निष्ठावान भक्त श्रीसाईरामाजवळ प्रेमपूर्वक कृपादान मागतात. साई सर्वांना संतोष देतात.

श्रीसाईनाम-जपास फार महत्व आहे. भक्त सगुण साईमूर्तीचे ध्यान करून भक्तीमार्गात सदा आनंदित व प्रपंचामध्ये शक्य असेल तेवढे मौन ठेवून उदासीन असतो, परमार्थाचा पथिक होतो. 'ज्ञानदेव म्हणे सगुण हे ज्ञान, नाम पाठमौन प्रपंचाचे। हरिवंशपुराण हरिनाम संकीर्तन, हरिविण सौजन्य नेणे काही। मनोमार्गे गेला तो तेथेचि मुकला, हरिपाठी गेला तोचि धन्य॥

नाम आणि संकीर्तन हीच भक्ताची पूजा आहे. प्रत्येकाच्या मागे प्रपंच लागलेला आहे, पण केवळ प्रपंचात आसक्ती नसावी. ज्याला प्रपंच समाधानाने नेटका करून परमार्थाचीही गोडी आहे, तो खरा सुखी असतो. आपले कर्तव्य प्रामाणिकपणे केल्यावर काळजी करू नये व सदाचाराने वागणे सोडू नये. प्रपंच सुखाने करावा पण त्यातही भगवंताचे अधिष्ठान असावे, हा श्रीसाईनाथाचा संदेश आहे. प्रपंच परमार्थाच्या आड येऊ नये, अशा युक्तीने साईभक्तांनी वागावे, हाच साई उपदेश आहे. साईभक्ती श्रेष्ठ भक्तीमार्ग आहे. ज्ञान, कर्म, योगापेक्षा आत्मकल्याणाचा सोपा व सरळ मार्ग आहे.

# सदा साईभक्तिने धुंद असावे

विश्व पसारा साईचा सर्वांमध्ये वास तयाचा
स्मरूनी श्रीसाईप्रभूला गिरवू धडा समानतेचा
भक्ति गंध घ्यावा अंतरी असा जन्म पुन्हा नाही यावयाचा
सदा साईभक्तीने धुंद असावे हा अर्थ असे जगण्याचा

या जगी भरवसा धरू नये आपले म्हणून कोणाचा
जन्म मृत्यू ना चुकला कुणाला जन्मी आला तो जायाचा
कुणी कुणाचे नाही येथे जो तो असे ज्याचा त्याचा
सदा साईभक्तीने धुंद असावे हा अर्थ असे जगण्याचा

श्रीसाईने दिला संदेश जगाला श्रद्धा सबुरीचा
जीवनाच्या निरंजनात अखंड तेवू द्या दीप श्रद्धेचा
साई नाम हाचि मंत्र दावील मार्ग तो मोक्षपदाचा
सदा साईभक्तीने धुंद असावे हा अर्थ असे जगण्याचा

**– श्री. रमाकांत पंडित**
माटुंगा, मुंबई – १९.

# साईदरबारातील माणिक आणि मोती – ७

## श्रीसंत राममारूती महाराज

**– साईनंद**



श्रीसंत राममारूती महाराज नावाचे एक लोकोत्तर पुरुष ठाणे, कल्याण, भिवंडी या परिसरात एकोणीसाव्या शतकाच्या अखेरीस व विसाव्या शतकाच्या पूर्वार्धात होऊन गेले. ते श्रीसाईबाबांचे समकालीन होते. सद्‌गुरू राममारूती महाराज नाथपंथीच होते. या महान संताच्या स्मरणार्थ दादर, ठाणे, कल्याण येथील रस्त्यांना त्यांची नावे देऊन त्यांची स्मृती भाविकांनी अजरामर करून ठेवली आहे.

भगवान श्रीसाईबाबा यांना राममारूती महाराज गुरूवत् पूज्य मानीत व बाबा आदिनाथ आहेत, असे ते वारंवार म्हणत, इतकेच नव्हे तर कित्येकदा श्रीसाईनाथ हे आमच्या पंथातील परास्पर गुरु होत, असे महाराजांनी म्हणून दाखविले आहे. महाराज म्हणत की, सद्‌गुरू बालमुकुंदस्वामी हे आमचे सद्‌गुरू खरे परंतु नाथपंथातील आद्यगुरू श्रीसाईनाथ हे आम्हास आदिनाथाच्या ठिकाणी होत.

भगवान श्रीसाईबाबा आणि श्रीराममारूती महाराज यांची जेव्हा भेट झाली, त्यावेळच्या प्रसंगाचे वर्णन मोठे बहारीचे आहे. या भेटीच्या प्रसंगी श्रीसाईनाथांचे वर्तन एक संत दुसऱ्या संतास भेटतो, असे नसून गुरुशिष्यांच्या भेटीपासून उत्पन्न होणाऱ्या आनंदाचा उपभोग साईनाथ घेत असत. श्रीराममारूती अगदी लहानपणी श्रीसाईबाबांना भेटले होते. परंतु १९१० साली या उभयतांची शिर्डी येथे भेट झाली. श्रीसंत राममारूती बाबांना भेटण्यास जाण्यापूर्वी बाबा आपल्या भक्तगणांना म्हणाले

होते की, "माझा भाऊ मला भेटण्यास येत आहे," व पुढे विनोदाने सांगत की, "आमच्या बायकांची भांडणे झाल्यामुळे आम्ही दूरदूर रहात आहोत." संत राममारूती शिर्डीस जातेवेळी त्यांच्याबरोबर ठाणे येथील काही मंडळी होती. त्यात पेणचे श्री. मोकाशी व कल्याणचे श्री. त्र्यंबकराव कुलाबकर व त्र्यंबकराव कुलकर्णी व इतर काही मंडळी मुंबईहून बाबांच्या दर्शनाकरिता निघाली. पण काय आश्चर्य पहा,– शिरडी येथे श्रीसाईनाथांनी अक्षरशः बोलण्याचा सपाटा चालविला की "अरे, माझा उद्या सोन्याचा दिवस आहे रे, अरे माझी उद्या दिवाळी आहे रे" जणू काय त्या दिवशीचे त्यांचे असले भजनच होते. त्या प्रसंगाचे वेळी श्रीसाईनाथांचे बैठकीत शिर्डीचे तपस्वी मार्तंड भगत हेही होते.

श्री. नानासोहब चांदोरकर बाबांचे अगदी निकट होते. राममारूती येण्याच्यापूर्वीच त्यांना बाबा म्हणाले की, "बघ मारूती येतो आहे," आणि मग प्रत्यक्ष त्यांना पाहिल्यावर हे ठाण्याचे संत राममारूतीच आहेत,हे त्यांनी ओळखले. कारण श्री. नानासाहेब चांदोरकर ठाण्याला डेप्युटी कलेक्टर असल्यापासून महाराजांना ओळखत होते.

श्रीसंत राममारूती व त्यांच्या बरोबरची इतर मंडळी जेव्हा शिर्डीस पोचली तेव्हा त्यांची सर्व ती सोय करण्यात आली व मग महाराज बरोबरच्या मंडळींसह मशिदमाईत गेले. ती वेळ दुपारी बाराची होती. श्रीसाईबाबांची त्यावेळी आरती होत होती. इतरांची दर्शने झाली व महाराज दर्शन घेण्यास सरसावले,तो बाबांनी आरती थांबविण्यास आज्ञा केली. बाबांनी चालू आरती कधीही थांबविलेली नव्हती पण ती त्यावेळी थांबवली. तो काय आश्चर्य! श्रीसाईबाबांनी संत मारूतींना घट्ट कवटाळून पोटाशी धरले आहे, असे दृश्य सर्वांना दिसले. महाराजही आनंदाने उड्या मारू लागले व बाबांचे लाड करू लागले. अनेक दिवसांनी पिता-पुत्रांची भेट झाल्यावर गहिंवर येतो,तसे दोघे गहिवरून एकमेकांस बाहूंनी धरून शून्यवृत्ति झाले. आरतीसाठी जमलेल्या साऱ्यांचे लक्ष त्या दोघांकडे वेधले होते. अशा प्रकारे कडकडून भेटल्यावर महाराजांना आपल्या अर्ध्या आसनावर बसवून बाबांनी पुन्हा आरतीस प्रारंभ करा,असे भक्तांना सांगितले. आरती समाप्तीनंतर मंडळी घरोघरी गेली आणि महाराज व त्यांची मंडळी बिऱ्हाडी आली. परतताना महाराज आनंदाच्या भरात श्रीखंडोबाच्या देवळात शिरले. तेथे श्रीउपासनी बाबा बसले होते. त्यांना त्यांनी रामाची सेवा जोरात करण्यास सांगितले. श्रीसाईबाबांना अर्पण करण्याकरिता शिऱ्याचा नैवेद्य व्हावा, म्हणून महाराजांनी सांगितले, परंतु पाकसिद्धी होण्यास काहीसा वेळ लागला. इतक्यात नेहमीप्रमाणे गावचे नैवेद्य चट् सारे मशिदीत येऊन दाखल झाले व आता अर्पण करण्यास आरंभ होणार,तोच बाबांनी सांगितले की, "थांबा, आधी माझ्या राममारूतीनाथांचा नैवेद्य येऊ द्या, मग सर्व नैवेद्य दाखवा." बाबांनी स्वतः महाराजांना 'नाथ' या शब्दांनी संबोधले. संतमारूतींचा नैवेद्य आला व त्याचे ताट खाली ठेवताच, त्यांनी तो सोहंश्वासाने अर्पण केला. बाबांनी त्यातील थोडासा शिरा मोठ्या आनंदाने व आवडीने खाल्ला. नंतर इतर नैवेद्य बाबांना दाखवण्यात आले.

पुढे भोजनोत्तर संतमारुती श्रीबाबांच्याकडे माशेदीत गेले. तेव्हापासून सायंकाळपर्यंत फिरणे, बोलणे, बसणे वगैरे दोघांचे मोठ्या प्रेमाने झाले. रात्री बाबा चावडीत विश्रांतीसाठी गेले त्यावेळी मशिदीपासून चावडीपर्यंत त्यांच्यावर छत्र धरून व मशालीच्या उजेडात नेहमीप्रमाणे ते गेले. त्यावेळी सुद्धा बाबांनी महाराजांना हातात हात घालून बरोबर नेले. नंतर महाराज आपल्या बिऱ्हाडी मंडळींच्या मध्ये निजावयास गेले. अशा प्रकारे श्रीसाईबाबांनी संतमारुती महाराजांना चांगले चौदा दिवस शिर्डीत ठेवून घेतले. काही केल्या जाण्यास अनुमती देईनातच. शेवटी महाराजांनी जाण्याची प्रबळ इच्छा दर्शविल्यानंतर मोठ्या कष्टाने त्यांना जाऊ दिले.

श्री साईबाबा स्वत: नाथपंथी होते व त्यांनी श्रीसंत राममारुती महाराजांना नाथ म्हणून संबोधिले,ही गोष्ट विशेष लक्षात ठेवण्यासारखी आहे. आश्चर्य असे की, या दोन संतांनी अवघ्या काही दिवसांनी आपल्या भक्तांचा निरोप घेतला. श्रीसंत राममारुती २८ सप्टेंबर १९१८ रोजी श्रीरामस्वरूपी लीन झाले तर श्रीसंतसाईबाबा १५ ऑक्टोबर १९१८ रोजी अनंतात विलीन झाले.

## साईश्याम माझा .....

साईश्याम माझा साजिरा गोजिरा
असे भावाचा भुकेला शिर्डीश्वर
साईश्याम माझा पतित - पावन
भक्तांसाठी येई सदैव धावून
साईश्याम माझा सावळा श्रीराम
भोळ्या शुध्द हृदयी घेई विश्राम
साईश्याम माझा असे पाठीराखा
देई ज्याला जो श्रद्धा सबुरीचा पैका
साईश्याम माझा मनी न सोवळे ओवळे,
सर्वां करी जवळी जरी धर्म वेगवेगळे
साईश्याम माझा होई मायबाप,
पूर्ण करी कामना दृष्टीने आपोआप
साईश्याम माझा बने आजा-आजी
नातवंडाना देई मेवा-मिठाई
साईश्याम माझा करा त्याची मानसपूजा
धरा मनीं नेम हृदयी साठवा साईराजा।

**– सौ. भावना दामोदर जेऊरकर**
डोंबिवली (पश्चिम)

# "निर्गुणाचा सगुण अविष्कार – शिरडीचे साईबाबा"

**– श्री. नरसिंह चन्ना**
इंजिनिअरींग विभाग,
नांदेड टेक्सटाईल्स मिल्स,
नांदेड.

शिरडीच्या साईबाबांबद्दल आता विपूल साहित्य उपलब्ध आहे, तसेच भक्तानी त्यांना आलेले असंख्य अनुभव प्रकाशित केले आहेत. तरी देखील बाबांविषयी लिहिण्याचा मोह मी टाळू शकत नाही. कारण संतांचे चरित्र अथांग आहे. जगात अशी एकही वस्तू नाही अथवा भाषेत असे एकही विशेषण नाही ज्या योगे आम्ही संतांच्या चरित्राची तुलना करू शकू. आपल्यासारखी सामान्य माणसे जेथे प्रभूच्या प्राप्तीसाठी, त्यांच्या दर्शनासाठी व्याकूळ असतात तेथे प्रत्यक्ष जगज्जीवन प्रभूला देखील संत सान्निध्याचा मोह होतो म्हणून श्री दासगणू महाराजांनी "संत खरे यजमान सच्चिदानंद प्रभूचे" असे म्हटले आहे.

आपण खरे भाग्यवान आहोत की आपणास ह्या संतांच्या पावन भूमीत जन्म लाभला आहे. आपण अशा उच्च संस्कृतीत जन्मलो आहोत ज्या संस्कृतीचा पाया संतांनीच घातला आहे व वेळोवेळी प्रगट होऊन ती संस्कृती, ती सभ्यता सांभाळली आहे. ज्या संस्कृतीचा पाया भौतिक सुखावर आधारलेला होता ती संस्कृती केव्हाच नष्ट होऊन गेली आहे असे इतिहास पाहाता आपणास आढळून येते. भौतिक सुखे ही अनित्य, अशाश्वत असतात. त्यामुळे ह्यांच्यावर आधारलेली संस्कृतीदेखील अनित्य असणारच. पण आपल्या संस्कृतीमध्ये ह्या भौतिक सुखांना, विषयांना, वासनांना थाराच नाही. आपण नेहमी ह्या बाह्य-जड वस्तूंच्या प्राप्तीपेक्षा नित्य शाश्वत अशा आत्मिक सुखाच्या, आध्यात्मिक व पारलौकिक वस्तूंच्या प्राप्तीसाठी व्याकुळ असतो. संसार सुखापासून विरक्त असणाऱ्या व ज्यांच्याजवळ अंगच्या भस्माखेरीज व लंगोटीखेरीज् देण्यासारखे काही नाही अशा जगद्पिता शिवाच्या उपासनेमागचा हेतू किती उदात्त आहे हे वरील विवेचन पहाता दिसून येईल. "बम-बम भोलेनाथकी जिसके कौडी नहीं खजानेमें,तीन लोकको बस्ती बसाई आप बसे विराणेमें" ह्या उक्तिवरून आपणास दिसून येईल की, हजारो वर्षांपासून आम्ही अशाश्वत अशा जड भौतिक सुखाच्या पाठीमागे नाही तर शाश्वत व नित्य अशा आत्मिक सुखाच्या शोधात आहोत. हे विवेचन देण्याचा मूळ हेतू हाच की आत्मा व परमात्मा ह्यांच्यात भेद मुळीच नाही. जडवस्तू ही एकदेशी असते म्हणून तिच्यात भिन्नता आढळते पण जी सर्वव्यापक अशी चेतन शक्ती आहे ती भिन्न-भिन्न नाही. थोडक्यात ह्यालाच आपण अद्वैत मानू आणि म्हणूनच आपण जेव्हा जड शरीराच्या पार, मनाच्या पलिकडे जाऊन श्रद्धेने, शुद्ध आत्म्यातून परमात्म्यास आवाज देतो तेव्हा परमेश्वर आपणास फारच जवळ वाटतो नव्हे तो आपल्यातच असतो. तो भक्तांसाठी नेहमी तत्पर असतो.

ज्या गोष्टी आपणास चमत्कार वाटतात, संतासाठी त्या सहजक्रिया असतात. चमत्कार त्यांच्या हातून सहजपणे घडतात.

असे अनेक चमत्कार साईबाबांसंबंधी भक्तांना आलेले आहेत. भक्त कोठेही दूरदेशी असो, बाबा सतत त्याच्या जवळ असल्याचा व त्याला संकटमुक्त करण्यासाठी तत्पर असलेले भक्तांना वाटतात. हवी फक्त श्रद्धा. श्रद्धा ही एकच अशी शक्ती आहे जी आत्म्यास जड शरीरापासून काही काळतरी परमात्म्याच्या जवळ घेऊन जात असते. आजच्या ह्या विज्ञान युगात श्रद्धेसारख्या उदात्त गोष्टीवर कुणाचा विश्वास असेलच असे नाही. कारण विज्ञान हे भौतिक व प्रत्यक्ष प्रमाणावर आधारलेले शास्त्र आहे. विज्ञान युगात अनेक यंत्रे निर्माण झाली पण असं एकही यंत्र निर्मिले गेले नाही की ज्याद्वारे जगातल्या यच्चयावत् स्त्री-पुरुषांच्या अंतःकरणात उदात्त भाव प्रगट करून सर्व स्त्री-पुरुषांना एकमेकांशी बहीण-भावासारखे वागायला लावेल. असं एकही यंत्र नाही ज्या योगे कपटी मनुष्याच्या अंतःकरणातून कपट नष्ट करून तेथे प्रेम, सद्‌भाव प्रगट करता येईल. जगातल्या सर्व मानव जातीच्या अंतःकरणातून द्वेष भावना काढून जर तेथे सद्‌भावना प्रगट केली तर जगातले सर्व संघर्ष एका क्षणात मिटतील. पण विज्ञान हे करू शकल नाही. कारण विज्ञानाची मर्यादा फक्त बाह्य जड वस्तूपर्यंतच आहे आणि जेथे विज्ञान हात टेकते तेथूनच सुरू होते अध्यात्म. आम्ही आध्यात्माद्वारे सर्व काही करू शकतो, नव्हे हजारो वर्षापासून संत हेच करीत आलेले आहेत. आज जगात जे प्रेम, विश्वास, श्रद्धेसारख्या निर्मळ गोष्टी पाहावयास मिळतात, हे त्यांनी जगाला वेळोवेळी दिलेल्या उपदेशामुळेच. जर श्रद्धेने, विश्वासाने प्रत्येकाने आपल्या भौतिक उन्नतीपेक्षा आत्मिक उन्नतीकडे लक्ष द्यायला सुरुवात केली, तर जगातली सर्व हिंसा, सर्व द्वेषभाव, सर्व संघर्ष संपायला वेळ लागणार नाही. भेदा-भेद मिटतील. सगळीकडे अभेदाचं साम्राज्य पसरेल. ह्याची जर प्रचिती घ्यायची असेल तर शिरडीचे उदाहरण घ्या. आज देशात संघर्ष पेटले आहेत. धर्म-निष्टा कडव्या बनल्या आहेत. संप्रदाय वाढले आहेत. जाती-जातीतील संघर्ष पराकोटीला गेलेले आहेत. धर्म हे मानवाच्या आत्मिक उन्नतीसाठी असताना देखील धर्माच्या नावावर भयंकर युद्धे होत आहेत. माणसा-माणसांतील एकमेकांवरचा विश्वास संपुष्टात आला आहे. मानवता, प्रेम, एकोपा ह्या सद्‌भावना केव्हाच लूप्त झाल्या आहेत. पण हेच सर्व लोक वेगवेगळ्या जातीचे, पंथाचे, वेगवेगळ्या धर्माचे, प्रांतांचे जेव्हा बाबांजवळ शिरडीस येतात, तेव्हा कोठे जातात त्यांच्यातील संघर्ष? तेथे कोणकोणत्या जातीचा, कोणत्या धर्माचा, कोणत्या प्रांताचा आहे, ही भावनाच लूप्त होऊन जाते. स्पृश्य, अस्पृश्य, जाती, धर्म ह्या सगळ्या निष्ठा तेथे दुय्यम ठरतात. एकच निष्ठा तेथे प्रबळ असते. हे सर्व बाबांचे भक्त म्हणजे आम्ही सर्व एक. हिंदू मशिदीमध्ये जातात, इतर अनेक धर्माचे लोक मंदिरात येतात. बाबा सर्वांना आपले वाटतात म्हणून सर्वजण एकमेकांना आपले वाटतात. ही प्रेरणा, ही शक्ती कोणती आहे? ही शक्ती आहे श्रद्धेची. बाबांवरच्या प्रगाढ प्रेमाची. द्वेष, संघर्ष, भेदांची बंधने जेथे ढिली पडतात व मानवतेची, प्रेमाची, माणुसकीची बंधने जेथे दृढ होतात ती नगरी आज देशातील

आदर्श अशी शिरडी नगरी आहे. सद्यः परिस्थितीत तर ती आमच्यासाठी पुण्यनगरी आहे. आमची काशी, मथुरा, वृंदावन सर्व काही ती बाबांची शिरडी नगरी आहे.

बाबांनी आयुष्यभर तेथे लोकांची सेवा करून माणुसकीची अखंड ज्योत तेवत ठेवली आहे. अखंड धूनी प्रज्वलीत ठेवून तेथील ब्रम्हांड शुद्ध केलं आहे. सर्व द्वेष, संघर्ष, भेद त्यांनी त्या धुनीत जाळले आहेत. आजही तेथे नित्य ब्रम्हांड शुद्धी होत असते म्हणून शिरडीत पाय ठेवताच सर्वांचे अंतःकरण स्वच्छ होते.

आपल्या शास्त्रात दोन प्रकारची सत्ये सांगितली आहेत. शाश्वत सत्ये व अशाश्वत सत्ये. शाश्वत सत्ये ही नित्य असतात. ती त्रिकालाबाधीत सत्य असतात. दुसऱ्या प्रकारची सत्ये ही कालानुरूप व समाजाला, संस्कृतीला आवश्यक असलेल्या परिस्थितीनुसार थोडी फार बदलत असतात. बाबांनी आयुष्यभर लोकांना हीच सत्ये सांगितली पण ती वेगळ्या शब्दात. विश्वाचे मूळ कारण, नित्य व चेतन असे सर्व शक्तिमान परब्रह्म एक असून ते विश्वाच्या कणा-कणात व प्रत्येकाच्या आत्म्यात व्याप्त आहे. ह्या विश्वाचा कण-कण त्या चेतन व्यापक शक्तीने व्यापलेला आहे. ती शक्ती अभेद्य आहे. खंड-खंड नाही. हे विश्व म्हणजे त्या निर्गुण निराकार परब्रम्हाचे साकार रूप आहे. प्रत्येक वस्तूच्या ठायी तिचा वास आहे. अथर्वशीर्ष सुक्तांमध्ये वर्णिलेलं आहे.

"त्वं वाङ्मयस्त्वं चिन्मयः। त्वमानंदमयस्त्तं ब्रम्हमयः।
त्वं सच्चिदानन्दाद्वितीयो ऽसि। त्वं प्रत्यक्षं ब्रंम्हा ऽसि।

त्वं ज्ञानमयो विज्ञानमयो ऽसि।। ह्या सृष्टितलं ज्ञान, विज्ञान, आनंद, सत्य सर्व काही तेच परब्रम्ह आहेत. ते केवळ एकच आहे, सर्वांसाठी एक आहे. म्हणूनच बाबांनी आम्हाला सोप्या भाषेत सांगितलं आहे. "सबका मालिक एक" ह्या अष्टाक्षरी मंत्रात सर्व भेद मिटले आहेत. सर्व शास्त्रे, संपूर्ण ज्ञान, सर्व वाङ्मय ह्या आठ अक्षरात सामावलेलं आहे. इतक्या सोप्या भाषेत विश्वाचं गूढ फक्त संतच सांगू शकतात. हे एक नित्य, शाश्वत सत्य बाबा आजीवन जगले आहेत.

दुसरी जी अशाश्वत सत्ये असतात त्यांचे स्वरूप कालानुरूप बदलत असतात असे मी पूर्वीच लिहिलं आहे. आणि बदलत्या काळाप्रमाणे समाजाच्या स्वास्थ्यासाठी ती सत्ये कशी अंगिकारावीत हे दाखविण्यासाठी संतांना अवतार घ्यावा लागतो. हजारो वर्षापूर्वी जेव्हा आपण पाषाणयुगातून सभ्यतेकडे वाटचाल करीत होतो तेव्हा जे ज्ञान, जे वाङ्मय, जे अनुभव आम्हाला मिळाले ते जसेच्या तसे जतन करून पुढील पिढीस देणे हे त्या काळजी गरज होती. त्याचप्रमाणे ह्या ज्ञानाचा, वाङ्मयाचा शोध लावणाऱ्या ऋषी मुनींची रक्षा करणे, धर्माचे रक्षण करणे, प्रजेचे रक्षण करणे ही दुसरी गरज होती. तद्वतच व्यापार-उद्दीम सांभाळणे, शेती करणे ही तिसरी गरज होती. समाजाच्या सुनियोजित बांधणीसाठी त्याकाळच्या गरजेच्या अनुरूप वर्णव्यवस्था ही त्या काळाची अत्यंत आवश्यक गरज होती. पण सद्याच्या काळी ती गरज, किंवा ती पद्धत आवश्यक राहिलेली नाही, ती कालबाह्य ठरली आहे. पण आजदेखील लोक

त्याचे भांडवल करून एकमेकांशी झगडत आहेत. जाती-जमाती, संप्रदाय यामध्ये नित्य संघर्ष होत आहेत. हे जे भेद सध्या निर्माण झालेले आहेत,तर हे भेद मिटून येथे अभेदाचं, शांतीचं, विश्वासाचं साम्राज्य निर्माण व्हावं म्हणून बाबांनी "राम-रहिम एक है"चा उपदेश आम्हाला दिला आहे. केव्हा ते "अल्लाह मालिक है" म्हणत तर केव्हा पांडुरंगाला भजा म्हणून ते सांगत. सर्व धर्मियांना ते आपलेच वाटत व प्रत्येकाला त्यांनी त्या-त्याप्रमाणे उपदेश करून, दृष्टांत देऊन संतुष्ट केलेलं आहे. भक्त त्यांना "अल्ला साई", "मौला साई," "नानक साई" सारख्या वेगवेगळ्या नावांनी संबोधू लागले. बाबांकडे भक्त ज्या भावनेने पाहात त्याच रूपात त्यांना साक्षात्कार घडायला लागला. सर्व मानवजातीतील भेद, संघर्ष, कटुता मिटावी म्हणून बाबांनी सह-जीवनाचा, सह-भोजनाचा अभिनव उपक्रम शिरडीत सुरू केला. बाबा हे केवळ संतच नव्हते तर आजच्या वाट चुकलेल्या व विश्वास गमावून बसलेल्या मानवजातीस एकत्र आणण्यासाठी प्रगटलेले ते एक श्रेष्ठ समाज-सुधारक होते. गीतेत वर्णिलेले स्थितप्रज्ञ दर्शन व निष्काम कर्मयोगाचे मूर्तीमंत दर्शन म्हणजे शिरडीचे साईबाबा.

भक्तांना बाबा आज देखील साक्षात्कार देतात. आज देखील भक्तांना संकटमुक्त करण्यासाठी बाबा नेहमी तत्पर आहेत. "जया मनी जैसा भाव, तया तैसा अनुभव" हे बाबांचे वचन आहे. असंख्य भक्तांनी संकटकाळी बाबांना आर्तस्वरात आवाज देऊन त्याच्या वचनाची प्रचिती घेतली आहे. बाबा भक्तांसाठी नेहमी धावून येतात. ह्या संबधात आमच्या अनुभवास आलेली एक सत्य घटना आहे. आम्ही ज्या मिलमध्ये काम करतो, तेथे एक सिंघ साहेब नावाचे साईझींग मास्टर होते. सध्या ते सेवानिवृत्त झाले आहेत व कर्नुल ह्या गावी असतात. ते बाबांचे अनन्य भक्त. ते रामनवमीचा उत्सव बाबांचा जन्मदिवस म्हणून साजरा करीत असतात. अशाच एका रामनवमीस त्यांनी प्रसादासाठी आम्हाला घरी बोलावलं होतं. त्यांच्या घरी एका मोठ्या लाकडी तख्ताच्या मंदिरात फक्त साईबाबांच्याच विविध तसबिरी होत्या. इतर कोणतीही तस्बीर तेथे आम्हाला दिसली नाही. त्यांनी त्याचे नावच "साई मंदिर" ठेवलेले होते. त्यांनी आम्हाला सांगितलं की ते बाबांची अनन्य शरणांगत भावे पूजा करतात. त्यामागची पार्श्वभूमी त्यांनी आम्हाला कथन केली ती अशी. त्यांची पत्नी पुष्कळ वर्षापासून कमरेखाली अधू होती व ती हाताच्या साहाय्याने घसरत चालत असे. त्यांनी पुष्कळ डॉक्टरी इलाज केले पण सर्वांनी त्यांना सांगितलं की, त्यांच्या कमरेच्या खालच्या सर्व रक्तवाहिन्या निकामी झाल्यामुळे त्या ठीक होणे शक्य नाही. त्यांनी सर्व उपाय योजले पण गुण आला नाही. शेवटी त्यांची पत्नी ८-१० वर्षे तशाच अवस्थेत होती. ते बाबांचे भक्त होतेच. ते एकदा शिरडीला गेले असता कुण्या एका भक्ताने त्यांना बाबांना अनन्य शरणांगत भावाने शरण येण्यास सांगितले. त्याप्रमाणे त्यांनी बाबांना अनन्य शरणांगत भावे भजण्यास सुरूवात केली. म्हणजे प्रत्येक देवतेच्या ठायी त्यांनी फक्त बाबांचीच मूर्ती पाहण्यास सुरूवात केली. काही काळ लोटला. एके रात्री म्हणजे सकाळी ब्राम्हय मुहूर्ती त्यांची पत्नी अर्धनिद्रा व अर्ध जागृती अवस्थेत असताना एक फकिरवेशधारी मनुष्य तेथे आला व त्याने प्रेमाने त्या स्त्रीच्या डोळ्यावर

हाताने ठेवून "बेटी उठो, चलो" असे फर्मावले व स्वतःच्या हाताने तिला उठती केली व चालविण्यास सुरूवात केली. त्या बाईस जेथे-जेथे त्रास होता,तेथे-तेथे स्पर्श केला व तिला चालवायला लावून तो फकीर अदृष्य झाला. सर्वजण जागे झाल्यावर पाहातात तो काय आश्चर्य? जी स्त्री १०-१२ वर्षे अधू होती व चालू शकत नव्हती व जी ठीक होणे केव्हाच शक्य नव्हते,ती आपली पत्नी उत्तम प्रकारे चालू लागल्याचे पाहून सिंघ साहेब व त्यांचे कुटुंब गद्-गद् अंतःकरणाने बाबांच्या ।वाचा घोष करू लागले व मनोमन प्रेमाश्रूंनी बाबांचे पवित्र चरणकमल भिजवू लागले. त्या दिवसाच्या स्मरणार्थ त्या कुटुंबाने आजीवन मांस भक्षण करणे सोडून दिले आहे. असे अनेक अनुभव भक्तांना आलेले आहेत.

आम्ही जर प्रत्येक गोष्टीचा बुध्दीनं विचार करू लागलो, तर पुष्कळ गोष्टी आम्हाला समजू शकत नाहीत. कारण बुध्दीची मर्यादा फार तोकडी आहे. बुध्दी जड असल्याकारणाने ती फक्त जड वस्तूचेच ज्ञान प्राप्त करू शकते. पण ह्या जड सृष्टीच्या पलिकडे जे निर्गुण, निराकार चेतन अशी शक्ती आहे,ती बुध्दीच्या मर्यादेत येऊ शकत नाही. तेथे श्रध्देनेच विचार करावयास पाहिजे. आध्यात्मिक गोष्टींचा विचार करताना आम्हाला बुध्दीपेक्षा हृदयाचा उपयोग जास्त होतो. अशा चमत्काराविषयी विचार करताना आमची बुध्दी थिटी पडते. तेथे उपयोगी पडते फक्त श्रद्धा. अंतःकरणात श्रद्धेचा प्रकाश फाकू द्या, तुम्हाला सर्व गोष्टी स्वच्छ दिसायला लागतील. तुमचा भ्रम दूर होईल व केवळ ज्ञानाचे दार तुमच्यासाठी उघडे होईल. परमात्म्याचे ज्ञान आत्म्याद्वारेच प्राप्त करता येते. मीठाचा खडा जर सागर तळाचा शोध घ्यायला गेला तर,तर तो स्वतःच सागर बनतो. त्याचे स्वतःचे अस्तित्वच समाप्त होते. तो सागरमय बनतो. सागराचाच एक अंश बनतो. तद्वतच आपण जर आत्म्याच्या योगे त्या परम चेतन अशा शक्तीचा शोध घ्यायला गेलो तर आत्मा व परमात्मा एकच भासू लागतात. आपले वेगळे अस्तित्वच उरणार नाही. "अहं ब्रम्हास्मी" हे सत्य तेव्हाच कळून येते. आपण शेवटी आपल्याच शोधात होतो,हे कळून येते. ह्यालाच आत्मज्ञान म्हणतात.

ह्यासाठी संतांच्या प्रत्येक कृतीचा अर्थ लावायचा असेल तर श्रद्धा असणे परम आवश्यक आहे. जे स्वतःला नास्तिक म्हणवून घेण्यात धन्यता मानतात, त्यांनी एकदाच - फक्त एकदाच आपली बाह्य इंद्रियं आवरून श्रद्धेच्या साहाय्याने स्वतःच्या आत्म्यात रमण्याचा प्रयत्न करून पाहावा. त्यांना जो अवर्णनीय आनंद प्राप्त होईल,तो अनुभवून पाहावा.

बाबांच्या दर्शनार्थ रोज हजारो लोक शिरडीस येतात. दृष्टीने बाबांचे मंगलमय दर्शनसुख प्राप्त करतात, तरीदेखील त्यांची तृष्णा शांत होत नाही. प्रत्येक आरतीचे वेळी बाबांचे मंगलमय रूप वेगवेगळे भासत असते. प्रत्येक वेळी वेगवेगळे अवर्णनीय दर्शन सुख लाभत असते. बाबांसाठी शिरडीस गेलेल्या भक्तांना हे वाटतच नाही की बाबांनी समाधी घेतली आहे. त्यांना वाटते,बाबा सध्या तेथेच आहेत व आपण त्यांना भेटण्यासाठी आलो आहोत.

कित्येक भक्त बाबांना आपल्या बारीक-सारीक समस्या, आपल्या सर्व अडचणी सांगून मुक्त होतात. त्यांची श्रद्धा आहे की, सर्व काही बाबांवर सोपवलं की सर्व अडचणीतून ते आम्हाला मुक्त करतात. आणि घडते देखील तसेच. बाबा भक्तांच्या समस्याचे वेगवेगळ्या प्रकारे निराकरण करीत असतात.

बाबांच्या शिरडीस गेलेले भक्त बाबामय होतात. द्वारकामाईत बाबांच्या सगुणमूर्तीचं दर्शन घडते. जवळच मसजिद आहे. तेथे रात्रं-दिवस बाबांच्या वेळेपासूनच धूनी जळत असते. अनेक भक्त तेथे बाबांच्या जवळ बसून आप-आपल्या पवित्र धर्मग्रंथाचे वाचन करीत असतात. चावडी व बाबांच्या गुरूंचे स्थान देखील जवळच आहे. बाबांनी हाताळलेल्या व त्यांच्या स्पर्शाने पुनीत झालेल्या वेगवेगळ्या वस्तू तेथे दर्शनासाठी ठेवलेल्या आहेत. बाबांची ही पुनीत नगरी जेथे एकोपा, सद्‌भावना, प्रेम, श्रद्धा, विश्वास नांदत असतात,ती शिरडी नगरी आजचे महान तीर्थ आहे.

वैद्यराज बाबा, योगीराज बाबा, महान संत बाबा, समाजसुधारक बाबा त्या बाबांच्या चरणी नतमस्तक होऊन एकच प्रार्थना करीत आहेत. जो आदर्श, जी माणुसकी, जे सहजीवन शिरडी नगरीत आहे,बाबा,ते सर्व काही देशव्यापी होऊ द्या. ह्या देशातील भेद मिटून अभेदाचं राज्य येथे येऊ द्या. ह्यापेक्षा आम्ही काय मागावे.

हे जे लिखाण माझ्या हस्ते घडलं आहे,ते देखील बाबांचा एक चमत्कारच आहे. कारण आजवर केव्हाही माझ्या हातून लिखाण घडलेलं नाही. आमचे आध्यात्मिक गुरू श्री जुगलकिशोर पांडे व परम मित्र श्री. शिवदास खाकेर हे बाबांचे परम भक्त. त्यांनी मला प्रेरणा दिली की बाबांवर एक लेख तुम्ही लिहा. तुम्ही फक्त लिहायला लागा, बाबा सगळं काही सांभाळतील आणि घडलं देखील तसंच. ही सर्व बाबांची किमया.

शेवटी बाबांजवळ प्रार्थना करतो. बाबा आम्ही संसारी जण, आमच्या इच्छांना मर्यादा नाही. त्यामुळे आमच्या हातून प्रमाद घडत असतात. आम्ही वरचेवर मळत आहोत म्हणूनच आमचा अधिकार इतर पुण्यवंतापेक्षा आपल्या चरणावर अधिक आहे. जे मलीन वस्त्र असते, तेच गंगेत धुण्यासाठी येते. बाबा ह्या शरीरातील, मनातील घाण आपुल्या इच्छेने दूर व्हावी, एवढीच इच्छा.

"श्री साईनाथार्पणमस्तु"

# श्री साईनाम

– श्री. अ. ना. गोसावी
१०४, साईसदन, स्वावलंबीनगर,
नागपूर.

''साई'' या दोन शब्दात अमर्याद सामर्थ्य सामावलेले आहे. या दोन शब्दात आईचे प्रेम, करूणा, बंधुत्व यांचा समावेश झाला आहे. भक्तासाठी हे दोन शब्द म्हणजे अमृतच होय.

''साई'' या दोन शब्दात एखाद्या भक्ताला आई मिळाल्याचा आनंद होतो तर एखाद्याला आपला ''स्वामी'' मिळाल्याचा ब्रह्मानंद होतो. वस्तुतः ज्याला परब्रहम म्हणून श्रुती, स्मृती संबोधतात, ज्याच्या स्वरूपाचे वर्णन करताना वेद ''नेती नेती'' म्हणून स्तब्ध होतात, त्याला नाम-रूपात्मक उपाधींचा काय संबंध! ते परब्रहम एकमेवाद्वितीय असून उपाधी रहित आहे. परंतु कधी कधी त्या भगवंतालाही भक्तीत मिळणाऱ्या आनंदाची भुरळ पडून तो अनादि, अनंत, अमर्याद परब्रहम भक्तांसाठी आणि भक्तीतून मिळणाऱ्या आनंदासाठी मूर्त स्वरूप घेतो तेव्हा त्याला जगरहाटीप्रमाणे नाम रूपात्मक उपाधींचा स्वीकार करावा लागतो. तसेच साईनामाचे आहे.

चांदभाई पटेल यांच्या वराती सोबत आलेल्या त्या तरूण फकीराचे नाव काय होते, हे त्या चांद भाई पाटलाला देखील माहीत नव्हते. एक अद्वितीय सामर्थ्याचा तरूण फकीर, ज़्याने जमिनीवर चिमटा मारून निखारा काढला, ज्याने त्याची हरवलेली घोडी मिळवून दिली, एवढेच त्या चांदभाईला माहीते होते. परंतु ज्यावेळी हे वऱ्हाड शिरडी ग्रामी चांदभाई समवेत उतरले होते, त्याच वेळी खंडोबाची पूजा आटोपून म्हाळसापती देवळातून बाहेर निघत होते. हिऱ्याला ओळखण्यासाठी ज्याप्रमाणे एखादा पारखी लागतो, त्याचप्रमाणे संताला ओळखण्यासाठी त्याच योग्यतेचा सत्पुरूष किंवा श्रेष्ठ दर्जाचा साधक असावा लागतो. संतांना ओळखणे हे काही सामान्य माणसाचे काम नाही. स्वतः म्हाळसापती हे एक श्रेष्ठ दर्जाचे साधक तर होतेच परंतु त्यांना संतसहवासही बराच लाभला होता. अनेक संतांच्या संगतीत राहण्याचे भाग्य त्यांना लाभले होते. आणि म्हणूनच खंडोबाच्या देवळाच्या बाहेर पडता पडता त्यांनी त्या तरूण फकीराकडे पाहिले तेव्हा ते थक्क झाले. त्या तरूण फकीराचे ते अद्वितीय तेज, त्याच्या चेहऱ्यावरील तो प्रेमळ भाव, जगाला करूणेने व्यापून टाकणारे ते अपूर्व नेत्र, हे सर्व पाहून म्हाळसपती मंत्रमुग्ध झाले. त्यांचे देहभान हरपले आणि उस्फूर्तपणे त्यांच्या तोंडून शब्द बाहेर पडले, ''आवो साई''. जणू स्वयंमेव परमेश्वरच त्यांच्या तोंडून स्वतःचे नाव वदवून घेत होता. अशा तऱ्हेने त्या उपाधीविरहित, एकमेवाद्वितीय, अनिर्वचनिय परमेश्वराला नाव दिले गेले, ''साई''.

''साई'' हा सन्मान दर्शक शब्द आहे. 'साई'चा अर्थ ''महाराज'' असा होतो.

त्याचप्रमाणे ''साई'' या शब्दाचा अर्थ स्वामीदेखील होतो. खरोखरीच, ''फाटके तुटके नेसतो रे, परी ब्रह्मांड गिळून बैसतो रे'', या वचनाप्रमाणे हा फाटकीतुटकी कफनी नेसलेला, भिक्षा मागणारा फकीर या त्रिभुवनाचा स्वामी नव्हता काय? परंतु ज्याप्रमाणे म्हटले आहे, ''अलौकिक नोव्हावे लोकाप्रती'', त्याप्रमाणे या शिरडीच्या अलौकिक फकिराने आपले अलौकिकत्व जनसामान्यांपासून दडविण्याचा प्रयत्न केला. ''अल्ला भला करेगा'' हे शब्द ज्याच्या मुखात सदैव असायचे, ''मोठी कृपाळू ही द्वारकामाई, भोळ्या भाविकांची आई, कोणी कसाही पडो अपायी, ठाईच करील रक्षण॥'' असे म्हणत ज्याने अनेक दुःखी कष्टी जीवांचे दुःख दूर केले, लोकांना सन्मार्गाची वाट दाखविली, परंतु कर्त्याचा मोठेपणा आपल्याकडे कधीही घेतला नाही, तो हा ''साई'' असामान्य नव्हता काय?

# श्री साई अभंग

१) साई माझा सखा। साई माझा पाठी राखा
साई माझी माता। साई माझा पिता
साई माझा कृपासिंधु। साई तुझा मी दिनबंधु
साई माझा अंतर्ज्ञानी। साई माझा गुणी
साई भक्तांसाठी धाव घेई॥

२) साई माझा गुरू मी साईंचा चेला
तरी साईबाबा मी ज्ञानाचा भुकेला
व्यर्थ जीवन माझे साईनाथा
किती अज्ञानात राहू मी आतां
तरी पाज मजला ज्ञानाचा पेला॥

**– सौ. लीला तानाजी सोनवणे**
श्री दत्त निवास, दत्तमंदिराचे मागे,
मु. पो. नवापूर - ४२५४१८, जि. धुळे.

# माझ्या आठवणीतून

## मी पाहिलेले श्रीसाईबाबा-६

– श्री. सुरेंद शामराव जयकर
बी १६, ४ था मजला, जॉली
कॉटेज को. हा. सोसायटी,
भागोजी कीर मार्ग,
माहिम, मुंबई - ४०० ०१६.



**शिरडीच्या श्रीद्वारकामाईत श्रीसाईनाथांना विनंती करून त्यांचे अगदी हुबेहूब अप्रतिम तैलचित्र रेखाटणारे श्री. शामराव जयकर यांचे सुरेंदजी हे क्रमांक सहाचे भाग्यवान सुपुत्र होत. त्यांचे वय आज ७८ वर्षांचे असून आपल्या पिताजींबरोबर शिरडीला ते गेले असताना चांगले सहा महिने ते श्रींच्या सहवासात होते. आमच्या संकल्पित लेखमालेत त्यांनी लिहिलेल्या व अनुभवलेल्या या आठवणी सादर करण्यात आम्हास आनंद होत आहे-- का. संपादक**

माझे वडील श्री. शामराव रामचंद्र जयकर हे आपल्या पत्नीसह व आम्हा आठ मुलांना घेऊन १९१६ च्या नोव्हेंबरला मुंबईहून श्रीसाईबाबांच्या दर्शनाला व सेवेसाठी श्री शिर्डीला रहावयाला गेलो. आमचे वास्तव्य मशिदीच्या डाव्या बाजूस (आता ज्याला द्वारकामाई म्हणतात) दिक्षितांच्या वाड्यात होते. तेथून मशिदीला जाण्यास पाच मिनिटे पण लागत नसत. मला व माझ्या इतर भावंडांना शाळा व अभ्यास वगैरे काही नसल्यामुळे आमचा बराचसा वेळ मशिदीतच जात होता. आमची आई व थोरले बंधू शूरसेन धाकट्या १ वर्षाच्या श्रीपादला संभाळण्यासाठी घरी राहत असत. फक्त सकाळची काकडआरती व दुपारच्या आरतीला ते हजर राहत.

आमचा शिर्डीला जवळ जवळ आठ महिने मुक्काम होता. त्यामुळे मला श्रीसाईबाबांच्या दर्शनाचा लाभ वारंवार होत होता. सकाळची काकडआरती व रात्रीची शेजआरती एक दिवसाआड मशिदीत व चावडीत आलटून पालटून होत असे. त्यांचा दिनक्रम सकाळपासून रात्रीपर्यंत मला पाठ झाला होता. सकाळची काकडआरती झाल्यावर बाबा भिक्षेसाठी बाहेर पडत, बरोबर सात-आठ भक्तमंडळी असावयाची, मी पण अजाणतेपणी त्यांच्याबरोबर जात असे. झोळीत गावातल्या काही घरांतून मिळालेली भिक्षा (भाजी, भाकरी, पोळी वगैरे) झोळीत घेऊन वडील भक्तमंडळींच्या जवळ देत असे.

भिक्षेवरून आल्यावर बाबांचे स्नान होत असे. तत्पूर्वी ते लेंडीबागेत जात. बरोबर दहा-बारा भक्तमंडळी व भालदार व चोपदार असत. बाळा चोपदार व नाना चोपदार तर आमच्या चांगले ओळखीचे, त्यामुळे मी मधून मधून चोपदाराची जाड धातूंची काठी घेऊन केवळ मजा म्हणून सर्व मंडळींच्या पुढे चालत जात असे. लेंडीबागेत जाताना व परत येताना बरीच भक्तमंडळी बाबांच्या पायावर डोके ठेवून त्यांचा आशीर्वाद घेत.

लेंडीबागेतून आल्यावर व स्नान केल्यावर बाबा त्यांच्या स्थानावर विराजमान होत असत. मग मुंबई, पुणे, सोलापूर, नगर इत्यादी शहरांतून आलेले भक्त बाबांना नारळ, फुले व मिठाई नैवेद्य म्हणून अर्पण करून त्यांच्यासमोरच्या जमिनीवर बसत. हाच बाबांचा खरा दरबार होता. त्यावेळी भक्तमंडळी आपली काही व्यथा व समस्या बाबांना सांगत व बाबा त्यांना उदी देऊन योग्य ते मार्गदर्शन करीत. कोणी ढोंगी किंवा लबाड व्यक्ती आली तर बाबा त्याची निर्भत्सना करीत, किंवा फजिती उडवत. मी व माझे वडील बंधू दिनकर खाली पटांगणावर बसून सर्व मजा बघत असू. माझा धाकटा भाऊ रघुनंदन हा बाबांचा लाडका झाला होता. त्यामुळे तो केव्हाही बाबांच्या जवळ जात असे. दुपारच्या आरतीनंतर बाबा आलेला नैवेद्य जवळ असलेल्या शेलक्या भक्तांना वाटत. त्यामधे आमचा रघू जात असे व काही वेळा त्याच्याबरोबर जाऊन मी पण नैवेद्य सेवन केला आहे. हे माझे परम भाग्य मी समजतो.

बाबा काही वेळा हिंदी भाषेत व बऱ्याच वेळा मराठी भाषेतून बोलत. एकदा काय झाले की आमच्याच बाजूला दोन खोल्या सोडून नाना बाबा म्हणून एक वल्ली राहात होती. त्याने माझ्या सर्वात धाकटा भाऊ श्रीपाद (जो एक वर्षाचा होता) त्याला कडेवर घेऊन मशिदीत आगमन केले व मशिदी समोरच्या पटांगणात एक जाड तार आडवी बांधली होती. त्या तारेवर श्रीपादला दोन हात धरून ठेवलेल्या अवस्थेत सोडले, मी हा प्रकार पाहून घाबरलो. कारण श्रीपादचे हात तारेवरून सुटले असते तर त्याचा कपाळ मोक्षच झाला असता. आता नानाबाबा म्हणजे प्रचंड बलवान व्यक्ती, त्यांना कोण सामोरे जाणार? श्रीसाईबाबांनी ते पाहिले व उजव्या बाजूला बसलेले माझे वडील-शामराव यांना उद्देशून बोलले, "कायरे,तुला तुझे पोर नकोसे झाले काय? उठ व खाली जाऊन पोराला घे." बाबांच्या शब्दांने धीर येऊन वडील खाली उतरले व तारेवरून श्रीपादला अलगद उचलून घेतले.

नानाबाबांचा व श्रीसाईबाबांचा काय ऋणानुबंध होता ते समजत नाही. पण बाबांनी नानाबाबाला त्याच्या व्रतातून बाहेर पडल्यावर जो शिर्डी गावात धिंगाणा सुरू केला होता त्याला प्रतिबंध केला नाही. एकदा तर नानाबाबा तेथे मशिदीत आले व साईबाबांसमोर उभे राहून म्हणाले, "तुला कोणी येथे बसविले, आता उठ." बाबा लगेच जागा (कठडा) सोडून उठले व नानाबाबा त्या जागेवर जाऊन बसले. थोडा वेळ बसून ते उठले व साईबाबांना दोन हातांनी धरून परत त्यांच्या जागेवर बसविले व त्यांच्या पाया पडले. हेच नानाबाबा, साईबाबांनी समाधी घेतल्यावर त्यांच्या पायावर डोके आपटून प्राण त्यागास तयार झाले होते.

आमचा रघुनंदन तेथेच मार्चमध्ये गोवर येऊन मृत्यू पावला. आमच्या आईने बाबांना विचारले हे असे कां झाले? तेव्हा बाबा म्हणाले, "ती डाकीण आली होती, तिने पोराला खाल्ले" व रघुनंदन, रघुनंदन करीत त्यांच्या डोक्यातून अश्रूधारा सुरु झाल्या. त्यांनी मग आईला सांगितले की, तो परत तुझ्या उदरात येईल व इ.स. १९२० साली मला एक भाऊ झाला. त्याचे नाव "राम" ठेवले.

श्रीसाईबाबांचे दर्शन व पदस्पर्श,आशीर्वाद हे आम्ही आठ महिने भोगले व जून १९१७ ला बाबांची परवानगी घेऊन शिर्डी सोडले व मुंबईला गिरगांवमध्ये भाड्याच्या दोन खोल्या घेऊन राहू लागलो. आमचे ज्येष्ठ बंधू "वीरसेन" हे आधी मुंबईला आले व मामेआजोबांकडे येऊन राहिले होते व नोकरी करीत होते. आमचे वडील शामराव मात्र आमचे पाठी शिर्डीसच २/३ महिने बाबांच्या सेवेसाठी राहिले होते. ते मग ऑक्टोबर १९१७ ला मुंबईला परत आले.

त्यानंतर मी जसा जाणता झालो तसे वाटू लागले की, साईबाबांनी १९१८ ऑक्टोबरला समाधी घेतल्यामुळे त्यांचे पाया पडून उदी व आशिर्वाद घेणे अशक्य आहे, पण निदान स्वप्नांत तरी त्यांचे दर्शन व्हावे ही फार इच्छा होती. ती १९५४ ला पुरी झाली. मला माझ्या चिरंजिवांची मुंज करावयाची होती. पण जवळ पुरेसा पैसा नव्हता, या परिस्थितीत मला स्वप्नात श्रीसाईबाबांचे दर्शन झाले व ते समोर बसलेले दिसले. मी लगेच उठून धावत गेलो व त्यांचे पाय धरले. माझ्या डोळ्यांतून अश्रूधारा वाहू लागल्या. बाबांनी मला उठविले व म्हणाले, "काही काळजी करू नकोस, सर्व ठीक होईल,तू मिठाईच्या पुड्या वाट." मी जागा झाल्यावर विचार करू लागलो की, याचा अर्थ काय? माझ्या ऑफिसमध्ये श्री. दिघासकर या नांवाचे अक्कलकोट स्वामींचे भक्त होते, त्यांना विचारले व त्यांच्या सुचनेप्रमाणे एका गुरुवारी संध्याकाळी मार्केटमध्ये जाऊन मिठाई घेतली व त्याच्या सात पुड्या करून मार्केटच्या बाजूच्या रस्त्यावरून शोधत सात फकिरांना वाटल्या. त्यानंतर दोन-तीन दिवसांत मला अनपेक्षित व्यक्तिकडून एक हजार रुपये उसने मिळाले व माझे चिरंजिवाचे मौजिबंधन कार्य निर्विघ्नपणे पार पडले.

इ. स. १९४८ च्या जानेवारीत माझी मोठी मुलगी जयश्री व मुलगा विजय दोघेही टायफॉईड (विषमज्वर) होऊन अंथरुणाला खिळले होते. मुलीची तर डॉक्टरने ९ व्या दिवशी आशाच सोडली होती. त्याने सर्व औषधोपचार केले. पण मी

श्रीसाईबाबांची उदी घेऊन त्याच्या पुड्या दोन्ही मुलांच्या उशाखाली ठेवल्या व एक पुडी पुढच्या दारावर टांगून ठेवली. रात्रभर आम्ही जागे होतो,नामस्मरण करत. तर रात्री १२ वाजता दार ठोकल्याचा आवाज झाला. आम्ही दार उघडले नाही. माझ्या पत्नीला मात्र एक शुभ्र वेषधारी व्यक्ती आत येऊन पाठच्या देवघरात गेलेली दिसली. माझ्या दृष्टीने ते साईबाबाच प्रत्यक्ष आले होते व त्यांनी मुलांना आशीर्वाद दिला. दुसऱ्या दिवशी सकाळी मुलगी पूर्ण शुद्धीवर आली व तिचा ताप साफ उतरला होता. मुलाचा ताप ४० दिवसाचा होता. तो पण संपूर्ण बरा झाला. पण मुलीचा नवज्वर असल्यामुळे तिचा पुनर्जन्मच झाला असे आम्ही समजतो.

मला असे बरेच बाबांच्या कृपाप्रसादाचे अनुभव आले आहेत व म्हणून मला असे वाटते किंवा माझी पूर्ण खात्री आहे की, मी सर्व प्रापंचिक व आर्थिक संकटातून कुटुंबासह वेळोवेळी सुखरूप बचावलो ते केवळ बाबांची पूर्णकृपा आहे म्हणून.

मी एक गोष्ट पुन्हा सांगू इच्छितो ती द्वारकामाईतील बाबा बसत असत त्याजागी त्यांचे तैलचित्र स्थापन केले आहे त्याविषयी. आमचे वडीला एक कुशल तैलचित्रकार होते. ते शिर्डीला असताना बाबांना एकदा म्हणाले, "बाबा तुमचे तैलचित्र काढण्याची माझी इच्छा आहे तर आपण पांच-दहा मिनिटे स्वस्थ बसा". बाबा म्हणाले, "अरे वेड्या, माझ्यासारख्या गरीब फकिराचे कसले चित्र काढतोस? बरं तुझी इच्छा आहे तर काढ." तेव्हा माझ्या वडिलांनी त्यांना बसवून फक्त त्यांची आउट लाईन काढली व मग घरी व्यवस्थित तेल रंगाने रंगविली. वडिलांच्या दृष्टीत बाबांची प्रतिमा इतकी ठसली होती की, ते तैलचित्र अगदी हुबेहूब बाबाच बसले आहेत,असे वाटण्यासारखे झाले. बाबांच्या डोळ्यांत जे अप्रतिम तेज होते,ते त्या चित्रात दृग्गोचर झाले होते. ही पण बाबांची आमच्या वडिलांवर कृपाच होय.

हीच कृपा आमच्या सर्व कुटुंबिय मंडळीवर अशीच राहो, ही श्रीसाई चरणी प्रार्थना. शिर्डीला आम्ही १९१६ त गेलो त्यावेळी माझे वय अवघे साडेसहा-सात वर्षाचे दरम्यान होते. या वयातील माझ्या श्रीसाईबाबां विषयीच्या ज्या आठवणी आहेत, त्या लिहून काढण्याचा प्रयत्न केला आहे. श्रीसाईबाबांच्या सर्व अद्यावत व जुन्या भक्तांना यापासून काही फायदा होईल, अशी अपेक्षा करून हा लेख पूर्ण करतो.

ॐ श्रीसाईनाथाय नमः

# "श्रीबाबा, हा अखेरचा संसार ठरो"– चांदोरकर

– **श्री. चकोर आजगांवकर**, एम्. ए.
(उपसचिव, शिक्षण विभाग, महाराष्ट्र राज्य)
वाय् ११/१७०, सरकारी वसाहत, वांद्रे (पूर्व),
मुंबई-४०० ०५१

श्री. नानासाहेब चांदोरकर हे बाबांचे एक थोर ज्ञानी भक्त होते. ते एक शासकीय उच्चाधिकारी होते. व्यवहार, कायदा, तत्त्वज्ञान व भक्ती यांची त्यांना असलेली जाण उच्च दर्जाची होती. तथापि एवढे जीवनवैभव भोगूनही त्यांना मृण्मय जीवनात रस वाटत नव्हता. त्या संसार चक्रात पुन्हा गुरफटून जाऊ नये, असे त्यांना मनोमन वाटत होते. संसारातील सुखेदु:खे, मानअपमान तेवढ्या पुरते खरे व मनाला चाळविणारे असले तरी ते अंतिम मिथ्या आहेत, त्यात खरे सौख्य वा आनंद नाही,याची प्रचिती चांदोरकरांना आली होती. म्हणूनच श्रीबाबांना एकदा नानासाहेब कळवळून म्हणाले

**"न्या दया सागरा जन्ममृत्यूच्या पार ।**
**हा प्रभो ठरावा अखेरचा संसार ।"** (श्रीसाईगीतायत)

बाबा ह्या जन्मातील हा संसार, ही सुखदु:खे, हे छाया प्रकाश पुन्हा अनुभवायची मला इच्छा नाही. या जन्मीच हे मायावी जन्ममरणाचे रहाटगाडगे भ्रमावयाचे थांबू द्या, अशी माझी तुम्हाला कळकळीची प्रार्थना आहे. हा मानापमान, ही सत्तेची खुर्ची, हे चपराशी, हुजरे यांचा मला मोह उरलेला नाही. पुरे झाले हे भोग! हे संसारचक्र आता थांबवा

बाबांनी नानांना विचारले, "नाना, असे का म्हणतोस? एवढी का तुला उपरती झाली आहे?"

नाना म्हणाले, "बाबा, हा संसार म्हणजे आसक्तीचा खेळ आहे. आज सुखाची पुष्पशय्या आहे, तर उद्या काट्याकुट्यांचा खडतर प्रवास आहे. आज आनंदाचे चित्कार आहेत, तर उद्या दुखाचे अश्रू आहेत. हा सारा मायेचा भ्रामक खेळ आता पुरे झाला."

बाबा हे महाज्ञानी महात्मे होते. त्यांचे शुकासारखे वैराग्य व ब्रह्मासारखे ज्ञान होते. नानांचे हे वरवरचे,वैराग्याचे,त्राग्याचे बोलणे ऐकून बाबांनी स्मित हास्य केले आणि त्यांनी नानांना विचारले, "अरे नाना, संसार याचा अर्थ केवळ पैसा, धन, इस्टेट, बायका, मुले एवढाच आहे का? तू संसार कशाला म्हणतोस? संसाराचा तू सखोल विचार केला आहेस काय? तो तसा केल्यावाचून नुसते भावनाविवश निष्कर्ष नकोत."

चांदोरकर म्हणाले "बाबा!

**ही नाती-गोती भ्रमती धनाच्या भवती**
**आपुले पणाचे उगाच जाळे विणती**
**कुणि नसे सोबती अंती वा आकांती**
**छायाच घेतसे मायामय आकार!"** (श्री साईगीतायन)

बाबांनी सांगितले, "नाना, या कर्मरूपी नदीचा पार फार दुस्तर आहे बरे! कर्माची कुणी गती जाणली नाही. यामुळेच जीवनात पुढे येणाऱ्या घटनांचा माणसाला अंदाज लागत नाही. त्यात जीवनाची नौका हेलकावे खात प्रपंचाचे स्वरूप असेच रहाणार आहे. फक्त बुद्धिवादी मानवाने जीवनाला योग्य भूमिकेने सामोरे गेल्यास संसाराच्या जाचक बंधनातून त्याला मोकळीक मिळू शकते.

नानांनी विचारले, "बाबा संसाराचा खरा अर्थ काय?"

बाबा म्हणाले, "नाना, घरदार, मुले, बायको म्हणजेच केवळ संसार नाही. तू घरदार सोडून जंगलात बसलास तरीही तुला संसारापासून पळून दूर जाता यावयाचे नाही. अरे डोळे पहातात, कान ऐकतात, मन गुंतते या साऱ्या पंचेंद्रियांच्या क्रिया म्हणजेच संसार होय. बायकापोरे सोडून तू हा प्रपंच चुकवू शकशील काय?

**"मन चंचल धावे पिसाट विषयापाठी**
**करि रंगरूप रस गंधास्तव आटाटी**
**बंधात गुंततो जीव वासने पोटी**
**संसार सकल हा पंचेंद्रिय व्यापार ।"**

(श्री साईगीतायन)

अरे नाना! मनाचे चांचल्य हे पूर्व जन्मीच्या वासनांमुळेच निर्माण होते. निर्वासन माणसाचे मन स्थिर होते. प्रारब्धामुळे मनात तरंग उठतात. या तरंगात माणसाने अहंकार मिळविला की नवे संचित निर्माण होऊन नव्यानव्या जन्मबंधनात गुंतवते. यासाठी या मनाच्या कल्लोळांत नाना तू शांत रहाण्याचा प्रयत्न कर. भोगात विरक्त भावनेने वाग, तृप्त मनाने त्याग कर, बुद्धीचा समतोल राख. जीवनातील घटनांकडे लीला म्हणून पहात जा. अरे, प्रारब्ध असल्यावाचून केलेले प्रयत्न फळ धारण करु शकत नाहीत. यासाठी तू फळाची आशा टाकून कर्म करण्याचा अधिकार बजावत जा. धन मिळव पण कृपण बनू नकोस. आर्तासाठी करुणा बाळग, पण दुष्टांसाठी कठोरता धारण कर. भुकेल्यास घास दे, मदमोहावाचून सहज कर्म आचर. या विश्वनाटकात पूर्णपणे रंगलास तरी कुणाचा संग बाळगू नकोस. एक परमेश्वरावर मन ठेव. संसाराचा मुखवटा घालून आपली भूमिका कर्तव्यभावनेने पार पाड. त्यात चुकू नकोस. पण उतू नकोस. मातू नकोस. मग संसारच मुक्तीचा पंथ होईल.

**"मग विवेक होईल साधन मोक्षपदाचे**
**अन् जिणेच होईल पंथराज मुक्तीचे**
**घरदारही होईल दिव्यरुप दैवाचे**
**संसार न राहील, उरेल मोक्षकार।**

(श्रीसाईगीतायन)

# खापर्डे यांची शिरडी दैनंदिनी

– साईनंद

**बुधवार दिनांक ३१-१-१९१२**

आज सकाळी मी वेळेवर काकड आरतीसाठी उठलो आणि नारायणराव ब्रामणगावकर यांचेबरोबर आरतीस गेलो. काकड आरतीहून आम्ही परतलो तेव्हा साईमहाराजांनी किंचित् रागाने आमच्याकडे पाहिले. आमचा परमामृत वाचनाचा वर्ग झाला, त्यावेळी बापूसाहेब जोग, उपासनी शास्त्री आणि श्रीमती कौजलगी हजर होते. आज आम्ही बरेच पाठ संपविले. मी माझ्या निवासस्थळी सुमारे ११ वाजता परतलो, आणि काहीपत्रे लिहिण्याचा विचार केला. परंतु पत्रे लिहिता लिहिता मी आपला झोपीच गेलो. दादा केळकरांचे पुत्र भाऊ यांनी मला जागे केले आणि मग मध्यान्ह आरतीला मी मशिदीत गेलो. मी यापूर्वी साईमहाराजांना ते नेहमीप्रमाणे बाहेर जातांना त्यांचे दर्शन घेतले होते. मध्यान्ह आरती नित्याप्रमाणे पार पडली. वाड्यातील सर्वांना आणि काही इतरांना आज दादा केळकरांनी दुपारच्या भोजनास आमंत्रित केले होते. मेघाच्या तेराव्या दिवसाच्या स्मृतीनिमित्य हे भोजनाचे आमंत्रण त्यांनी दिले होते. जेवणाला उशीर लागणार हे अगदी स्वाभाविकच होते. त्यामुळे मी झोपून टाकले. मला भोजनाकरिता जोपर्यंत उठविले गेले नाही तोपर्यंत आपला मी झोपूनच राहिलो. भोजन सायंकाळी सुमारे पांच वाजेपर्यंत आटोपले. त्यानंतर मी मशिदीत गेलो व साईसाहेबांच्या जवळ बसलो. ते प्रसन्नचित्त होते आणि प्रसन्नपणे बोलत पण होते. त्यांनी नृत्य केले, गाणे म्हटले आणि मला व इतरांना जोरदारपणे ठासून स्मरणपूर्वक सांगितले की, भगवान श्रीकृष्णाने गोकुळात काय काय केले. ते सायंकाळच्या रपेटीस जाताना आम्ही त्यांचे दर्शन घेतले. वाड्यातील आरती झाल्यावर भीष्माने काही वेळ भजन केले व काका दीक्षितांनी रामायणाच्या पाठांचे वाचन केले. त्यांनी आज रात्री सुंदर कांड समाप्त केले.

**गुरुवार दिनांक १-२-१९१२**

आज सकाळी उठायला मला काहीसा उशीर झाला. परंतु मी प्रार्थना समाप्त केली व परमामृत वर्गास वेळीच् हजर झालो. आज या पुस्तकाचे वाचन संपले होते आणि उद्यापासून पुन्हा त्याचे वाचनास आरंभ करणार आहोत. नंतर मी मशिदीत गेलो आणि साई महाराजांजवळ बसलो आणि नंतर त्यांचे बरोबर साठेवाड्यापर्यंत गेलो. तिथे लोक नित्याप्रमाणे त्यांच्या पाया पडण्यासाठी जमले होते. मीपण त्यांच्या घोळक्यात सामील झालो आणि त्यांना वंदन केले आणि बापूसाहेब जोगांच्या खोलीत परतलो. तिथे 'पंचदशी'च्या पाठाला आरंभ केला. पहिल्या दहापदांमध्ये समस्त सृष्टीच्या रचनेचा ज्यामध्ये समावेश केलेला आहे त्या दहा पदांचे संपूर्णपणे विश्लेषण केले. नंतर मी माझ्या निवासी परतलो. काहीपत्रे लिहिली आणि ती रवाना पण केली, आणि मशिदीत दुपारच्या आरतीसाठी हजर पण झालो. ती व्यवस्थितपणे पार पडली. अहमदनगरचे

श्री. माणिक चंदजी, ज्यांनी या वर्षी एल.एल.बी.ची पदवी प्राप्त केली होती ते आज तेथून येथे येऊन दिवसभर राहिले होते. आरतीहून परतल्यावर आम्ही आपापले भोजन केले, आणि मी साखरेबुवांनी संपादित केलेल्या ज्ञानेश्वरी पाठांचे वाचन करीत बसलो. दुर्भाग्याची गोष्ट ही की इतर ज्ञानेश्वरीच्या आवृत्यांप्रमाणे या ज्ञानेश्वरीनेही माझे कूट प्रश्न सोडविले नाहीतच. नंतर दिक्षितांनी रामायणाचे वाचन केले. नंतर शिरडीचे मामलेदार श्री. साने, श्री. साठे, डेप्युटी कलेक्टर आणि सब डिव्हिजनल अधिकारी आले. त्यांचे बरोबर काही वेळ गप्पा गोष्टी करीत बसलो. ते गेल्यावर आम्ही पुन्हा रामायणाच्या पाठांचे पुन्हा वाचन करण्यास सुरुवात केली आणि मी संध्याकाळी साईबाबा फिरावयास जाण्याच्या वेळी मशिदीत त्यांच्या दर्शनासाठी गेलो. वाडा आरती झाल्यावर आम्ही शेजारतीमधे भाग घेतला. भीष्माने आज भजन केले नाही पण त्याने सखारामकृत प्राकृत भागवताचे पाठांचे वाचन केले आणि रात्री दिक्षितांनी रामायणाचे वाचन केले.

आज सायंकाळी साईबाबा रपेटीस जाण्यापूर्वी आम्ही जेव्हा मशिदीत एकत्र जमलो तेव्हा साईसाहेबांनी श्री. दिक्षितांना माझ्या पत्नीला ती जी साईंचे पाय धुवत व रगडत असे त्याबद्दल तिला दोनशे रुपये देण्यास सांगितले. हा त्यांचा हुकूम अवर्णनीय होता. मी दानधर्माच्या धनराशीने आपले पालन पोषण करतो की काय असा त्यातून अर्थ तर येत नाही ना! मला त्यावेळी मरण बरे असे मला वाटले. मी असा विचार करतो की साईसाहेबांनी इच्छिले आणि शेवटी माझा गर्वहरण केला जणू काही गरीबी आणि दुसऱ्यांना अनुदान (दक्षिणा) यांचा अनुभवच मला ते देत होते.

**नोट** - मी १ फेब्रुवारी १९१२ चे डायरीतील पान उलटले आणि तुम्ही निर्देश केलेल्या परिच्छेदाचे वाचन केले. माझ्या भावनांचेच प्रतिनिधीत्व त्यात बरोबर केलेले होते. आमच्या सद्‌गुरु साईमहाराजांनीच हुकूम दिला होता. ते सर्वज्ञ असल्यामुळे की काय सर्वांचेच अंतर्ज्ञानी विचार ते ओळखत होते आणि आपल्या आदेशांचे पालन केले गेले की नाही यावर जोर पण ते कधी देत नसत. आता माझे लक्ष मुख्य विषयाकडे आकर्षित झालेले आहे. मला असे दिसून आले की माझी पत्नी परिश्रम आणि गरीबीचे जीवन पसंत करीत नसे. काकासाहेब दिक्षितांनी ते जीवन पसंत केले होते व त्यामुळे ते प्रसन्न असत. यामुळे साईमहाराजांनी त्यांना माझ्या पत्नीला दोनशे रुपये 'गरीबी' व 'धैर्य' याबद्दल देण्यासाठी म्हणून आदेश दिला होता.

# इति श्री साई उवाच

## (मागील अंकावरून चालू)

– श्री. डी. जी. देशपांडे
खुरसिल नाझ, दादर,
मुंबई – ४०० ०१४.

६५

गणूदास विनवी साईनाथा। माझे ग्रंथ परिश्रम वृथा।
ही या ईशावास्याची कथा। आपण सर्व जाणतां॥
अशंका दूर झाल्याविना। ग्रंथाचा या उकल पडेना॥
महाराज देती आशीर्वचना। प्रसन्नमना असें तूं॥
"काय रे यांत आहे कठिण। जाता आलिया स्थळीं परतोन।
त्या काकांची मोलकरीण। शंका निवारण करील कीं,"॥
ठाईच बैसोनि मजला पुसा। उगीच कां रानोमाळ गिंवसा।
पुरवितों मी तुमचा धिंवसा। एव्हढा भरवसा राखावा॥
असे मी भरलों सर्वांठायीं। मजवीण रिता ठाव नाही।
कुठेंही कसाही प्रगटें पाहीं। भावापायीं भक्तांच्या॥
असमर्थपणें फाटकें लेणें। समर्थपणेंही तैसेंच करणे।
या नांव दैन्य संपन्नपणें मिरवणें। भावनेगुणें सुखदुःख॥
हेंच ते गणुदासांचें कोडें। एणेंपरी जेव्हां उलगडे।
ईशावास्याचें केणें सांपडे। ठायींच पडे अर्थबोध॥

– अ. २० वा

६६

"कानडी आप्पाचें ते सांगणे। जैसें रेडिया संगे घाट चढणें।
ऐसें न येथील सोपें चालणें। अंग झिजविणें अनिवार्य॥
तयांसी म्हणती साईनाथ।" अप्पानीं सांगितले तें यथार्थ।
परी जेव्हां तें येईल कृतींत। पूर्ण मनोरथ तै होती॥

– अ. २१ वा

६७

बाबा देत प्रत्युतर। "एकदां एक आत्मा सौदागर।
तेव्हां एक घोडेंसमोर। घाली लेंडार नवांचे॥
सौदागर निज कार्यतत्पर। लेंडिया पडता पसरिला पदर।
बांधून घेता घट्ट त्या समग्र। चितैकाग्र्य लाधला॥

दुसरे दिवशीं अनंतराय। वंदूं जातां साईंचे पाय।
"पदरी बांधिल्यास लेंड्या काय।" पृच्छा ही होय तयांस॥
अनंतराव तेव्हां प्रार्थिती। कृपा असावी दीनावरती।
सहज मग त्या बांधिल्या जाती। काय ती महती तयांची॥
तंव बाबा आशीर्वाद देती। कल्याण होईल आश्वासिती।
अनंतराव आनंदले चित्तीं। सुखसंवित्ति लाधले॥

— अ. २१

६८

"लोक तरी हो लबाड किती। पायां पडती दक्षिणाही अर्पिती।
आणीक आंतून शिव्याही देती। काय चमत्कृती सांगावी॥"

— अ. २१

६९

कैसी भावी संकट सुचना। सोपाय तन्निवारण योजना।
करून कैसें रक्षित भक्तजनां। अघटित घटना बाबांची॥
बाबा मिरी करांस ते ठायी। पुसती प्रश्न पहा नवलाई।
"अहो ती आपली द्वारकामाई। आहे का ठावी तुम्हांतें"॥
बाळासोहबांस हा कांहीं। मुळीच उलगडा झाला नाहीं।
तव बाबा वदती "आतां पाहीं। द्वारकामाई ती हीच॥
हीच आपली द्वारकामाता। मशीदीचे या अंकी बैसतां।
लेंकुरां देई ती निर्भयता। चिंतेची वार्ता नुरेचि॥
मोठी कृपाळू ही मशीदमाई। भोळ्या भाविकांची ही आई।
कोणी कसाही पडो अपायीं। करील ही ठायींच रक्षण॥
एकदां हीचे जो अंकी बैसला। बेडा तयाचा पार पडला।
साउलींत हिचे जो पहुडला। तो आरूढला सुखासनीं॥
हीच द्वारका द्वारावती"।
आणीक वाटले बाबांचे जीवा। मिरी करांते प्रश्न पुसावा।
ठावा का तुज लांब बावा। "ऐसा भयंकर असतो तो॥
परी तो काय करतो आपुलें। आपण द्वारकामाईचीं पिल्लें।
कोणा न उमगे तिचे केलें। कौतुक उगलें पहावें॥
द्वारकामाई असतां तारिती। लांब बावा काय मारिती।
तारित्यापुढें मारित्याची गती। ती काय किती समजावीं"॥
म्हणती "शामा तूं ही तयारी। करीं जाई त्याचे बरोबरी।
मारून ये चिथळीची फेरी। मौज भारी होईल"॥
बाबा म्हणती "बरें झालें। काय कीं हरवलें आपुलें॥

मंत्र तीर्थ द्विज देव। दैवज्ञ वैद्य कीं गुरूराव।
यांच्या ठायीं जैसा भाव। तैसाच उद्‌भव फलाचा॥
आपण चिंतावें नित्य हित। उपदेशावा अर्थ विहित।
असेल जैसें जयाचे कर्मांत।तैसेंच निश्चित घडेल"।
मग हांसून म्हणती साई। "बरें तो नेतो तर तूं जाई।
नांव हिचे मशीदमाई। ब्रीदास काई घालवील॥
आई ती आई बहु मायाळू। लेंकरा लागीं अति कनवाळू।
परी लेंकरेंच निघता टवाळू। कैसा सांभाळ करी ती"॥

— अ. २२ वा

७०

तात्काळ बाबा बुट्टीस पुसती। "काय हे नाना काय वदती।
ते काय तुज माराया बघती। नलगे ती भीती आपणा॥
कैसा मारतोस पाहूं मार। खुशाल त्यांना देईं उत्तर।

— अ. २२ वा

७१

परी "मी बंदा अल्लाचिये पदरीं। स्वयें ये परी वदतते।
कधी न म्हणवीत "अनल हक्क। मी एक परमेश्वराचा पाईक।
गरीब मी 'यादेहक्क'। 'अल्ला मालीक' जप नित्य॥

— अ. २३ वा

७२

म्हणती "नाना, कांदा ज्यां पचनीं। पडे तयांनींच खावा तो।
पचविण्याचा जोम व्हावा। तयाने कांदा खुशाल खावा"॥

— अ. २३ वा

७३

"चढूं नको भटुरड्या वर। चढशील तर खबरदार।
चल नीघ जा खाली उतर।" केली दीर्घश्वर गर्जना॥
बाबा म्हणाले "न सोडी धीर। काहींही मनीं न करी जिकीर।
बरें होईल सोडीं फिकीर। दयाळू फकीर सांभाळील॥

घरीं जाऊन स्वस्थ बैस। घराबाहेर जाऊं नकोस।
राहीं निर्भय निश्चिंत मानस। ठेवीं विश्वास मजवरी॥
निजूं नका त्याला म्हणावें। घरचे घरी फिरत रहावें।
वाटेल तें खुशाल खावें। सांभाळावें हें इतुकें॥
"चढूं नको भटुरड्यावर"। ऐसे बाबांचे शब्द प्रहार।
ते काय माधवरावांवर। होते प्रेरीले बाबांनीं॥
माधवरावांस अनुलक्षून। नव्हतें कीं तें शब्दसंधान।
दंशकारक विखारालागून। अनुज्ञापन ते तीव्र॥
"चढशील तर खबरदार"। साई मुखींची आज्ञा प्रखर।
जागींच विषसंचार स्थिर। रोधिला प्रचार पुढील॥
इतुकेच झालें नाहीं तर। "चल नीघ जा खाली उतर"।
हाच साई पंचाक्षरी मंत्र। उतरवी विखार तात्काळ॥

— अ. २३ वा.

(अपूर्ण)

## लेखक - कवींस निवेदन

**'श्री साईलीला' मासिकाकरिता साहित्य पाठविताना लेखक - कवींनी पुढील गोष्टींची दक्षता घेणे आवश्यक आहे.**

*** अंतर्देशीय पत्रावर, पोस्टकार्डवर लेखन करू नये.**

***आमच्याकडे आलेल्या कवितांचे प्रमाण खूपच असल्याने, पुढील सूचना मिळेपर्यंत, कृपया, कविता पाठवू नयेत.**

*** सुवाच्च अक्षरात, कागदाच्या डाव्या बाजूस भरपूर समास सोडून, दोन ओळींच्या मध्ये पुरेशी मोकळी जागा ठेवून लिखाण असावे, ते पाठपोठ असू नये, शक्यतो टंकलिखित असावे, लेखनासाठी वापरात येणारा कागद जीर्ण-विजीर्ण, टाकाऊ असू नये.**

*** हयात असलेल्या संतांविषयीचे लेख, सामान्य दर्जाचे अनुभव पाठवू नयेत.**

*** अभ्यासपूर्ण, तर्कशुध्द, मीमांसक व वैचारिक स्वरूपाच्या लेखांना प्राधान्य दिले जाईल.**

**— का. सं.**

# श्री साई सहस्त्र नामावली

**(मागील अंकावरून क्रमशः)**

६०१) श्री साई तपश्चर्या नमो नमः
६०२) श्री साई त्रिकाळसत्य नमो नमः
६०३) श्री साई तेजश्री नमो नमः
६०४) श्री साई तीर्थयात्रा नमो नमः
६०५) श्री साई तुळस नमो नमः
६०६) श्री साई त्रिभुवनपालक नमो नमः
६०७) श्री साई त्रैलोक्यस्वामी नमो नमः
६०८) श्री साईनिकेतन नमो नमः
६०९) श्री साई नवनाथा नमो नमः
६१०) श्री साईनंदाय नमो नमः
६११) श्री साई नम्रता नमो नमः
६१२) श्री साई निर्माल्य नमो नमः
६१३) श्री साई नियमन नमो नमः
६१४) श्री साई निराकार नमो नमः
६१५) श्री साई निर्गुण नमो नमः
६१६) श्री साई नवल नमो नमः
६१७) श्री साई नवज्योत नमो नमः
६१८) श्री साई निजरूप नमो नमः
६१९) श्री साई नित्यानंदाय नमो नमः
६२०) श्री साई नाम नमो नमः
६२१) श्री साई नक्षत्र नमो नमः
६२२) श्री साई नरदेह नमो नमः
६२३) श्री साई नवयोजना नमो नमः
६२४) श्री साई नारायण नमो नमः
६२५) श्री साई नागराजाय नमो नमः
६२६) श्री साई निंबवृक्ष नमो नमः
६२७) श्री साई नवलाई नमो नमः
६२८) श्री साई नामसुगंध नमो नमः
६२९) श्री साई नैवेद्य नमो नमः
६३०) श्री साई नयनमनोहर देवाय नमः
६३१) श्री साई नीर्मळ नमो नमः
६३२) श्री साई नामसंकीर्तन नमो नमः
६३३) श्री साई निरंजन नमो नमः
६३४) श्री साई नि-वृती दास नमो नमः
६३५) श्री साई नामरूप देवाय नमो नमः
६३६) श्री साई नाथ नमो नमः
६३७) श्री साई नाम मोक्षकारी नमो नमः
६३८) श्री साई निरंतर नमो नमः
६३९) श्री साईबीज आत्मानंद नमो...
६४०) श्री साई नयनकमळ नमो नमः
६४१) श्री साई नामपुण्यस्मरण नमो...
६४२) श्री साई निजानंद रूप नमो...
६४३) श्री साई नवगृह नमो नमः
६४४) श्री साई निर्वाणरक्षी नमो नमः
६४५) श्री साई निर्माण नमो नमः
६४६) श्री साई तत्वज्ञान नमो नमः
६४७) श्री साई योगेश्वराय नमो नमः
६४८) श्री साई योग समर्थाय नमो...
६४९) श्री साई यश नमो नमः
६५०) श्री साई युगअवतार नमो नमः
६५१) श्री साई योजना नमो नमः
६५२) श्री साई योगीराज नमो नमः
६५३) श्री साई याचना नमो नमः
६५४) श्री साई योगसाधना नमो नमः
६५५) श्री साई यशवंत नमो नमः
६५६) श्री साई येशू देवाय नमः
६५७) श्री साई यशदेव नमो नमः
६५८) श्री साई योगामृत नमो नमः
६५९) श्री साई याग देवाय नमः
६६०) श्री साई युवराजाय नमः
६६१) श्री साई युग नमो नमः
६६२) श्री साई योगरहस्य नमो नमः
६६३) श्री साई योगलिला नमो नमः
६६४) श्री साई व्यंकटेश नमो नमः
६६५) श्री साई व्यापकता नमो नमः

६६६) श्री साई योगानंदाय नमो नमः
६६७) श्री साई ज्ञानवंत नमो नमः
६६८) श्री साई प्रसन्नवदन नमो नमः
६६९) श्री साई प्रभाकराय नमः
६७०) श्री साई फकीररूप नमो नमः
६७१) श्री साई पिता नमो नमः
६७२) श्री साई प्रेमधारा नमो नमः
६७३) श्री साई परमानंद नमो नमः
६७४) श्री साई प्रज्ञा नमो नमः
६७५) श्री साई पांडुरंग नमो नमः
६७६) श्री साई पाठीराखा नमो नमः
६७७) श्री साई पदकमळ नमो नमः
६७८) श्री साई प्रदीप नमो नमः
६७९) श्री साई परमेश्वर नमो नमः
६८०) श्री साई परिस नमो नमः
६८१) श्री साई प्रसन्न नमो नमः
६८२) श्री साई प्रेम नमो नमः
६८३) श्री साई प्रसाद नमो नमः
६८४) श्री साई प्रभुराम नमो नमः
६८५) श्री साई पंढरीनाथ नमो नमः
६८६) श्री साई प्रेरणा देवाय नमो नमः
६८७) श्री साई प्रेमळमूर्ती नमो नमः
६८८) श्री साई प्रती परमेश्वराय नमोनमः
६८९) श्री साई प्रफुल्ल नमो नमः
६९०) श्री साई प्रेमस्वरूप नमो नमः
६९१) श्री साई पालक नमो नमः
६९२) श्री साई पंचप्राण नमो नमः
६९३) श्री साई प्रभा देवाय नमो नमः
६९४) श्री साई पैगंबर नमो नमः
६९५) श्री साई पतीतोध्दार नमो नमः
६९६) श्री साई पुराण नमो नमः
६९७) श्री साई पंचतत्व नमो नमः
६९८) श्री साई प्रेमभक्ती नमो नमः
६९९) श्री साई प्रचीती नमो नमः
७००) श्री साई प्रतीक्षा नमो नमः
७०१) श्री साई प्रेमगाथा नमो नमः
७०२) श्री साई पुराण पुरूषनमो नमः
७०३) श्री साई पादुकास्थान नमोनमः
७०४) श्री साई प्रवृत्ती नमो नमः
७०५) श्री साई पूर्ण ब्रहमानंदाय नमो
७०६) श्री साई पार्वतीकांत नमो नमः
६०७) श्री साई पुण्याई नमो नमः
७०८) श्री साई परमानंदाय नमो नमः
७०९) श्री साई पंचमहाभूते नमो नमः
७१०) श्री साई प्रभा मंडळ नमो नमः
७११) श्री साई परमपावन नमो नमः
७१२) श्री साई प्रेम स्नेह देवाय नमः
७१३) श्री साई प्रभु नमो नमः
७१४) श्री साई पदस्पर्श नमो नमः
७१५) श्री साई प्रतापज्योत नमो नमः
७१६) श्री साई पुरूषोत्तमाय नमो नमः
७१७) श्री साई परमात्मा नमो नमः
७१८) श्री साई परशुराम नमो नमः
७१९) श्री साई पूजा नमो नमः
७२०) श्री साई परब्रम्ह नमो नमः
७२१) श्री साई प्रभुपद नमो नमः
७२२) श्री साई प्रणाम कोटी कोटी...
७२३) श्री साई प्राणसखा नमो नमः
७२४) श्री साई प्रकृति नमो नमः
७२५) श्री साई पुंडलिक नमो नमः
७२६) श्री साई पतीतपावन नमो नमः
७२७) श्री साई पुरूषोत्तमानंदाय. ...
७२८) श्री साई परमपुरूष नमो नमः
७२९) श्री साई पुण्यप्रद नमो नमः
७३०) श्री साई परमहंस नमो नमः
७३१) श्री साई प्रगटन नमो नमः
७३२) श्री साई प्रभूस्वये नमो नमः
७३३) श्री साई प्रभात नमो नमः
७३४) श्री साई प्रभाव नमो नमः
७३५) श्री साई पवित्रपावन नमो नमः

३६) श्री साई पार्वतीरमण नमो नमः
३७) श्री साई परमआश्रय नमो नमः
३८) श्री साई परमपद दाता नमो नमः
३९) श्री साई पुण्यापुरूष नमो नमः
४०) श्री साई श्रीकांत देवाय नमो नमः
४१) श्री साई पुण्याराशी नमो नमः
४२) श्री साई प्रहर नमो नमः
४३) श्री साई प्रसन्नवदन नमो नमः
४४) श्री साई माता नमो नमः
४५) श्री साई मनोहर नमो नमः
४६) श्री साई ममता नमो नमः
४७) श्री साई परमार्थ नमो नमः
४८) श्री साई महात्म नमो नमः
४९) श्री साई मधुसूदनाय नमो नमः
५०) श्री साई मोरेश्वराय नमो नमः
५१) श्री साई मधुकराय नमो नमः
५२) श्री साई मानसपुजा नमो नमः
५३) श्री साई माधवाय नमो नमः
५४) श्री साई मंगल नमो नमः
५५) श्री साई मशीदमाई नमो नमः
५६) श्री साई मंगल स्नान नमो नमः
५७) श्री साई मूर्त स्वरूप नमो नमः
५८) श्री साई मुक्तानंदाय नमो नमः
५९) श्री साई महादेवाय नमो नमः
६०) श्री साई मुखकमल नमो नमः
६१) श्री साई मोहनाय नमो नमः
६२) श्री साई मयूरेश्वराय नमो नमः
६३) श्री साई मुक्ती स्थान नमो नमः
६४) श्री साई मुरारी देवाय नमो नमः
६५) श्री साई महाराज नमो नमः
६६) श्री साई महिमा नमो नमः
६७) श्री साई महेश्वराय नमः
६८) श्री साई महापुरूषाय नमो नमः
६९) श्री साई मुकूंदराजाय नमः
७०) श्री साई मंगलमूर्ती नमो नमः
७१) श्री साई मिलाप नमो नमः

७७२) श्री साई महात्म पारायण नमो...
७७३) श्री साई मुनीजन सुखकारी नमो...
७७४) श्री साई महाथोर संत नमो नमः
७७५) श्री साई मोक्षदाता नमो नमः
७७६) श्री साई मांगल्य मूर्ती नमो नमः
७७७) श्री साई मायमाऊली नमो नमः
७७८) श्री साई महाविष्णू नमो नमः
७७९) श्री साई महामुनी नमो नमः
७८०) श्री साई नाथमाऊली नमो नमः
७८१) श्री साई मेघःश्याम नमो नमः
७८२) श्री साई महायोगी नमो नमः
७८३) श्री साई मंदीर देवाय नमः
७८४) श्री साई माला नमो नमः
७८५) श्री साई सुखकमळ नमो नमः
७८६) श्री साई माय नमो नमः
७८७) श्री साई मोरया नमो नमः
७८८) श्री साई मंत्रजप नमो नमः
७८९) श्री साई मनमोहनाय नमो नमः
७९०) श्री साई मकरंदाय नमो नमः
७९१) श्री साई मातापिता नमो नमः
७९२) श्री साई महंत नमो नमः
७९३) श्री साई मार्तंड देवाय नमः
७९४) श्री साई मंत्रजप नमो नमः
७९५) श्री साई ईश्वर नमो नमः
७९६) श्री साई उपनिषीद नमो नमः
७९७) श्री साई उध्दार नमो नमः
७९८) श्री साई उत्कर्ष नमो नमः
७९९) श्री साई उषःकाल नमो नमः
८००) श्री साई उपदेश नमो नमः
८०१) श्री साई उपासना नमो नमः
८०२) श्री साई उदात्त नमो नमः
८०३) श्री साई उज्ज्वल नमो नमः
८०४) श्री साई उदय नमो नमः
८०५) श्री साई उल्हास नमो नमः
८०६) श्री साई उकार नमो नमः
८०७) श्री साई उदी प्रसाद नमो नमः

८०८) श्री साई लिला नमो नमः
८०९) श्री साई लिलाधर नमो नमः
८१०) श्री साई यमनियमन नमो नमः
८११) श्री साई लिलामृत नमो नमः
८१२) श्री साई लक्ष्मण नमो नमः
८१३) श्री साई लक्ष्मी नमो नमः
८१४) श्री साई लिलाअघटीत नमो नमः
८१५) श्री साई लक्ष्मीपती नमो नमः
८१६) श्री साई लाभ नमो नमः
८१७) श्री साई लक्ष्मी नाथाय नमो नमः
८१८) श्री साई ललीतसै नमो नमः
८१९) श्री साई लौकीक नमो नमः
८२०) श्री साई ज्ञान नमो नमः
८२१) श्री साई लक्ष्मीकांत नमो नमः
८२२) श्री साई चरण नमो नमः
८२३) श्री साई चेतना नमो नमः
८२४) श्री साई चंदनाय नमो नमः
८२५) श्री साई चंद्रकलाय नमो नमः
८२६) श्री साई चिदानंदाय नमो नमः
८२७) श्री साई चराचर देवाय नमः
८२८) श्री साई चमत्कार स्वरूप नमो नमः
८२९) श्री साई छत्र नमो नमः
८३०) श्री साई चिंतामणी नमो नमः
८३१) श्री साई चिंतन नमो नमः
८३२) श्री साई चैतन्य नमो नमः
८३३) श्री साई चिरंतन नमो नमः
८३४) श्री साई चरणदास नमो नमः
८३५) श्री साई चरणकमळ नमो नमः
८३६) श्री साई चिद्‌विलासानंदाय नमो नमः
८३७) श्री साई चिन्मयरूप नमो नमः
८३८) श्री साई चावडी नमो नमः
८३९) श्री साई चरण पादूका नमो नमः
८४०) श्री साई चित् शक्ती नमो नमः
८४१) श्री साई चरण स्पर्श नमो नमः
८४२) श्री साई चरीत्र नमो नमः
८४३) श्री साई चैतन्याश्रय नमो नमः
८४४) श्री साई चित्त देवाय नमो...
८४५) श्री साई चंद्राय नमो नमः
८४६) श्री साई चांदभाईसह नमो नमः
८४७) श्री साई हनुमंतस्वरूप नमो...
८४८) श्री साई हरिनाथ नमो नमः
८४९) श्री साई हरिपाठ नमो नमः
८५०) श्री साई हरि गोवींदाय नमो...
८५१) श्री साई हृदयेश्वराय नमो नमः
८५२) श्री साई हरे राम नमो नमः
८५३) श्री साई हरे कृष्ण नमो नमः
८५४) श्री साई हरिदास नमो नमः
८५५) श्री साई आत्मज्ञान नमो नमः
८५६) श्री साई अमरादीनाथ नमो...
८५७) श्री साई अनीलरूप नमो नमः
८५८) श्री साई अलौकीक नमो नमः
८५९) श्री साई अमृत नमो नमः
८६०) श्री साई आत्मबल नमो नमः
८६१) श्री साई अहंभावरक्षक नमो...
८६२) श्री साई परम दैवत नमो नमः
८६३) श्री साई प्रभू नमो नमः
८६४) श्री साई परीवार नमो नमः
८६५) श्री साई प्रभू रामचंद्राय नमो...
८६६) श्री साई परलोक नमो नमः
८६७) श्री साई सहजजीवन नमो नमः
८६८) श्री साई प्रातःस्मरण नमो नमः
८६९) श्री साई शरणार्थी नमो नमः
८७०) श्री साई कर्मयोगी नमो नमः
८७१) श्री साई योगीराज देवाय नमः
८७२) श्री साई जागरूकता नमो नमः
८७३) श्री साई कफनी नमो नमः
८७४) श्री साई उदारता नमो नमः
८७५) श्री साई प्रेमगीत नमो नमः
८७६) श्री साई उदी महीमा नमो नमः
८७७) श्री साई सहजयोग नमो नमः
८७८) श्री साई अधिष्ठान नमो नमः
८७९) श्री साई भक्ती साधना नमो...

८०) श्री साई आदर्श नमो नमः
८१) श्री साई स्मरण देवाय नमः
८२) श्री साई सुलोचना नमो नमः
८३) श्री साई प्रतीभा नमो नमः
८४) श्री साई नंद देवाय नमः
८५) श्री साई सत्यवान नमो नमः
८६) श्री साई अमृतानुभव देवाय नमः
८७) श्री साई भावार्थ नमो नमः
८८) श्री साई भावानिष्ठा नमो नमः
८९) श्री साई उत्तमगती नमो नमः
९०) श्री साई विश्वबंधुत्व नमो नमः
९१) श्री साई उत्सव नमो नमः
९२) श्री साई रामनवमी नमो नमः
९३) श्री साई प्राणप्रतिष्ठा नमो नमः
९४) श्री साई गुरूभक्ती नमो नमः
९५) श्री साई गाथा नमो नमः
९६) श्री साई अवर्णनीय नमो नमः
९७) श्री साई वाचासिध्दी नमो नमः
९८) श्री साई साधना नमो नमः
९९) श्री साई तपस्या नमो नमः
१००) श्री साई आराधना नमो नमः
१०१) श्री साई भूतदया नमो नमः
१०२) श्री साई पुरषार्थ नमो नमः
१०३) श्री साई आनंदाश्रू नमो नमः
१०४) श्री साई पूजाविधान नमो नमः
१०५) श्री साई अष्टभाव नमो नमः
१०६) श्री साई दृढभक्ती नमो नमः
१०७) श्री साई तापनिवारक नमो नमः
१०८) श्री साई पुष्पहार नमो नमः
१०९) श्री साई सौदागर नमो नमः
११०) श्री साई विवेक नमो नमः
१११) श्री साई वृक्षवल्ली नमो नमः
११२) श्री साई पालखी सोहळा नमो नमः
११३) श्री साई प्रणाम कोटी कोटी प्रणामः
११४) श्री साई प्रवचन नमो नमः
११५) श्री साई पोथी नमो नमः
११६) श्री साई महिमा नमो नमः
११७) श्री साई स्तोत्र नमो नमः
११८) श्री साई पुरूष सुक्त नमो नमः
११९) श्री साई स्तवन मंजीरी नमो...
१२०) श्री साई सगूण उपासना नमो...
१२१) श्री साई रूद्राध्याय नमो नमः
१२२) श्री साई जितेंद्रीय नमो नमः
१२३) श्री साई हितकर्ता नमो नमः
१२४) श्री साई मध्यस्थ नमो नमः
१२५) श्री साई प्रकृतीस्वभाव नमो...
१२६) श्री साई राजर्षी नमो नमः
१२७) श्री साई आलिप्त नमो नमः
१२८) श्री साई धनुर्धर नमो नमः
१२९) श्री साई संयमन नमो नमः
१३०) श्री साई महारथी नमो नम
१३१) श्री साई धर्मराज नमो नमः
१३२) श्री साई अनंत विजय नमो...
१३३) श्री साई बालपण नमो नमः
१३४) श्री साई विचारी नमो नमः
१३५) श्री साई अनासक्त नमो नमः
१३६) श्री साई सहदेव नमो नमः
१३७) श्री साई संयोग नमो नमः
१३८) श्री साई तारुण्य नमो नमः
१३९) श्री साई मणिपुष्प नमो नमः
१४०) श्री साई अर्तक्य नमो नमः
१४१) श्री साई शाश्वत नमो नमः
१४२) श्री साई अगोचर नमो नमः
१४३) श्री साई निर्विकार नमो नमः
१४४) श्री साई महर्षी नमो नमः
१४५) श्री साई निराहारी नमो नमः
१४६) श्री साई वृध्दावस्था नमो नमः
१४७) श्री साई प्रीती द्वेषरहित नमो...
१४८) श्री साई स्थितप्रज्ञ नमो नमः
१४९) श्री साई जागृत नमो नमः

९५०) श्री साई निरिच्छ नमो नमः
९५१) श्री साई निराभीमान नमो नमः
९५२) श्री साई जनार्दन नमो नमः
९५३) श्री साई अव्ययतत्व नमो नमः
९५४) श्री साई ममत्व देवाय नमः
९५५) श्री साई शाश्वत कल्याण नमो नमः
९५६) श्री साई सचेतन नमो नमः
९५७) श्री साई सामवेद नमो नमः
९५८) श्री साई सत्य साई सत्य नमो नमः
९५९) श्री साई समत्व बुध्दी नमो नमः
९६०) श्री साई सात्वीक् नमो नमः
९६१) श्री साई सत् साई सत् साई
९६२) श्री साई साधुत्व नमो नमः
९६३) श्री साई इंद्रिय निग्रह नमो नमः
९६४) श्री साई सुखद देवाय नमः
९६५) श्री साई ज्ञानप्रदीप नमो नमः
९६६) श्री साई परमार्थ नमो नमः
९६७) श्री साई परमधाम नमो नमः
९६८) श्री साई यजुर्वेदाय नमो नमः
९६९) श्री साई ज्ञान सिध्दी नमो नमः
३७०) श्री साई ऋंगवेदाय नमो नमः
९७१) श्री साई ऋषी देवाय नमः
९७२) श्री साई मनो निग्रह नमो नमः
९७३) श्री साई अप्राकृत देह नमो नमः
९७४) श्री साई कार्य देह नमो नमः
९७५) श्री साई क्रिया योग नमो नमः
९७६) श्री साई गती नमो नमः
९७७) श्री साई नाद ब्रहम नमो नम
९७८) श्री साई सिध्द देह नमो नम
९७९) श्री साई पंचकोश नमो नमः
९८०) श्री साई नीग्रह नमो नमः
९८१) श्री साई ऋषी देवाय नमः
९८२) श्री साई ब्रहमस्थिती देवाय...
९८३) श्री साई राज्य लक्ष्मी नमो...
९८४) श्री साई लोकसंग्रह नमो नम
९८५) श्री साई महा बाहो नमो नम
९८६) श्री साई दोष दृष्टीरहित नम
९८७) श्री साई धर्मात्मा नमो नमः
९८८) श्री साई आत्मज्ञान नमो नम
९८९) श्री साई अचेतन नमो नमः
९९०) श्री साई आत्मएकनिष्ठ नमो...
९९१) श्री साई अनंत शक्ती नमो...
९९२) श्री साई आदिपुरुष नमो नम
९९३) श्री साई अन्यन्य शक्ती नम
९९४) श्री साई अस्तित्व नमो नमः
९९५) श्री साई अनुसंधान नमो नम
९९६) श्री साई ब्रहमविद्या देवाय...
९९७) श्री साई जीवात्मा नमो नमः
९९८) श्री साई अध्यमन नमो नमः
९९९) श्री साई ब्रहमस्वरूप देवाय...
१०००) श्री साई निर्वाणरूप देवाय...

— **श्री. संजीव चंदने**
माणिक कॉलनी,
अहिल्यादेवी चौक,
कल्याण.

**ग्रंथपरीक्षण**

# श्री गुरुसेवामृत

लेखिका – कु. शालिनीबेन देसाई, एम.एसस्सी., एम. फिल.
प्रकाशक – श्री. अनिल मेहता, अजब पुस्तकालय, भाऊसिंगजी रोड, कोल्हापूर, पाने १०४, किंमत २० रु, पुस्तक मिळण्याचे ठिकाण : शालिनी देसाई, २१ राजस ना.सी. फडके मार्ग, मु.पो. अंधेरी (पूर्व), मुंबई-४०० ०६९.

उच्चविद्याविभूषित व श्री साईलीलाच्या एकलोकप्रिय लेखिका कु. शालिनी देसाई यांनी आपले सारे उर्वरित जीवन अध्यात्म व साईसेवेला वाहून घेतले आहे. अध्यात्मात चांगलीच प्रगती करून त्यांनी या क्षेत्रात विपुल लेखनही करुन ठेवले आहे व ते भावी पिढीला निश्चित मार्गदर्शक ठरेल, यात शंकाच नको. कु. देसाई या कोल्हापूरच्या. त्यांनी आजवर केलेल्या लेखनाचा संग्रह व केलेल्या अनेक काव्यांचा असा संग्रह नुकताच प्रसिद्ध करून तो भाविकांच्या हाती दिला आहे. या सुंदर व संग्राह्य अशा पुस्तकाला श्री साईलीलाचे कार्यकारी संपादक श्री. सदानंद चेंदवणकर यांनी रोचक व उचित अशी प्रस्तावना लिहिली आहे. श्री. चेंदवणकर यांनी केवळ आजवर प्रस्तावना लिहिलेले हे एकावन्नावे पुस्तक होय! हा एक योगयोगच. पुस्तकावर एकमुखी दत्तात्रेयाचे बहारदार मुखपृष्ठ आहे. प्रत्येक साईभक्ताने हे पुस्तक अवश्य संग्रही ठेवावे अशी आमची शिफारस आहे.

– साईनंद

*****

# श्रीसंत संघ पुस्तकमाला

**(भाग २ व भाग ४)**

संपादन– श्री. कृष्ण जगन्नाथ थळी, पत्रव्यवहार– श्री. शं.कृ. थळी, ७२/७४ शापरिया बिल्डिंग, १ ला मजला, कामा बाग समोर, राजाराममोहन रॉय मार्ग, गिरगांव, मुंबई-४०० ००४. किंमत प्रत्येकी ४ रु. फक्त.

या पुस्तकाच्या प्रत्येक भागात ५०-५० भारतीय सुकीर्तीच्या संतांची छानदार व दुर्मिळ अशी छायाचित्रे गुळगुळीत कागदावर छापलेली असून त्याबरोबर त्यांचा मराठी व इंग्रजीतून अल्प परिचयही दिलेला आहे. श्रीसमर्थ वाग्देव महाराजांचे सत्शिष्य श्री. कृष्ण जगन्नाथ थळी यांनी मोठ्या कष्टाने व मेहनतीने हा संत चित्रमालेचा संच रसिक व संग्रही वृत्तीच्या भाविकांच्या हाती दिलेला आहे. निरनिराळ्या प्रांतांत व क्षेत्रांत महत्पद प्राप्त झालेल्या या संतांची एकाच ठिकाणी संग्रहीत केलेली ही चित्रे व माहिती पाहून कुणालाही या कार्यापायी संपादकांनी किती कष्ट घेतलेले आहेत, याची साक्ष पटते. पुस्तकाचा आकार डेमी अष्टपत्री असून, ते

सर्वांग सुंदर कापडी बांधणीचे आहे. प्रत्येक भागातील-२२ पाने संत पुरूषांचे अभंग पदे, गीते यांना दिलेली आहेत. एके काळी प्रसिद्ध केलेल्या या सुंदर पुस्तकांची स भालचंद्र भाटवडेकर, डॉ. मोरेश्वर गोपाळ देशमुख, गोविंदराव दाभोलकर, व्ही. व्ही वाघ, ना. गो. कोचक, ग्वाल्हेरचे राजेसाहेब माधवराव शिंदे यांनी प्रशंसा केलेली आहे उपलब्ध भाग आता प्रत्येक भाविकाने संग्रही ठेवावेत.

— साईनंद

★★★★★★★

# दर्शनाभिलाषि

तुझी कशी बांधू पूजा?
कधी येऊ दर्शनाला ।
साई सांग तरी मला ॥
साई-भक्ति, पती-भक्ति ।
दोही समान मजला ।
सद्‌विचार दे पतीला ।
साई, सांगतरी मला ।

साई - आज्ञा - ना दर्शना
येती अडचणी नाना ।
साई - सांगा तरी मला ॥
कधी संपती यातना ।
तुझी कशी बांधू पूजा ।
कशी येऊ दर्शनाला ।
साई - सांग तरी मला ॥

— सौ. सुमती गुप्ते
इंदौर


## 'श्रीसाईलीला'

**दिवाळी अंक १९८८**

श्रीसाईभक्तांना आलेल्या बाबांच्या विषयीच्या विविध अनुभवांनी भरगच्च असा अंक ऐन दिवाळीत थाटात भक्तांच्या भेटीस येईल. श्रीसाईभक्तांनी आपापले ताजे व प्रखर अनुभव कागदाच्या एकाच बाजूस सुवाच्य व थोडक्यात लिहून ते १ ऑगस्ट १९८८ पर्यंत संपादक, श्रीसाईलीला, साईनिकेतन, ८०४ बी, डॉ. आंबेडकर मार्ग, दादर, मुंबई ४०० ०१४-या पत्त्यावरच पाठवावेत. कार्यकारी संपादकांच्या निवासी पत्त्यावर पाठवू नयेत. वरील तारखेनंतर आलेल्या कोणत्याही मजकूराचा स्वीकार करता येणार नाही, याची नोंद घ्यावी.

**● मुखपृष्ठावर श्रींचे बहारदार चित्र ● पाने १२८, किंमत चार रुपये.**

# बंगालच्या निराहारी योगिनी-गिरिबाला

**ज्योति उमडेकर**
द्वारा :- मिलिन्द प्रभाकर उमडेकर
असिस्टंट स्टेशन मास्टर,
शांता सदन, १८ नवी पेठ, उज्जैन.

प्रत्येक मनुष्याला आपण फार चांगले आहो, आपल्यासारखा चांगला कुणीच नाही, असे वाटत असते. दुसऱ्या कुणी जर आपले दोष दाखवले तर आपल्याला अत्यंत राग येतो. आपण त्या माणसाचा द्वेष करू लागतो वा संबंध सोडून देतो. परंतु हे बरोबर नव्हे. तुकारामासारखे संत सांगून गेले की, 'निंदकाचे घर असावे शेजारी' आणि महात्मा कबीर यांनी दोहा लिहून ठेवला की,'निंदक नियरे राखिये, आँगन कुटी छवाय। बिन पानी साबुन बिना निर्मल करे सुभाय।।' तर निंदकाने केलेल्या निंदेमुळे आपल्याला आपले दोष दिसतात व आपण ते दूर करण्याचा प्रयत्न तरी करू शकतो. म्हणून खरे पहाता निंदक हे आपले उपकारकर्तेच आहेत.

संत तुलसीदासांच्या लंपटपणाची त्यांची पत्नी रत्नावली हिने तीव्र निभर्त्सना केली तर त्यांच्या चित्ताचा लय परमेश्वराकडे लागून त्यांना रामदर्शन झाले, राम-लक्ष्मणांनी गंगेच्या तीरावर त्यांच्या हातून चंदन लावून घेतले. तुलसीदास 'रामचरित मानस' रचून अमर झाले. पंडित बिल्वमंगलांची एका गणिकेच्या रूपजाळ्यात फसल्यामुळे स्वकर्तव्यविमुख होऊन,जेव्हा अधोगतीची परमावधी झाली तेव्हा त्यांच्या घरची परिस्थिती कळल्यामुळे त्या गणिकेने त्यांची यथेच्छ निर्भत्सना केली. बिल्वमंगलांनी तत्काळ आपले डोळे फोडून घेतले व ते 'सूरदास' बनून ईश्वरभजनात लीन झाले. भगवान श्रीकृष्णांनी त्यांना दिव्य नेत्र देऊन आपली बाललीला दाखविली. संत सूरदास अनेक काव्ये रचून हिंदी साहित्यात अमर झाले.

एवंच मनुष्याची उन्नती होण्यास निंदा वा निर्भत्सना कारण होते. त्यांच्यातले चेतनेचे स्फुल्लिंग जागृत होते व तो असाधारण प्रगती करून घेतो.

अशीच काहीशी कथा आहे बंगालच्या निराहारी योगिनी गिरिबाला यांची. त्या लहान असताना त्यांना अतिशय भूक लागायची. त्या दिवसभर सारखे काहींना काहीतरी खात असायच्या. त्यांची आई त्यांना नेहमी म्हणायची की,बाळ, असे सारखे खाणे बरे नव्हे. सासरी गेल्यावर तुला हे जड जाईल. ती माणसे तुला बोलतील. परंतु गिरिबाला यांना खाण्याचा लोभ सावरता आला नाही. परिणाम व्हायचा तोच झाला. लग्न त्या काळच्या रिवाजाप्रमाणे त्या बारा वर्षांच्या असताना झाले. सासरी आल्यावर त्यांच्या सतत खाण्यामुळे सासू त्यांना बोलायची. एक दिवस सकाळीच सासू त्यांना अत्यंत मर्मभेदी शब्द बोलली. गिरिबाला यांनी उत्तर दिले की, तुम्ही मला खाण्यावरून बोलता, आता मी जिवंत असेतो काहीही खाणार,पिणार नाही. सासू कुत्सितपणे हसून म्हणाली की, सारखा खादाडपणा करण्याची तुझी सवय आहे. बिना खातापिता तू

कशी जिवंत रहाशील? गिरिबाला यांना हे बोलणे फार लागले. त्या घरातून निघून गंगातटाकडे जाऊ लागल्या. सारखी देवाची प्रार्थना केली की, हे परमेश्वरा, मला अशी काही शक्ती दे की बिना खाता पिता मी जिवंत राहू शकेन. वाटेत त्यांचे कुलपुरोहित भेटले. गिरिबाला यांनी त्यांना आपली व्यथा सांगितली. परंतु ते काही मार्गदर्शन करू शकले नाहीत. गिरिबाला पुढे चालल्या. इतक्यात त्यांचे गुरू प्रकट झाले. त्यांनी गिरिबालेला म्हटले, बाळ, मी तुझा गुरू आहे. परमेश्वराच्या आज्ञेवरून मी येथे प्रकट झालो आहे. तुझी व्यथा मी जाणतो. नदीतीरावर चल. गिरिबाला नदीवर गेल्या. त्यांनी सचैल स्नान केले. जणू त्या दीक्षा घेण्यास सज्ज झाल्या. गुरूंनी दोघांच्या भवती प्रकाशाचा एक घेरा निर्माण केला व मंत्रासहित त्यांना श्वासाची अशी एक क्रिया शिकविली की, जीवनाला आवश्यक शक्ती त्यांना सूर्यकिरणांपासून प्राप्त होऊ लागली. 'ओम' ह्या मंत्राचा उच्चार करताना मेरूदंडात (पाठीचा कणा) असलेल्या कंठाच्या विरूद्ध दिशेस स्थित असलेल्या 'विशुद्ध' चक्राला योगबळाने जागृत करून त्याद्वारे सूर्यकिरणात असलेली जीवनशक्ती विशिष्ट श्वासक्रियेने त्या घेऊ लागल्या. खाणेपिणे नसल्यामुळे मलमूत्र त्यागाची आवश्यकता त्यांना भासत नसे. त्या कधी आजारी पडल्या नाहीत. कुठलाही रोग त्यांना झाला नाही. त्यांना संतान झाले नाही. एकांतात राहून विधवेचे जीवन त्या व्यतीत करीत होत्या. स्वतः निराहारी असल्या तरी स्वयंपाक करून पाहुण्यांना जेवायला वाढण्याची विलक्षण आवड त्यांना होती. बर्दवानच्या राजाने त्यांना एका बंद खोलीत दोन महिने ठेवून त्यांच्या निराहारीपणाची परीक्षा घेतली होती. गिरिबाला दिवसा घरकाम, अतिथि-अभ्यागतांचे स्वागत करून गृहस्थधर्माचे पालन करीत व रात्री ध्यानधारणा करीत. ध्यानात त्यांच्या गुरूंचे व इतर देवतांचे दर्शन त्यांना होत असे. झोपेची त्यांना विशेष आवश्यकता भासत नसे. ऋतुपरिवर्तनाची जाणीव ही त्यांना विशेष रूपाने होत नसे.

इतक्या महान योगिनी असूनही गिरिबाला स्वतःला अतिशय सामान्य समजत व त्यांचे वर्तन अत्यंत नम्रपणाचे असे.

सासूने केलेल्या कठोर निर्भत्सनेमुळे गिरिबाला यांची अध्यात्मिक चेतना जागृत झाली. त्यांनी मनावर नियंत्रण करून दृढनिश्चयाने योगमार्गात स्वतःची उन्नती करून घेतली व बंगालच्या इतिहासात आपले नाव अमर केले. त्या निराहारी योगिनीला शतशः प्रणाम.

# तुमचे भगवान दत्तात्रेयासंबंधीचे सामान्यज्ञान किती आहे?

(पुढीलपैकी सहा प्रश्नांची उत्तरे बरोबर देता आल्यास तुमचे सामान्य ज्ञान बरे, आठांची बरोबर देता आल्यास चांगले व सर्वच्या सर्व देता आल्यास उत्कृष्ट समजावे.)

१) दत्त ही देवता आपल्या भक्तावर ........ करणारी आहे.
अ) क्षमा, ब) दया, क) शांती, ड) क्रोध.

२) भगवान दत्तात्रेयाने ....... नामक दैत्याचा पराभव केला.
अ) व्योमासूर, ब) धूम्रवर्ण, क) मधुकैटभ, ड) जृम्भ.

३) 'दत्त पुराण' हा संस्कृत ग्रंथ ....... यांनी लिहिला.
अ) अखंड आनंदजी, ब) वासुदेवानंद सरस्वती, क) स्वामी चिन्मयानंद, ड) केवलानंद सरस्वती.

४) ........ हे स्थान म्हणजे भगवान दत्तात्रेयाचे निद्रास्थान होय.
अ) अकोला, ब) बडनेरा, क) कळंब, ड) माहूर.

५) 'गुरू चरित्र' अध्याय १३ मध्ये श्री दत्तमहाराजांनी ....... शहराला भेट दिल्याचा उल्लेख आहे.
अ) नाशिक, ब) नागपूर, क) नालासोपारा, ड) नांदेड.

६) श्री दत्तात्रेयांचे वसतीस्थान अखंडपणे ....... वृक्षाखाली असते.
अ) औदुंबर, ब) वड, क) नारळ, ड) चिंच.

७) 'भस्माचा डोंगर' पहावयाचा असेल तर तुम्हास ........ येथेच गेले पाहिजे.
अ) गदग, ब) गडहिंग्लज, क) गोकर्ण महाबळेश्वर, ड) गाणगापूर.

८) गुरूचरित्र हा ग्रंथ ........ यांनी लिहिला.
अ) आनंदमूर्ती, ब) मुक्तानंद स्वामी, क) सरस्वती गंगाधर, ड) गंगागीर बाबा.

९) महाराष्ट्रातील बरीचशी दत्तक्षेत्रे ........ नदीच्या तीरावर आहेत.
अ) कावेरी, ब) काळू, क) कृष्णा, ड) कुंभी.

१०) भगवान दत्तात्रेयाचे इतिहास काळातील पहिले अवतार ..... हे समजले जातात.
अ) श्रीपाद श्रीवल्लभ, ब) श्री नृसिंह सरस्वती, क) श्री माणिक प्रभू, ड) अक्कलकोट स्वामी.

११) श्री दत्तात्रेयांना मागे उभी असलेली गाय ........ चे सूचक समजली जाते.
अ) आप, ब) तेज, क) पृथ्वी, ड) आकाश.

१२) श्रीदत्तात्रेयांना एकंदर ......... गुरू होते.
अ) २१, ब) ११, क) २४, ड) १४.

**— सदानंद चेंदवणकर**

१) – ब, २) – ड, ३) – ब, ४) – ड, ५) – अ, ६) – अ, ७) – ड, ८) – क, ९) – क, १०) – अ, ११) – क, १२) – क.

# भाव तोचि देव

— श्री. गुरूनाथ विष्णु पन्हाळक
३१२ डी, रंकाळावेस, कोल्हापूर - ४१६ ००

आवडीने भावे हरी नाम घेसी
तुझी चिंता त्यासी सर्व आहे॥
— संत एकनाथ

किती अर्थपूर्ण व गोड अभंग आहे हा! या दोनच ओळीत संत एकनाथां ईश्वराच्या भक्तीची आणि त्याची महती गायली आहे.

श्री बाबांच्या भाषेत "शरण मज आला आणि वाया गेला। दाखवा दाखला ऐस कोणी।"बाबांची ही ओळ व नाथांचा हा अभंग ह्याच्यामध्ये फारसा, किंबहुना काही फरक नाही, असे मी म्हणेन.

जर आपण मनोभावे ईश्वरास शरण गेलो,त्याचे नामस्मरण केले, तर तो आपल काळजी घेणार. ईश्वरास आपली चिंता आहे परंतु वरकरणी जगास दर्शविण्यास, ज आपण मनापासून नामस्मरण केले नाही तर त्याचा उपयोग काहीच होणार नाह असो.

ज्याप्रमाणे परीक्षा पास होण्यासाठी, उत्तम गुण मिळविण्यासाठी जर आप रात्रंदिवस मनापासून जर अभ्यास केला तर १०० %यशाची खात्री! त्याचप्रमाणे ह भवसागर तरून जाण्यासाठी, ईश्वराकडे जाण्यासाठी आपण जर मनापासू नामस्मरण केले तर ईश्वराकडे जायची १०० %खात्री! नुसते ग्रंथवाचन, उपवा नवस करून सहजासहजी ईश्वर प्रसन्न होत नाही. भक्त प्रल्हाद, बाळ ध्रुव, व लोकांनी कुठे उपास-तपास, ग्रंथवाचन, ग्रंथ पारायणे केली होती! त्यांनी आप सर्वस्व ईश्वरास अर्पण केले होते. त्यांनी फक्त एकच पारायण केले होते,ते म्हण नामरूपी पारायण. फक्त "नामस्मरण! रात्रंदिवस ईश्वराचे नांव!" ईश्वराचे न घेण्यास कुठलाही मुहूर्त पहावा लागत नाही. ते कधीही, केव्हाही आणि कोठेही घे येते.

नामस्मरणाने पुष्कळसे साध्य होते. नामाचा महिमा फार मोठा आहे. ज्यावे आपण नामात खरोखर दंग व्हाल, ईश्वराशी एकरूप व्हाल तेव्हा आपणास त्या प्रचिती येईल. श्री बाबांनी म्हटले आहे की, "माझा जो जाहला काया वाचा मने, तया मी ऋणी सर्वकाळ" त्यासाठी देवापुढे नाक धरून बसावयास नको. प्रवास ऑफिसमध्ये, बिछान्यावर, रस्त्यावर चालताना, नाम घेता येते. असो.

"जो जो मज भजे, जैसा जैसा भावे
तैसा तैसा पाहे मीही त्यासी

**जसे आपण ईश्वराकडे पहाल, बाबांकडे पहाल, त्याच दृष्टीने परमेश्वर श्री बा तुमच्याकडे बघतील.**

शेवटी ईश्वर एकच. आपण कोणत्याही देवाचे नामस्मरण केले तरी ते देवाला पोचतेच. श्री बाबा हे ईश्वराचा अवतारच. जर आपण बाबांचे मनापासून नामस्मरण केले तर आपणास याची प्रचिती येईल. आपण मनोभावे कायावाचामने बाबांचे नामस्मरण करा आणि मग पहा श्री बाबा काय चमत्कार करतात ते!

श्री बाबांच्याच भाषेत "शरण मज आला आणि वाया गेला। दाखवा दाखला ऐसा कोणी।"जर ईश्वरास, बाबांस शरण गेलो, नामस्मरण मनापासून केले तर ईश्वर, बाबा आपली काळजी घेणारच. कारण ईश्वरास भक्तांची काळजी आहे, फक्त त्याला पाहिजे भाव, मनापासून नामस्मरण. कारण नाथांच्या भाषेत "भाव तोचि देव" "देव भक्तीचा भुकेला"!

# आत्मशांती

— सौ. अलका ज. खाडे
व्रजमाणिक नगर क्र. १, ३रा मजला,
खोली क्र. ३२, भाईंदर (पश्चिम).

परमेश्वराचा आपल्याला आलेल्या अनुभवावरून परमेश्वराच्या अस्तित्वाची जाणीव करून घेण्याचा व त्यास ओळखण्याचा प्रयत्न आपण केला पाहिजे. तेव्हा आपणास कळून येईल की, तो फार जवळून आपल्या सान्निध्यात येऊन गेला आहे.

परमेश्वर हा भक्ताच्या प्रेमाला भुकेला असतो. देव भावाचा भुकेला म्हणतात, ते काही खोटे नाही. भक्ताच्या पुजेला जसा तो साक्षात् उभा राहतो, तसा त्याच्यावरील संकटात देखील धावून येतो, त्याची मुक्तता करतो. जसे भक्ताचे लक्ष परमेश्वरावर असते, तसे परमेश्वराचे लक्ष भक्तावर असते.

सर्वसाधारण माणसाचे आयुष्य हे रहाट गाडग्यासारखे असते. सकाळी उठल्यापासून ते रात्री झोपेपर्यंत त्याची सारखी धडपड असते, रात्री झोपही पूर्ण मेळत नाही, मनाला शांती नाही. सर्व सुखे पुढे असूनदेखील कधी असे वाटते, बस् झाले हे जिणे! आता हे सोडून कुठे तरी तीर्थस्नानी जावे, संन्यासी मार्ग पत्करावा, अशी द्विधा मनःस्थिती होते. मग मनात विचार येतो, आपण काय करायला पाहिजे. त्यावर रामबाण उपाय म्हणजे, भक्ती मार्गात आपले मन रमवावे, गुरू संदेश मनात आचरावा, 'रामा', 'पांडुरंगा', 'परमेश्वरा', या त्रिमूर्तीतून आपल्याला शांती मिळेल. साधुसंतांच्या सहवासातून आपणास भक्ती मार्ग सहज कळेल व उत्साहाने त्यात रममाण होऊन मनास शांती व समाधान मिळेल. आपले जीवन सुखकर होऊन ज्ञानाचे भंडार तुमच्या पुढे असेल. तुमच्या आत्म्यास शांती व सद्‌गती मिळेल.



# तुम्ही त्याला द्या, तो तुम्हास देईल

– श्री. श्रीकांत गो. सावंत
१५/१६, मिनर्वा बिल्डिंग,
एम्. पी. रोड, दादर, मुं. - ४०० ०१४.

ईश्वर निर्माणकर्ता, तोच पूर्णब्रहम, साकार निराकार, सर्वव्यापी, सर्वसाक्षी, जळी स्थळी, काष्ठी, पाषाणी सुद्धा तोच. अशा सर्वश्रेष्ठ ईश्वरास आम्ही काय देणार?

हो! आम्ही सुद्धा ईश्वरास काही देऊ शकतो. त्यासाठीच तो दयाळू, कृपाळू परमेश्वर भुकेने, तहानेने व्याकुळ होतो. त्याची तहान, भूक भागवा. म्हणजे तो सर्वस्वच तुम्हाला देईल.

अहो! पण ईश्वराला भूक, तहान लागेलच कशी? बरं, समजा लागली तर ती भागवायची कशी?

त्यासाठीच आपण परमपूज्य श्री रामकृष्ण परमहंसाचे अंतरंग लिलासहचर श्रीमत् स्वामी शिवानंद (महापुरूष महाराज) यांच्या मधुरवाणीतून उतरलेले अमृतमय उपदेश थोडक्यात पाहू या!

स्वामी शिवानंद भक्तास सांगतात, प्रभूंना खूप अंतःकरणापासून आळव, कळवळून प्रार्थना कर. मुख्य गोष्ट आहे, प्रेम– प्रेमपूर्वक नामस्मरण, प्राण-प्राणामध्ये व्याकुळता रडत रडत विश्वास, भक्ती, प्रेम यासाठी प्रार्थना कर. निर्भरता, विश्वास, भक्ती, प्रिती हेच प्रभूंना हवे. कुठल्याही प्रकारे स्मरण, चिंतन, मनन हेच ध्यान. मनापासून रड. रडता रडता मनातील मलिनता निघून जाईल. काया, वाचा, मने पवित्र रहाण्याचा प्रयत्न कर. प्रभूच्या दारी एकनिष्ठेने शरणांगत होऊन पडून रहा. कोणत्याही स्थितीत त्याच्या आश्रयाने रहा. हृदयात अनुराग जागा कर. प्रितीपूर्वक वारंवार नाम घेणे हाच जप.

सर्व काळी चालता फिरता, उठता बसता, जेवता निजता, शयनी, जागरणी, स्वप्नी सर्वच अवस्थेत प्रभूचाच जप कर. त्याचीच सवय लावून घे. तेच प्रभू सर्वांच्या हृदयाचे गुरू, मार्गदर्शक, पिता, माता, सखा होत. निर्भय हो!

संसारात रहा किंवा त्याग कर. पण कोणत्याही स्थितीत सर्व कर्तव्यकर्म करीत असता निदान एकदा तरी प्रभूंना प्राणापासून आळविले पाहिजे. थोडक्यात– "हाती काम, मुखी हरी नाम".

म्हणजेच परमेश्वरास फक्त व्याकुळ होऊन श्रद्धायुक्त मनाने भक्ती, प्रेम द्या. तो स्वतःहूनच तुम्हावर कृपेचा वर्षाव करील. तुमचा विश्वास दृढ करील. तुमची हृदय भक्ती विश्वासाने परिपूर्ण होऊन जाईल. तोच स्वतः सद्‌गुरू रूपात तुम्हास मार्गदर्शन करील. तोच तुम्हास यमनियम, संयमशील जीवन जगण्यास शिकवील. गुरूशक्तीचा अनुभव देईल. तोच तुम्हाला सच्चिदानंदाच्या अवस्थेत ज्ञानप्रकाश देऊन मोक्ष प्राप्तीप्रद पोहचवील.

तुम्हास जीवन सत्य समजेल. खरेखुरे समाधान - शांती मिळेल. तुम्ही ईश्वरमय व्हाल. ''अहं ब्रह्मास्मि'' या शिवाय दुसरे काहीच नसेल.

चला, तर! आतापासूनच त्या अनादी, अनंत, अमर, अजर परमात्म्याला, त्या सर्वशक्तिमान परमेश्वराला आपण व्याकुळतेने, प्रेमाश्रूने, भक्तीश्रद्धा विश्वासाने आळविण्याचा प्रयत्न करू या. 'प्रयत्ना अंती परमेश्वर.'

('आनंदधामाकडे' या पुस्तकाच्या आधाराने)



# साईनामाचे कंकण

साईनामाचे कंकण बांधून आम्ही
चाललो पुढे
अमुचे कोण करी वाकडे ॥ धृ.॥
नियती क्रूर घाव ही घाली
सगे सोयरे टोचून घेती
हृदय अमुचे विदीर्ण होता
साईसखा सावरे॥ १॥
कुणीही या हो आम्हा संगती
जात पात इथे मानीत नाही
निर्मळ व्हावे अंतःकरणी
हेच असे सांगणे ॥ २॥
शुध्द मनातील प्रेमलहरी
साईचरणाचा आश्रय घेती
साईमयही होऊन काया
आत्मानंदी तनू डोले॥ ३॥

**— सौ. विद्या सुभाष सुलाखे**
गुप्ते चाळ, नेहरू मैदान,
श्रीसाईमंदिरामागे,
डोंबिवली (पूर्व).

# महामुनी गौतमबुद्ध

**श्री. सत्यवान गायकवाड**
३१९ नवी खडकी, येरवडा
पुणे-४११ ००६.

श्रीसाईबाबांच्या आशीर्वादाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर व भगवान गौतमबुद्ध यांच्या प्रतिमेसमोर प्रथम अभिवादन करतो. तसेच पावनभूमि चैत्यभूमिला वंदन करून पावन पौर्णिमेला बुद्ध पुष्प संक्षिप्तरूपी गुंफण्यास सुरुवात करतो.

माणसाने प्रथम माणूस बनले पाहिजे. याच्या करिता हजारो वर्षांपासून आजतागायत प्रयत्न चालू आहेत व पुढेही होणार आहेत. माणूस बनवायची संस्कारक्षम प्रक्रिया काही केल्या थांबणार नाही. भगवान बुद्धालाही अडीच हजार वर्षापूर्वी हेच वाटले. लालसेमुळेच मनुष्य दुःखाच्या जाळ्यात सापडतो. माणसाचे जीवन सुखी बनविण्यासाठी कमीत-कमी भोग व लालसा असणे जरूरीचे आहे.

**भगवान बुद्धाचा जन्म :**

पात्रातील प्रकाशमान ज्योतीप्रमाणे महामायेने बोधिसत्वाला आपल्या गर्भात धारण केले, तिचा प्रसूतिकाळ जवळ येऊ लागताच प्रसूतिसाठी आपल्या माहेरी जाण्याची इच्छा तिने व्यक्त केली. आपल्या पतीला म्हणाली, "माझ्या पित्याच्या नगरीला मी जाऊ इच्छिते." "तुझ्या इच्छेप्रमाणे", राजाने उत्तर दिले. सोन्याच्या पालखीत बसवून शुद्धोधनाने मोठ्या लवाजम्यासहित तिला तिच्या पित्याच्या घरी पाठविले.

देवदहला जात असताना मार्गात फुलांनी बहरलेल्या,तसेच पुष्प विरहित अशा आल्हाददायक गर्द वनराईतून महामायेला जावे लागणार होते. मायादेवी लुम्बिनी वनात पलाश वृक्षाखाली विश्रांतीसाठी थांबली. याच ठिकाणी हिमालयाच्या पायथ्याशी तराईच्या शाक्य घराण्यात इ.स. पूर्व ५६३ मध्ये अश्विन शु. १० स कपिलवस्तूमध्ये मायादेवीने बाळाला जन्म दिला.

**असितमुनींची भविष्यवाणी :**

असित नावाचा एक मुनीवर हिमालय पर्वतावर रहात होता. बुद्धाची जन्म वार्ता असितमुनीला समजली. बुद्धजन्म झाला, अशी वार्ता सर्व मानवतेला विश्वभर तर समजलीच, पण उच्चतम प्रतिच्या देवमाणसांनाही ही वार्ता समजली. सर्व देवमाणसांची व गुणी, शीलवान माणसांची रीघ कपिलाच्या पवित्र भूमिकडे कपिलवस्तूकडे लागली. पैकी असितमुनीला वाटले, आपणही कपिलवस्तूकडे जाऊन बुद्धाचे दर्शन घ्यावे. त्याने आपल्या दिव्यदृष्टीने सर्व जम्बूद्विपांचे निरीक्षण केले,तेव्हा शुद्धोदनाच्या गृही दिव्य-प्रकाश, जग उद्धारकर्ता भगवान बुद्धरूप त्यास दिसले. असित ऋषीने त्या बालकाला निरखून पाहिले, तेव्हा ते महापुरुषाच्या बत्तीस लक्षणांनी व ऐंशी शुभ चिन्हांनी युक्त असलेले त्याला दिसले. त्याने पाहिले की, त्याच्या

देह शुक्र व ब्राह्मणांच्या पेक्षाही अधिक तेजस्वी आहे व त्याचे तेजोमंडल त्यांच्यापेक्षा शतसहस्त्र पटीने अधिक दैदिप्यमान आहे. असित ऋषीच्या मुखातून त्वरित उद्‌गार निघाले, "निस्संदेह, या पृथ्वीतलावर अलौकिक पुरुष अवतरला आहे." असे म्हणून असितमुनी साष्टांग नमस्कार करून निघून गेले.

**बालपण व शिक्षण :**

जेव्हा भगवान बुद्ध उर्फ सिद्धार्थ चालू आणि बोलू लागला, तेव्हा शाक्यातील वयोवृद्ध, जाणते लोक एकत्र जमले व त्यांनी गौतम बुद्धाच्या पित्यास सांगितले की, मुलाला 'अभय' या ग्रामदेवतेच्या देवळात दर्शनाला नेले पाहिजे. पित्याची आज्ञा प्रमाण मानून वयाच्या ८ व्या वर्षी शाक्याच्या रिती-रिवाजानुसार बुद्ध देवळात गेले. भगवान बुद्ध उर्फ सिद्धार्थाचे शिक्षण विद्वान विश्वामित्र उपाध्याय यांच्या मार्गदर्शनाखाली झाले. सिद्धार्थाचे शिक्षण वेगाने झाले. धनुर्विद्या, शस्त्रविद्या, अस्त्रविद्या, मल्लविद्या या आवश्यक विद्येमध्ये सिद्धार्थ तरबेज झाले.

दंडपाणी नावाचा एक शाक्य होता. त्याला यशोधरा नावाची एक मुलगी होती. ती आपल्या सौंदर्याविषयी आणि चारित्र्याविषयी प्रसिद्ध होती. यशोधराने सोळाव्या वर्षात पर्दापण केले होते व दंडपाणी तिच्या लग्नाच्या चिंतेत होता. सिद्धार्थ गौतमालाही निमंत्रण पाठविण्यात आले होते. लग्नाच्या वेळी दंडपाणी याने धनुर्धारी विद्येत पारंगत असलेल्या मुलालाच माझी कन्या वरमाला घालील, असे जाहीर केले. परंतु त्या परीक्षेत फक्त सिध्दार्थ गौतमच यशस्वी झाला, आणि मोठ्या थाटात यशोधराशी त्याचे लग्न यथासांग पार पडले.

**गृहत्याग :**

शुद्धोधनाने आपल्या पुत्रासाठी तीन राजमहाल बांधले, एक उन्हाळ्यात, एक पावसाळ्यात आणि एक हिंवाळ्यात, हे राजमहाल विलासी जीवनात उत्तेजक अशा सर्व साधनांनी सुसज्ज होते. परंतु भगवान गौतमाला तिथे समाधान वाटत नव्हते.

एके दिवशी भगवान बुद्धाने गृहत्याग करून यशोधरा व मुलगा राहुल यांच्याकडे एकदाच दृष्टी टाकली व ते अरण्यात निघून गेले. त्यांनी पिंपळाच्या वृक्षाखाली १४ वर्षे तपश्चर्या केली आणि जगाला सत्याचा मार्ग दाखविला.

**भगवान बुद्धाचा उपदेश :**

भगवान गौतमबुद्ध जातीभेद मानीत नव्हते. म्हणूनच त्यांच्या धम्मसंघामध्ये अंगुलीमाल हा दरोडेखोर, स्वाती हा कोळी, उपाली हा न्हावी, आम्रपाली ही गणिका, चंपा ही पारध्याची मुलगी, असे अनेक थरांतले लोक बुद्धधर्मात आले.

— दान कोणास करावे?

१) अनाथ, अपंग व्यक्तिस दान करावे.

२) निराश्रितांना आश्रय द्यावा.

३) सद्धम्मासाठी दान करावे.

४) धम्मस्तूपासाठी चैत्य व विहारासाठी दान करावे.

५) उत्तम कलाकृती निर्मितीसाठी दान करावे.
६) धम्मदेसना देण्यासाठी आयोजित मेळाव्यासाठी दान करावे.
७) विद्वान भिख्खूंना दान करावे.
८) समाज उद्धारासाठी दान करावे.
९) कोणा दीनाच्या मुलीच्या लग्नासाठी दान करावे.
१०) रोग्यासाठी दान करावे.
११) अडलेल्या-नडलेल्यांना वाचविण्यासाठी दान करावे.
१२) अनोळखी संकटात सापडला असता, त्याला दान करावे.
१३) धम्म शिक्षणासाठी व समाज मंदिरासाठी दान द्यावे.
१४) देश अडचणीत सापडला असता त्याला दान द्यावे.
१५) नैसर्गिक संकटात सापडला असता दान द्यावे.

——दान कोणास करू नये.

१) जो सशक्त आहे, पण दान मागतो.
२) जो स्वतःच्या स्वार्थासाठी दान मागतो.
३) जो चोर आहे, लबाड आहे व दान मागतो.
४) जो ढोंगी भिख्खूआहे, पण दान मागतो.
५) जो स्वार्थी आहे, त्यास दान करू नये.
६) जो चैनी व सुखाच्या नावावर धन मागतो.
७) जो दुसऱ्याच्या अडलेल्या, नडलेल्याच्या नावावर दान मागतो.
८) जो व्यसनी आहे, त्यास दान करू नये.
९) जो धम्माचरणी नाही व दुर्जन,अंधश्रद्धाळू आहे, त्यास दान करू नये.
१०) जो अंध-अपंग नाही, पण दान मागतो.
११) जो देवाच्या नावावर दान मागतो व दुरूपयोग करतो, त्यास दान करू नये.

भगवान बुद्ध म्हणतात——

१२) मन सर्व धर्माचे (आयतन) पूर्वगामी (प्रमुख) आहे. मनच त्यांचे शासक आहे. सर्वमनोमय आहे. जो कोणी कलुषित मनाने बोलतो किंवा काम करतो, त्याच्यामागे, गाडी ओढणाऱ्या बैलांच्या पायाच्या मागोमाग जशी गाडीची चाके जातात, तसेच दुःख जाते. परंतु जो कोणी प्रसन्न मनाने बोलतो व काम करतो, त्याच्यामागे सुख कधीही साथ न सोडणाऱ्या सावलीप्रमाणे जाते.

१३) त्याने मला शिव्या दिल्या, त्याने मला मारले, त्याने मला हरविले, त्याने मला लुटले,असा विचार जे सतत मनात बाळगतात, त्यांचे वैर कधीही क्षमत नाही.

१४) (मागील प्रमाणे पहिली ओळ) असा विचार जे मनात बाळगत नाहीत, त्यांचे वैर नष्ट होते.

१५) वैराने वैर कधीच शमत नाही, अवैराने (मित्रत्वाने) वैर शांत होते, हाच सनातन धर्म आहे.

१६) आपणाला या जगातून जावे लागणार आहे, हे अज्ञाणी लोक जाणत नाहीत. परंतु या तथ्याची ज्या सूज्ञांना जाणीव असते, त्यांची वैरे शांत होतात.

१७) या जगात सारेच शुभ आहे, असे समजून जो आचरण करतो, ज्यांची इंद्रिये असंयत आहेत. जो खादाड, आळशी व निरोद्योगी आहे, त्याला जसे वाऱ्याने दुबळ्या झाडाला उन्मळून पाडावे, तसे 'मार' उन्मळून पाडतो.

१८) माळी पाटाचे पाणी हवे तेथे वाहून नेतो, बाण करणारा बाणाला व सुतार लाकडाला हवा तसा आकार देतो आणि सुव्रती स्वतःचे दमण करतो.

१९) सारे काही नित्य जळत आहे, तू हसतोस कसा? आनंदी कसा? अंधःकारात गडप असूनही दिव्याचा शोध का घेत नाहीस?

२०) व्रणांनी युक्त, सुजलेले, पीडादायी, नाना संकल्पांनी युक्त आणि अनित्य असे हे विचित्र शरीर पहा.

२१) हे शरीर जीर्ण-विजीर्ण, रोगाचे घर, भंगूर (विनाशी), सडून जाणारे आणि मृत्यूपर्यंतच टिकणारे आहे.

२२) हाडांची नगरी बनविली आहे. मांस आणि गिलावा केला आहे. त्यात म्हातारपण, मृत्यू, अभिमान आणि द्वेष लपून बसलेले आहेत.

२३) स्वतः केलेले पाप स्वतःला मलीन करते. स्वतः न केलेले पाप स्वतःला शुद्ध ठेवते. शुद्धी.आणि अशुद्धी ज्याची त्याच्यामुळेच होते. एक मनुष्य दुसऱ्याला शुद्ध करू शकत नाही.

२४) जोपर्यंत पाप पक्व होत नाही, तोपर्यंत पापसुद्धा चांगलेच दिसते. परंतु ते पक्व झाले (त्याचे फळ मिळू लागले), म्हणजे ते पाप आहे, असे पाप्यांना समजून येते.

२५) जोपर्यंत पुण्य परिपक्व होत नाही, तोपर्यंत पुण्यही पापासारखेच वाटते. परंतु ते पक्व झाले (त्याचे फळ मिळू लागले), म्हणजे पुण्य आहे, हे पुण्यवंतांना समजून येते.

२६) हाताला जखम नसेल, तर त्या हातावर विष घेऊन गेले असताही विष बाधत नाही. त्याप्रमाणेच न करणाऱ्याला पाप बाधत नाही.

२७) आकाशात, समुद्रामध्ये किंवा पर्वत गुहात असे कोणतेही स्थान नाही की, तेथे राहिले असता मृत्यू सतावणार नाही.

**भगवान बुद्धाचा अंत :**

बुद्ध देव जवळच आहेत, हे समजताच दूरदूरचे गरीब-श्रीमंत, आंधळे-पांगळे त्याचप्रमाणे पाचशे बैलगाड्या व त्यांचे मालक, सर्व व्यापारी बुध्द देवांना रेशमी वस्त्र अर्पण करण्यासाठी बुद्धदेवांकडे आले, त्यातील व्यापाऱ्याने एक रेशमी वस्त्र भगवान बुद्धांच्या अंगावर घातले, पण ते वस्त्र अंगावर घालताक्षणी त्याचा नवेपणा जाऊन ते वस्त्र जुने दिसू लागले. ते पाहून सर्वांना आश्चर्य वाटू लागले. बुद्धांनी सर्वांना सांगितलं की, 'माझं शरीररूपी वस्त्रच जुन झालं आहे आणि मी त्याचा त्याग करणार आहे, त्याचं ते सूचक आहे.

हे बुद्ध देवाचे बोलणे ऐकून सर्वांना दु:ख झाले. पण त्यांनी सर्वांची सम
काढली. ते म्हणाले, लोक हो, दु:खी होऊ नका. प्रत्येक प्राण्याला मृत्यू हा येणार
आपल्या आवडत्या वस्तूचा नाश हा होणारच. त्याला आपण संयमाने तोंड दि
पाहिजे. तुम्ही माझ्या मृत्यूने दु:खी होऊ नका. मी तुम्हाला केलेला उपदेश श्रेष्ठ मा
तो तुम्हाला नक्कीच मार्गदर्शक ठरेल.

एवढे बोलून बुद्ध देव थांबले. त्यांनी डोळे मिटून जणू समाधी लावली. बुद्ध
ज्या ठिकाणी होते, तेथील शाल वृक्षांना एकदम फुलांचा बहर आला. त्यांनी आपल
फुलांचा वर्षाव बुद्ध देवांवर केला. आकाशातून संगीताचे स्वर ऐकू येऊ लाग
बुद्धदेवांचे शेवटचे शब्द सर्वांच्या कानात घुमत होते. याच सुमारास इ. स. पूर्व ४
मध्ये कुशी-नगर येथे बुद्ध देवांचे निर्वाण झाले.

—: नमो-बुद्धाय :—

दि. २४-१-५२ रोजी साईभक्त सम्मेलनात डॉ. बाबासाहेब आंबेडकर या
केलेले भाषण-"साईबाबांना प्रत्यक्ष भेटण्याचे किंवा पहाण्याचे भाग्य मला ला
नाही. त्यांच्याबद्दल मी थोडेफार ऐकून आहे. म्हणून अशा वेळी साईबाबांच्या जीवन
अष्टपैलू माहीत असलेल्या व्यक्तिला बोलाविले असते, तर फार बरे झाले असते. मा
साईबाबांबद्दलचे ज्ञान अगदी शून्य आहे आणि जे आहे त्याचे देखील अधिष्ठान ऐकी
गोष्टीवरच आहे. साईबाबा कालवश होऊन बरेच दिवस लोटले, तरी त्यांचा भक्तग
मात्र इंदुकलेप्रमाणे सारखा वाढत आहे. साईबाबा हे धर्मगुरु म्हणूनच पुष्कळां
माहीत आहेत. हिंदुस्थानात धर्माची अनेक स्थित्यंतरे झाली, परंतु साईबाबा
कोणत्या जातीचे व धर्माचे हे आजतागायत माहीत नाही. आज-कालच्या काळा
धर्माच्या नावावर पैसा गोळा करून, अनिष्ठ बाबींवर खर्च केला जातो. आज जगा
दु:ख व दारिद्र्य असताना अशा रितीने खर्च करणे, हा महाभयंकर गुन्हा आ
साधु-संतांच्या नावावर जर पैसा गोळा केला असेल, तर त्याचा पारमितांम
सांगितलेल्या तत्वाप्रमाणे विनियोग करणे अत्यंत आवश्यक आहे. दारिद्र्य, अज्ञान
रोगराई इतकी आहे की, सध्याच्या काळात ती नष्ट करण्यासाठी असा पैसा खर्च
करता तो धनिकांसाठी खर्च करणे, म्हणजे दुष्टपणा ठरेल. त्या पैशाचा विनियो
रुग्णालये, शिक्षण, बेकारांसाठी छोटे-छोटे धंदे, गरीब, अनाथ महिलांसाठी काहीत
धंदे. शिक्षण देणे, अशा कार्यांवर त्यांनी करावा. आपण जर जमा केलेल्या पैशाच
विनियोग अशा रितीने केला तर त्यामुळे आपल्या कार्याची वाहवा होईल. एवढेच न
तर साईबाबांची कीर्ती दाही दिशांना दुमदुमत राहील."

# संतांनी ओळखलेले अग्नीचे महान तत्व (रहस्य)

– श्री. हरिश्चंद्र काळू म्हात्रे
चिंचोड्याचा पाडा, ठाकुर्ली,
सुभाष रोड, डोंबिवली (पश्चिम),
– ४२१ २०२.

हिंदू धर्मात हजारो वर्षांपासून अग्नीला देवत्व दिलेले आहे. बऱ्याच विधींसाठी हिंदू धर्मात अग्नीचा वापर केला जातो. पूर्वीच्या काळी म्हणजे हजारो वर्षांपासून इष्टदेवतेला प्रसन्न करण्यासाठी यज्ञयाग केला जातो. यज्ञयाग करीत असताना ज्या देवतेच्या नावाने आहुती यज्ञात (अग्नीत) दिली जाते, ती त्या देवतेला पोहोचते (मिळते) असा विश्वास व श्रद्धा हिंदू धर्मात आहे. यज्ञयाग करीत असताना अनेक झाडांची लाकडे (समिधा) व सर्व प्रकारची धान्ये (हविषान्ने) यज्ञात आहुती रूपाने टाकली जातात. त्या समिधांच्या व धान्याच्या होणाऱ्या धुरामुळे घरातील असलेली कलमिषे बाहेर जातात. अशा प्रकारची भावना हिंदू धर्मात आहे.

हाच अग्नी भगवान शंकरानी आपल्या तृतीय नेत्रात धारण केला आहे. राजा दशरथाने पुत्रप्राप्तीसाठी (पुत्रकामेष्ठी यज्ञ) केला. यज्ञ समाप्तीनंतर अग्नी देवतेने प्रसन्न होऊन पायस दिला. त्या पायसाचे राजा दशरथाने तीन राण्यांना समान वाटप (वाटणी किंवा विभागणी) केले. परंतु कैकयीला समान वाटप पसंद न पडल्यामुळे तिला राग आला. तितक्यात तिच्या हातातील पायस घारीने उचलला व ऋषमुख पर्वतावर तप करीत असलेल्या अंजनीच्या हातावर टाकला. अंजनीने तो प्रसाद भक्षण केला. त्या प्रसादामुळे अंजनी मातेला शूर वीर, बुद्धीने श्रेष्ठ, रामाच्या सेवेत सतत मग्न असणारा, ब्रह्मचारी हनुमान जन्माला आला. कैकयीचा प्रसाद घारीने नेल्यामुळे माता कौसल्या व देवी सुमित्रा यांनी आपल्या प्रसादातील थोडा-थोडा भाग कैकयीस दिला. त्यानंतर त्यांना राम, लक्ष्मण, भरत व शत्रुघ्न अशी चार मुले झाली. अशी कथा रामायणात आहे. तसेच राम-रावण युद्ध समाप्तीनंतर सीता माईने अग्नीत प्रवेश करून आपले दिव्यत्त्व लोकांना दाखवून दिले.

अग्नीहोत्री ब्राह्मणांकडे सतत अग्नी प्रज्वलित केला जातो. त्यांच्या घरातील अग्नी विझू दिला जात नाही.

संत ज्ञानेश्वर महाराजांनी योग सामर्थ्याने आपला जठराग्नी प्रज्वलित करून मुक्ताबाईने त्यांच्या पाठीवर मांडे भाजल्याची कथा सुप्रसिद्धच आहे.

तसेच पारशी धर्मात अग्नीला देवत्व दिले असून त्यांच्या अग्यारीमध्ये सतत अग्नी जळत असतो. पारशी धर्मात मंदिराला अग्यारी म्हणतात. पारशी धर्मात झरतुष्ट्र नावाचे फार मोठे संत होऊन गेले. पारशी धर्माची स्थापना झरतुष्ट्राने केली. झरतुष्ट्र लहानपणापासून साधे जीवन जगणारा, ज्ञानसंपन्न, विनयशील, प्रतिभावंत, मुक्या प्राण्यांवर दया करणारा असल्यामुळे तो सर्वांना आवडू लागला.

झरतुष्ट्र मोठा झाल्यावर घराचा त्याग करून सत्याच्या शोधासाठी बाहेर पड
जमिन, नद्या-नाले यांच्यातून मार्ग काढीत ते वृक्ष, लता, अनेक प्रकारचे पशुप
याच्याशी दोस्ती करीत पुढे पुढे जाऊ लागले. पुढे गेल्यानंतर त्यांना एक महान
लागली. नदीचे पाणी अतिशय खोल होते. झरतुष्ट्र नदीतून जाऊ लागले. सुरूवाती
पाणी घोट्यापर्यंत, ...नंतर कमरेपर्यंत,...नंतर गळ्यापर्यंत पाणी चढले, प
झरतुष्ट्रांचा धीर खचला नाही. ते पुढे पुढे चालत राहिले आणि काय आश्चर्य! पा
पुढे चढलेच नाही. झरतुष्ट्र बाहेर पडले तो नवा प्रकाश व नवे तेज घेऊन, आणि का
आश्चर्य! देवाचे सद्विचार घेऊन येणारा देवदूत त्यांच्यापुढे उभा ठाकला. त्या
झरतुष्ट्राला सांगितले, 'बाळा, डोळे मिट, क्षणभरच! हं .... उघड आता .
झरतुष्ट्राने आज्ञापालन केले. समोर साक्षात ईश्वर उभा होता. ईश्वर म्हणा
'झरतुष्ट्रा, जा... माझा संदेश जगाला पोचव. म्हणावे, सत्यनिष्ठ, न्यायप्रिय आ
दयाळू माणसांवर माझी सदैव कृपा राहील. ईश्वर निर्मित वस्तूंवर प्रेम आणि श्र
ठेवा!' झरतुष्ट्र म्हणाले, देवा, तुम्ही सांगितलेले कार्य मी पार पाडीन. परंतु तुम्ही म
एक चिन्ह (प्रतिक - निशाणी) द्या. देवाने सांगितले, अग्नीला देवरूप मान. अ
पवित्र आहे व जे जे वाईट आहे ते जळून जाते अग्नीमध्ये! तेव्हापासून पारशी धर्म
अग्नीला देवत्व बहाल केले गेले.

अग्नीचे महान मर्म साईबाबांनी ओळखले होते, आणि म्हणूनच शिरडीला त्या
धुनी (अग्नी) पेटविली. साईबाबांच्या पश्चात आज देखील धुनी सतत पेटती आहे
शिरडीला आल्यानंतर माझ्या भक्तांचे विकार, विवंचना व दु:खे अग्नीमध्ये जळावीत
तो निष्पाप, निर्मळ होऊन घरी परत जावा, अशी साईबाबांची प्रबळ इच्छा होती. उ
म्हणजे उज्वल दिवस माझ्या भक्तांना प्राप्त होवो, अशा प्रकारची मनोकाम
साईबाबांची असल्यामुळे, साईबाबा भक्तांना उदी देत असत. आज ही त्यांच्या पश्च
उदीचा वापर मोठ्या प्रमाणात केला जातो. साईबाबांनी म्हटले आहे,

शिरडीस ज्याचे लागतील पाय ।
टळतील अपाय सर्व त्याचे ॥

संत जगाच्या कल्याणासाठी देह झिजवितात. साईबाबांनी सुद्धा आपला दे
जगाच्या कल्याणासाठी झिजविला. तुकाराम महाराज अशा संतांचे वर्णन ए
अभंगातून करतात.

जगाच्या कल्याणा संतांच्या विभूती ।
देह कष्टविती उपकारे ॥

आजही धुनीतून काढलेल्या उदीच्या प्रसादाने हजारो साईभक्तांची दु:खे, कष्ट
अनेक प्रकारचे रोग नाहीसे होतात. हा विसाव्या शतकातील व विज्ञानयुगातील 'महा
चमत्कार' म्हटला पाहिजे.

# माझा जो जाहला काया वाचा मनी, तयाचा मी ऋणी सर्वकाळ

**सौ. विभावरी ज. राणे**
अस्मीता दर्शन, ४०३/४,
तेली गल्ली, अंधेरी (पूर्व)-६९.

आमच्या घरात सर्व कामे साईबाबांना सांगूनच केली जातात.

माझी आपली थोडीशी साई सेवा म्हणजे हेमाडपंतांचे साईसच्चरित वाचणे. खूप ळा साईबाबांनी मला संकटात असतेवेळी मार्ग दाखविला आहे.

१६-५-८४-रोजी मे'च अशी सुटी होती. सुटी निमित्ताने कामावर जाणारी मंडळी रीच होती. दुपारची जेवणे आटोपल्यावर माझे यजमान म्हणाले की, "मी बाहेर ाऊन येतो." तेव्हा दुपारचे दोन वाजले होते. त्यावेळे नंतर रात्रीचे बारा वाजले री ते घरी आले नाहीत. आम्ही त्यांच्या मित्रांकडे चौकशी केली पण कुणालाच ांच्या बद्दल माहिती नव्हती. असे करता करता पहाटेचे दोन वाजले. माझ्या घरातील ाझे दिर, जाऊ सर्व जागी होती. मुलं मात्र झोपली होती. 'हे' कुठे गेले होते कळायला ाहीच मार्ग नव्हता.

मग मात्र माझा धिर सुटला व मी आमच्या देवघरात गेले. साईबाबांना डोळ्यांतील श्रूंमार्फत सर्व कथन केले व नमस्कार करुन झोपले.

आणि काय वर्णन करुं त्या प्रसंगाचे! माझा जरासा डोळा लागला आणि माझ्या ाईबाबांनी माझे यजमान "श्री हरि ॐ उर्फ बागवे"यांच्या घरी असून श्री सद्‌गुरु ाऊळ महाराज यांच्या आज्ञे नुसार ते झोपले आहेत, असा दृष्टांत स्वप्नात दाखवला. ी झोपेतून चटकन् जागी झाले. घड्याळात बघितले तर पहाटेचे ३.०० वाजले होते. रातील माणसांना मी सांगितले की, श्री सद्‌गुरु साईबाबांनी 'हे' कुठे आहेत, ते मला वप्नात येऊन सांगितले. तुम्ही सर्व झोपा.

साईबाबांच्या स्वप्नाप्रमाणे कशीतरी रात्र काढली आणि सकाळी आठ वाजता ाझे यजमान चिंचपोकळी येथून आनंदात घरी आले. तो दिवस गुरुवार होता. ाईबाबांचे बोल सारखे माझ्या मनात गुणगुणू लागले– "माझा जो जाहला काया ाचा मनी, तयाचा मी ऋणी सर्वकाळ" आणि काय सांगू! देहाने वावरत असणारे ाईबाबा विदेहाने चराचरात वावरत असल्याचा मला प्रत्यक्ष अनुभव आला.

# श्री साईबाबांची इच्छा

**श्री. बाळू गोविंद वाघ**
३५९, साईसदन, दहिसर चेकनाक्याजव
पो. मिरा, जि.ठा
पेणकर पाडा, दहिसर (पू
४०११०

मी ३/४/८६ रोजी P.W.D. इलेक्ट्रिक पर्यवेक्षकाच्या परीक्षेला बसण्यासाठी अ केला होता. परतु डिसेंबर १९८७ साठी माझा नंबर आला नाही. माझी डिसेंबर म बसण्याची इच्छा होती. मी विचार केला की, काही तरी कमीजास्त झाले अस

त्यानतर मार्च महिन्यात मी आमच्या श्री साई सेवाधाम मंडळ, नवागाव, दहिसर मंडळाबरोबर श्रीक्षेत्र शिर्डी येथे बाबांच्या दर्शनाला गेलो व मी ही गोष्ट बाबां समाधीवर मस्तक ठेऊन निवेदन केली की, माझा परीक्षा क्रमांक येऊ द्या आ चमत्कार असा झाला की, एप्रिल महिन्यात मला परीक्षेचे प्रवेश पत्र आले. परीक्षा ४ ५ मे या दोन दिवशी होती. मी साईबाबांना वंदन करुन परीक्षेची तयारी केली. ४ मे दोन पेपर होते व मला ५ मेला तोंडी परीक्षा होती. ही परीक्षा अतिशय अवघड अ असे बोलले जाते. कारण एक एक उमेदवार पाच पाच ते सात सात वेळा नापास हो व निकालही १० ते २० टक्के लागतो. म्हणून मनामध्ये भीती होतीच. मी साईबाबा उदी कपाळी लावून पेपरलाही उदी लावली. व दोन्ही पेपर व्यवस्थित सोडवले. म कसलीही अडचण आली नाही. दुसऱ्या दिवशी तोंडी परीक्षा होती. ती पण व्यवस्थि पार पाडली, कारण मी उदी भक्षण करुन गेलो होतो. बाबांच्या कृपेने मला काहि अवघड वाटले नाही.

काही दिवसांनी मी मित्रांबरोबर बसलो असता परीक्षेचा विषय निघाला. म्हणालो की, जर पास झालो तर ती बाबांची कृपाच असेल। परीक्षेचा निकाल जुलैला लागला. मी पास झालो होतो. माझ्या डोळ्यांतून पाणी आले. बाबा, या लह बालकासाठी तू किती कष्ट घेतोस.

बाबांवर माझी श्रध्दा अतिशय आहे, कारण माझे सर्व कामकाज बाबांच्या कृपेन चालते. यात काहीच शंका नाही. जो साईवरती विश्वास ठेवील, त्याला काहीच क पडणार नाही व त्यांना ठायी ठायी दिसेल श्री साई.

# आज मी ब्रह्म पाहिले

**श्री. भालचंद केशव गन्दे**
'सुखनिवास,' चेंदणी, ठाणे.

शिर्डीला जाण्याची अंतःस्फूर्ति होत होती. थंडीचा जोर होता. आमच्या शमुखकाकांना तर दम्याचा त्रास असल्याने, दमा त्या थंडीत वाढण्याची भीती असल्याने, ते यायला तयार होत नव्हते. कशी काय शिर्डी गाठायची, असा प्रश्न गीचच मला पडला होता. पण प्रश्नांचा बागुलबुवा आपली परीक्षा घेऊ पहातोय, हें क्षात येऊन, प्रत्यक्ष 'एस.टी.'त बसल्यावर थंडीचा जोर संपेल, अशी प्रखर जाणीव पोआप निर्माण झाली. त्यामुळे 'एस.टीत बसल्यावर थंडी पळेल' असा स्पष्ट लासा देऊन मी त्यांना तयार केले. ठरल्या प्रमाणे मग श्री. रामराव देशमुखकाका, झा मित्र श्री. विलास तुरकर व मी असे तिघेजण शिर्डीस निघालो. निघण्यापूर्वी वेळी बाबा प्रत्यक्ष दर्शन देतील, असे मला मनोमन वाटत होते. इथं एवढी थंडी आहे शिर्डीला तर जास्तच थंडी असणार, असे वाटत होते. एस.टी ठाण्याहून सुटेपर्यंत डी चांगली जाणवतही होती. पण आश्चर्य म्हणजे, एस.टी. ने ठाणे सोडले तसतसे डीचा जोर कमी झाल्याचे जाणवले. शिर्डीत उतरलो तर तेथेही थंडीचा जोर नव्हता. मुळे बाबांच्या चमत्काराची खूण पटली नि परमेश्वर प्रथम आपल्या भक्ताची परीक्षा शी घेतो व शेवटी त्याचे मनोबळ विश्वास पक्का झाल्यावर त्याला कसा मार्ग खवून आपल्या जवळ मायेने खेचून घेतो, हेहि प्रकर्षाने जाणवले.

शिर्डीत उतरल्यावर आम्ही हात-पाय-तोंड धुवून, शिरस्त्याप्रमाणे, प्रथम रुमंदिरात जावून बाबांच्या गुरुदेवाचे दर्शन घेतले. मग बाबांचा अखंड सहवास भलेल्या पवित्र द्वारकामाईचे दर्शन घेतले व मग समाधी मंदिरातील मनोहारी बांचे दर्शन घेतले. २/३ दिवसाच्या मुक्कामात यावेळी बाबांचे प्रत्यक्ष दर्शन घडणार याची पूर्व-सूचना असल्याने, मी प्रत्येक साधू, भिकारी जवळपास वावरणारी माणसे वर बारीक लक्ष ठेवून होतो. कुठे देव भेटेल ह्याचा नेम नव्हता. त्यामुळे मी सावध तो. लेंडीबागेत, बाबांनी स्वहस्ते लावलेल्या पिंपळाच्या झाडाला खाली नऊ मूळ्या टल्या असल्याने तो 'नवग्रह पिंपळ' म्हणून प्रसिद्ध आहे. ह्या पिंपळाला फेऱ्या तल्यावर नवग्रहांची बाधा शमते, असे म्हणतात. म्हणून मुद्दाम तेथे गेलो तर पळाच्या खालीच मुसलमानी पेहराव केलेले दोन म्हातारे फकीर बसले होते. त्यापैकी एकाने शुभ्र वस्त्रे परिधान केली होती. त्याची दाढीही शुभ्र होती. श्री. देशमुखकाका त्यांना नमस्कार करायला खाली वाकले, तोच एका फकिराने आवाज लताच चढवला व "तू काय माझी परीक्षा पहायला येथे आलास काय?" असे जोरात विचारुन अंगात आल्यासारखा तो बसल्या जागीच घुमू लागला. त्याच्या ह्या अंगात ण्यामुळे मी गडबडलो व हा काय आता मंत्रविद्येचा प्रयोग करतो की काय असे वाटून मी थोडा मागे सरकलो. त्याच्या आवाजाने आजूबाजूची सर्व मंडळीही तेथे गोळा होऊन, आमच्याकडे पाहू लागली. पण आध्यात्म-साधनेत निर्गुण दर्शन घेतलेले श्री. देशमुखकाका तेवढ्याच शांततेने त्यांना म्हणाले, "सर्व एकच आहेत तर मग परीक्षा कुणाची घ्यायची," त्यांच्या ह्या स्पष्टिकरणामुळे तो फकीर प्रसन्न झाल्याचे जाणवले.

क्षणात त्याचा आवाज खाली आला. मोठ्या आनंदाने मग त्याने आपला मोरपिसा कुंचला श्री. देशमुखकाकांच्या वरुन फिरवला व आपल्या जवळची उदी त्यांच्या कपाळाला लावली. त्याच्यानंतर माझा मित्र श्री. विलास तुरकर व मीही त्या दोन फकीरांच्या पायावर डोके ठेवले. (फकिरांबरोबरचा सारा संवाद हिंदीत झाला होता नंतर त्यांना दक्षिणा देऊन आम्ही नवग्रह पिंपळाचे दर्शन घेऊन, पुन्हा मुक्कामाच्या खोलीत परतलो. खोलीत आल्यावर आम्ही नेहमीच कांही ना कांही आध्यात्मिक चर्चा करीत बसायचे. त्या दिवशी मात्र, खोलीत चर्चा करताना श्री. देशमुखकाका पटकन म्हणाले, "आज तुम्हाला काय दिसलं – कुठे प्रचिती वगैरे आली काय?" त्यावर "नाही हो, कांहीच प्रचिती आली नाही" अशी मी स्पष्ट कबूली दिली. त्यावर हंसून काका म्हणाले, "अरे मग तुम्ही पहाता काय? श्रीक्षेत्री येऊन काय नुसतीच स्थळं पहातां? अरे, आज नवग्रह-पिंपळाखाली बसलेले ते दोन फकीर म्हणजे, शुभ्र दाढीवाले एक श्री साईबाबा व दुसरे त्यांचे शिष्य अब्दुल बाबा होते." त्यांच्या ह्या स्पष्टिकरणामुळे क्षणात अंगावर रोमांच उभे राहून, डोळ्यात पाणी आले. "अहो, मग हे तुम्ही आता रात्री काय सांगता, तेव्हाच का नाही सांगितलत?" असे मी त्यांना विचारले. त्यावर ते फक्त हंसले व म्हणाले, "देव दाखवायचा नसतो, ओळखायचा असतो."

**बाबांचे प्रत्यक्ष दर्शन झाले ह्या भावनेने त्यावेळी माझे हृदय उचंबळून आले, पण प्रत्यक्ष देव भेटूनही आपण त्याला ओळखू शकलो नाही याचेही अपार दु:ख झाले. मात्र यावेळी बाबा आपल्याला प्रत्यक्ष दर्शन देणार ही घरी झालेली जाणीव कशी खरी ठरली हेही जाणवले. बाबा आज जिवंत कसे भेटतात ह्याचा हा प्रत्यक्ष पुरावा आहे. मात्र, देव भेटला तरी त्याची तेव्हाच ओळख पटणे ही पण पूर्वसंचिताची परमभाग्याची गोष्ट आहे!**


## साईप्रसाद

श्री. विजय हजारे यांच्या संपादकत्वाखाली प्रकाशित होणाऱ्या या त्रमासिकाचा रामनवमी विशेषांक गुढीपाडव्याला प्रकाशित झाला असून तो संपूर्णपणे साईसाहित्य विषयालाच वाहिलेला आहे. अखिल महाराष्ट्रातून सुमारे पन्नासावर लेखक-कवींनी आपापली साहित्यिक हजेरी या अंकात लावून अंकाला छान व सुयोग्य असे स्वरूप आणलेले आहे. कृपाशू प्रकाशन सी/६, गुंफादर्शन, १ला कस्तुरबा मार्ग, बोरीवली, मुंबई-६६. पाने ५४. किंमत ६ रु.

— साईनंद

# श्री साईबाबा संस्थान, शिरडी
# श्री साईबाबा संस्थान प्रकाशित पुस्तकांची यादी

| अनु. क्र. | पुस्तकाचे नांव | भाषा | किंमत | पॅकींग व पोस्टेज |
|---|---|---|---|---|
| १. | श्री साई सत्‌चरित | मराठी | ३१-०० | ९-०५ |
| २. | –,,– | इंग्रजी | १४-५० | ६-५० |
| ३. | –,,– | हिंदी | – | – |
| ४. | –,,– | गुजराथी | १९-०० | ६-५० |
| ५. | –,,– | कन्नड | १३-५० | ८-०० |
| ६. | –,,– | तेलगु | १८-०० | ८-०० |
| ७. | –,,– | तामीळ | – | – |
| ८. | –,,– | सिंधी | २२-०० | ७-५० |
| ९. | श्री साई सत्‌चरित पोथी | गुजराथी | ३१-०० | १०-५० |
| १०. | श्री साई लिलामृत | मराठी | – | – |
| ११. | –,,– | हिंदी | – | – |
| १२. | –,,– | गुजराथी | ६-६५ | ४-०० |
| १३. | अवतार व कार्य | मराठी | – | – |
| १४. | स्तवन मंजिरी | मराठी | ०-६५ | ३-५० |
| १५. | –,,– | हिंदी | १-०० | ३-५० |
| १६. | –,,– | गुजराथी | ०-९० | ३-५० |
| १७. | सगुणोपासना (आरती) | मराठी | ०-७० | ३-५० |
| १८. | –,,– | हिंदी | १-२५ | ३-५० |
| १९. | –,,– | गुजराथी | ०-८० | ३-५० |
| २०. | –,,– | तेलगु | २-५० | ५-५० |
| २१. | –,,– | सिंधी | १-२५ | ३-५० |
| २२. | दासगणूकृत ४ अध्याय | मराठी | १-८५ | ३-५० |
| २३. | सचित्र साईबाबा | मराठी/इंग्रजी | ४-८० | ५-५० |
| २४. | मुलांचे साईबाबा | मराठी | – | – |
| २५. | –,,– | इंग्रजी | १-६५ | ३-५० |
| २६. | –,,– | हिंदी | – | – |
| २७. | –,,– | गुजराथी | १-६५ | ३-५० |
| २८. | –,,– | तेलगु | – | – |
| २९. | रुद्राध्याय (अ. ११ वा) | मराठी | ०-८० | ३-५० |
| ३०. | मार्गदर्शिका (शिर्डी गाईड) | मराठी | – | – |
| ३१. | –,,– | इंग्रजी | – | – |
| ३२. | –,,– | गुजराथी | १-५० | ३-५० |
| ३३. | साई दि सुपरमॅन | इंग्रजी | ७-२५ | ४-०० |
| ३४. | साईबाबा ऑफ शिर्डी (भरुचा) | इंग्रजी | ६-५० | ४-०० |
| ३५. | साईबाबा ऑफ शिर्डी (प्रधान) | इंग्रजी | ३-०० | ४-०० |
| ३६. | अष्टोत्तर शत नामावली | मराठी | १-०० | ३-५० |
| ३७. | रघुनाथ सावित्री भजनमाला | मराठी | १५-२५ | ४-५० |